**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र-मुमाआ-२०११/१३३/तक्रार क्र.१४५/२०१०/**

**डॉ.संजय पै** **तक्रारकर्ता**

**१४-अे लक्ष्मीनारायण बिल्डिंग, तारा टेम्पल लेन, लॅमिग्टंन रोड,**

**डी.बी. मार्ग पोलिस स्टेशन समोर, मुंबई ४०० ००७**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा**

**धर्मादाय आयुक्त कार्यालय, ॲनी बेझंट रोड,वरळी,मुंबई**

**२. जन माहिती अधिकारी तथा** **गैरतक्रारदार**

**धर्मादाय आयुक्त कार्यालय, ॲनी बेझंट रोड,वरळी,मुंबई**

***---निर्णय---***

**तक्रारीचा दिनांक ३१.१२.२००९ सुनावणीचा दिनांक २.५.२०११**

**तक्रारदार-, गैरतक्रारदार- अनुपस्थित**

तक्रादार यांनी दि.३१.१२.२००९ रोजी दि.२८.१०.२००९ च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती अधिकारी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८(१) अन्वये आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार व माहिती अधिकारी गैरहजर आहेत. तक्रारर यांनी दि.२८.१०.२००९ रोजी केलेल्या तक्रार अर्जाचे अवलोकन केले असता कोणत्याही सार्वजनिक विश्वस्त संस्थेने एखादया निवासी इमारत,मंदिर इ. च्या संदर्भामध्ये ट्रस्ट असेल तर त्या संदर्भात कोण-कोणते नियम आहे व कोणकोणती कार्यवाही अनियमिततेबद्दल मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियमाप्रमाणे करता येते, या प्रकारची सर्वसाधारण असे मुद्दे उपस्थित करुन जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय मागविलेले आहेत. त्या अर्जाप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयात संपर्क साधावा असे कळविलेले होते परंतू तक्रारदार यांनी पुन्हा त्यावर कोणतीही विशिष्ट माहिती मागितलेले नसून प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्याचे उत्तर द्यावे अशी माहिती मागितलेली दिसून येते.

यावरुन माहिती अधिकारी अधिनियम २००५ च्या कलम २ (च)प्रमाणे माहिती व २(त्र) माहितीचा अधिकार या दोन संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये कोणत्याही कार्यालयातील कागदपत्रे, अभिलेख,अभिप्राय यांच्या संदर्भात उपलब्ध असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा आहे. **कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकारी यांचे अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे संबंधित प्राधिकरणाच्या प्रकरणाच्या निर्णय प्रकियेच्या संदर्भामध्ये अभिप्राय किंवा मत अपेक्षित नाही** व त्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

1. **तक्रार निकाली काढण्यांत येत आहेत.**
2. **तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात**

**दि.२८/४/२०११** **(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**

**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र-मुमाआ-२०११/३०५९/तक्रार क्र.३९/२०१०/**

**श्री.योगीराम आर. तुळसकर,** **तक्रारकर्ता**
**प्लॉट नं.८, शिवाजी पार्क,गोपीटॅक क्रॉस रोड,**
**माहिम,मुंबई ४०० ०१६**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक मनपा आयुक्त**
**जी/उत्तर विभाग, हरिश्चंद्र येवले मार्ग,**
**दादर पश्चिम,मुंबई ४०००२८**

**२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी** **गैरतक्रारदार**
**जी/उत्तर विभाग, हरिश्चंद्र येवले मार्ग,**
**दादर पश्चिम,मुंबई ४०००२८**

***---निर्णय---***

**तक्रारीचा दिनांक ३.१२.२००९**
**सुनावणीचा दिनांक २.५.२०११**
**तक्रारदार- गैरतक्रारदार- उपस्थित**

तक्रारदार यांनी दि.३.१२.२०१०रोजी व्दितीय अपीलाची सुनावणी दिलेली होती. त्यावेळेस दि.६.१२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे काकांचे आकस्मिक निधन झाल्यामुळे ते उपस्थित राहू शकणार नाही असे कार्यालयास कळविण्यांत आले होते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कार्यवाही अहवालाबाबत जे आदेश दिले होते त्या कार्यवाहीच्या अहवालाबाबत कार्यवाही केलेली नसल्यामुळे ती उपलब्ध होऊ शकली नाही अशी तक्रारी होती. व त्यामुळे पुन्हा सुनावणी घ्यावी अशा प्रकारची तक्रार आयोगासमोर केलेली आहे.

त्याकरिता सुनावणीच्यावेळी तक्रारदार यांचे तर्फे श्रीमती हर्षला आर. काडलक, वकिल हजर होऊन व त्यांनी युक्तीवाद केलेला आहे, त्याचप्रमाणे लेखी निवेदनही दाखल केलेले आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे अपिलाच्या संदर्भात सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपिल निकाली काढण्यांत आलेले होते, असे सांगितले.

तक्रारदार यांना प्रशासकिय अधिकारी, जी/उत्तर यांचे कार्यालयात उपलब्ध असलेले व त्यांनी वेळोवेळी मागितलेले कागदपत्रे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिलेली आहे असे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते, असे आयोगाच्या निदर्शनास आणण्यांत आले. त्यावर अपिलकर्ता यांचे वकिल यांनी सुध्दा त्यांना रिपोर्ट मिळालेले आहे परंतू ते चुकीचे आहेत अशी आयोगासमोर सांगितले. मालमत्ता सहा.आयुक्त जी/उत्तर विभाग यांनी या जागेच्या बांधकामाबाबत प्रशासकिय अधिकारी मालमत्ता कार्यालयाचा अहवाल जी/उत्तर इ.एस.आर./६०/मालमत्ता या क्रमांकाचे अहवाल मागविला त्यात श्री. वासुदेव करकेरा याचे अनधिकृत बांधकाम होते, त्यावर परिपत्रक दि.१६.९.२००८ व्दारे निष्कासन कार्यवाही ही प्रशासकिय अधिकारी, मालमत्ता मनपा कायद्यातील कलम ३५४ अे च्या तरतूदीनुसार नोटीस देऊन कार्यवाही करणे आवश्यक असताना सर्व अधिका-याची दिशाभूल करुन त्यांना मार्गदर्शन करण्याचे टाळून १०५-बी हया कलमानुसार भाडेकरु करार शर्तीचे उल्लंघन केल्यामुळे सूचना जारी करण्यासाठी सहा.आयुक्तांकडून आदेश का काढले नाहीत हे स्पष्ट होत नाही तसेच पुष्ठर्थ कुठलेही समर्थनीय दस्तऐवज/अहवाल उपलब्ध होऊ शकले नाहीत, याबाबत कागदपत्र उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. महा.नगरपालिकेच्या कलम १०५-बी प्रमाणे कारवाई होत नाही तरअनधिकत बांधकामाबाबत वरील परिपत्रकानुसार ३५४-अे ची नोटीस व पुढील कार्यवाही करणे आवश्यक असताना

तसाअहवाल अजूनही दिला नाही. कलम १०५-बी च्या सूचनेवर सेमी ज्युडिशिअली सुनावणी झाली असल्यास सुनावणीच्या वेळी स्पष्टीकरण, निवेदन. त्यावर घेतलेला निर्णय, मीमांसाची प्रत मिळणे अशी त्यांनी आयोगापुढे विनंती केली. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सध्या ते नविन जन माहिती अधिकारी आहेत त्यामुळे सदर तक्रारीच्या संदर्भात संपूर्ण नस्ती त्यांच्याकडे उपलब्ध आहे परंतू त्या नस्तीतील संपूर्ण कागदपत्र त्यांना हवे असल्यास उपलब्ध करुन देता येतील परंतू प्रकरणाच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारे अभिप्राय हे देऊ शकत नाही.

तक्रारदार यांना अहवाल प्राप्त झाला आहे म्हणजे माहिती मिळाली आहे. परंतू त्यांची अहवालातील निष्कर्षाबद्दल किंवा निर्णयाप्रक्रियेबद्दल तक्रार आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे कागदपत्रांच्या स्वरुपात माहि उपलब्ध होते. निर्णय प्रक्रिया किंवाप्रकरणांतील गुणवत्तेबाबत अभिप्राय किंवा कारवाई करुन मिळत नाही त्यामुळे तक्रारदार यांनी वर मागणी केल्याप्रमाणे जे कागदपत्र उपलब्ध असतील ती  नस्ती मधून सर्व कागदपत्र उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. परंतू त्यांच्या युक्तीवादाप्रमाणे योग्यती कार्यवाही झालेली नसल्यास त्या संदर्भात त्यांना उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारावर मुंबई महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे सक्षम प्राधिकारी यांचेकडे तक्रार करणे संयुक्तिक राहील किंवा मा.उच्च न्यायालयात त्यांना दाद मागून घेता येईल. राज्य माहिती आयोगासमोर तक्रारीचे निवारण करता येणार नाही. त्यामुळे सदरहू तक्रार मंजूर करण्यांत येत आहे.

## आदेश

**१. तक्रार मंजूर करण्यांत येत असून, तक्रारदार यांना संबंधित नस्तीमध्ये झालेल्या कार्यवाहीच्या संदर्भात कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामूल्य उपलब्ध करुन देण्यांत याव्यात.**

**२. तक्रारदार  व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**दि.२/५/२०११** **(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती  आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**
**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र-मुमाआ-२०११/३१०७/तक्रार क्र.२०/२०१०/**

**श्री.संजय मसंद** **तक्रारकर्ता**
**पंकज महल, ७०८, लिकिंग रोड,**
**खार वेस्ट, मुंबई ४०००५२**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जनरल सेक्रेटरी**
**खार जिमखाना, १३ वा रोड खार, वेस्ट, मुंबई ४०० ०५२**

**२. जन माहिती अधिकारी तथा जनरल सेक्रेटरी** **गैरतक्रारदार**
**खार जिमखाना, १३ लर रोड खार, वेस्ट, मुंबई ४०० ०५२**

***---निर्णय---***

**तक्रारीचा दिनांक १.५.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २.५.२०११**
**तक्रारदार- उपस्थित गैरतक्रारदार- अनुपस्थित**

**तक्रादार यांनी खार जिमखाना यांच्याकडे दि.१.५.२०१० रोजी त्यांचे एकूण सभासद नं. ए ३६१/ओ/एल च्या संदर्भामध्ये एकूण १६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली सिून येते. परंतू त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८(१)प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे.**

**सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून दि.२९.३.१०११ रोजी खुलासा सादर करावा अशी नोटीस जनरल सेक्रेटरी, खार जिमखाना १३ वा रोड, खार जिमखाना यांना पाठविण्यांत आली होती. परंतू कोणत्याही प्रकारचा खुलासा जनरल सेक्रेटरी, खार जिमखाना यांनी न केल्यामुळे सदरहूं तक्रारी ही सुनावणीस लावण्यांत आली आहे. सुनावणीसही खार जिमखाना तर्फे कोणीही प्रतिनिधी हजर झालेले नाहीत. त्यावर तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, खार जिमखाना यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदी लागू होतात. कारण खार जिमखान्यास शासनाकडून सवलतीच्या दरात भाडे तत्वावर जमिन मिळालेली आहे. व त्यामुळे माहिती अधिकारी अधिनियम २००५ चे कलम २(ज) मधील सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत खार जिमखान्याचा समावेश होतो व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. अपिलकर्ता यांनी दाखल केलेले कोणतेही कागदपत्र ही अधिकृत कागदपत्र ही कागदपत्र Land lease Scam unearthed in Mumbai submitted by Shailesh Gandhi यांनी दिलेल्या निवेदनाची त्यांनी छायांकित प्रत जोडलेली आहे व त्यामुळे खार जिमखाना यांना ज्या जागेचे वाटप झालेले आहे याबाबत माहिती दिलेली आहे. एकूणच तक्रारदार यांनी दाखल केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यांचे म्हणण्यामध्ये तथ्य दिसून येते व तसे असल्यास खार जिमखाना यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदी लागू होतात. परंतू तरीही खार जिमखाना यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी एक संधी देणे आवश्यक आहे व शासनाकडून त्यांना कशी मदत झालेली आहे किंवा नाही याबाबत त्यांनी आयोगासमक्ष येऊन खुलासा करणे आवश्यक आहे. मात्र तसे न केल्यास त्यांचे विरुध्द एक तर्फी निर्णय देण्यांत येईल किंवा त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम १८(३)अन्वये प्रक्रिया संहितेनुसार वॉरट सुध्दा काढण्यांत येते व तक्रार यांना नुकसान भरपाई देण्याचे**

सुध्दा आदेश करण्यांत येतील याबाबतची नोंद खार जिमखाना यांच्या अधिका-यांनी घ्यावी व त्यांनी दि.३.६.२०११ रोजी आयोगासमोर उपस्थित रहावे. त्याचे सदरचे अपील मंजूर करण्यांत येत आहे.

**आदेश**

१. तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यांत येत असून खार जिमखाना यांचे संबंधित अधिका-यांनी दि.३.६.२०११ रोजी आयोगासमोर उपस्थित राहून तक्रारदार यांच्या दि.१.५.२०१० रोजीच्या अर्जान्वये आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीबाबत खुलासा सादर करावा अन्यथा संबंधित अधिका-याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे पुढील कार्यवाही करण्यांत येईल याची नोंद घ्यावी

२. तक्रारकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

दि.२८/४/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र-मुमाआ-२०११/४८६००/तक्रार क्र.२६/२०१०/**

**श्री.अजितकुमार पंजाबी तक्रारकर्ता**
**व्दारा- रमजान भटार चाळ नं.२६३/५,**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, तक्यावार्ड,**
**कुर्ला, पश्चिम, मुंबई ४०० ०७०**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**परिरक्षण खाते पी उत्तर विभाग कार्यालय,**
**मालाड पश्चिम,मुंबई ४०००६४**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, गैरतक्रारदार**
**परिरक्षण खाते पी उत्तर विभाग कार्यालय,**
**मालाड पश्चिम,मुंबई ४०००६४**

***---निर्णय---***

**तक्रारीचा दिनांक २८.६.२०१०**

सुनावणीचा दिनांक २.५.२०११

तक्रारदार- उपस्थित गैरतक्रारदार- उपस्थित.

तक्रारदारर यांनी दि.२८.६.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे त्यांच्या दि.९.१०.२००९ रोजीच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८(१)प्रमाणे तसेच अपिल क्र.५६८०/०२ च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, दि.२.१.२०१० रोजी तक्रारदार यांनी रु.११०/- चा माहितीच्या खर्चाचा भरणा करावा असे कळविण्यांत आले होते त्यावर तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२३.६.२०१० रोजी व्दितीय अपिलाचा निर्णयानंतर त्यांनी खर्चाचा भरणा केलेला आहे. परंतू अद्याप माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी तथा सहा,अभियंता, पी/उत्तर, श्री कदम यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांचा खर्चाचा भरणा केला असेल तर जन माहिती अधिकारी यांना त्याची पोंच पावती दाखवून माहिती उपलब्ध करुन घेता येईल. परंतू अद्यापपर्यत त्यांचे कार्यालयात ते केव्हाही आलेले नाहीत. त्यावर तक्रारदार यांनी सांगितले की, त्यांचे प्रतिनिधी गेलेले होते परंतू माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. याबाबत तक्रारकर्ता यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन घेतलेली नाही असे दिसून येते. त्यामुळे तक्रारदार यांनी जन माहिती अधिकारी श्री. कदम यांचेकडे व्यक्तिशः संपर्क साधून खर्चाचा भरणा केलेला असल्यास त्याची पोच दाखवून माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील त्यामुळे सदरची तक्रार अमान्य करण्यांत येत आ**हे.**

**आदेश**

**२. तक्रार अमान्य करण्यांत येत आहे.**

**२. तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**दि.२/५/२०११ (विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र-मुमाआ-२०११/४२२५३/तक्रार क्र.७३७/२०१०/**

**श्री.हरीबा महादेव चोपडे तक्रारकर्ता**
**सावित्रीबाई माळीण चाळ, परीघ खाडी वसाहत,**
**एल.बी.एस.मार्ग. सुधाकर स्टोअर्सच्या पाठीमागे**
**खो.नं.३,कुर्ला पश्चिम, मुंबई ४०० ०७०**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उप आयुक्त(प्रतिबंधक)**
**गु.शा.गुन्हे अन्वेषण विभाग,**
**छत्रपती शिवाजी मंडई २ रा मजला, एमआरए मार्ग,मुंबई**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक गैरतक्रारदार**
**परिरक्षण खाते पी उत्तर विभाग कार्यालय,**
**मालाड पश्चिम,मुंबई ४०००६४**

***---निर्णय---***

**तक्रारीचा दिनांक २.६.२०१०**
सुनावणीचा दिनांक २.५.२०११
तक्रारदार- उपस्थित गैरतक्रारदार- उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.२.६.२००९ रोजी आयोगाच्या दि.७ मे २००९ च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८(१)प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी आयोगाकडे असे सांगितले की, त्यांना अहवाल मिळालेला आहे परंतू अहवाल बरोबर आहे किंवा चुकीचा आहे हे समजून येत नाही. त्यावरुन जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माहिती अधिकार अधिनियम २००५च्या तरतूदीप्रमाणे माहिती जशी आहे तशी उपलब्ध होते व त्यामुळे अहवाल बरोबर आहे किंवा चुकीचा आहे याबाबत राज्य माहिती आयोगास निर्णय घेता येणार नाही.

त्याप्रमाणे तक्रारदार यांना माहिती उपलब्ध झालेली आहे हे त्यांनी मान्य केलेले असल्यामुळे व अहवालाच्या संदर्भामध्ये गुणवत्तेच्या बाबत राज्य माहिती आयोगास हस्तक्षेप करता येत नसल्यामुळे सदर तक्रार निकाली काढण्यास पात्रआहे.

**आदेश**

**२. तक्रार निकाली काढण्यांत येत आहेत.**

**२. तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**दि.२/५/२०११ (विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**
**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ-नो.क्र.१३६९/अपील क्र.६६१२/२०१०/**
**क्र-मुमाआ-नो.क्र.१३६३/अपील क्र.६६३५/२०१०/**

**१. श्री.रमेश झाडे** **अपीलार्थी**
**२/७०४, श्री.शाश्वत कॉम्पलेक्स प्लेझंट पार्क,**
**मिरा रोड, जिल्हा ठाणे ४०११०७**

**२.राष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता मंच**
**२/७०४ श्री.शाश्वत कॉम्पलेक्स प्लेझंटपार्क,**
**मिरा भाईदर रोड, मिरारोड, जि.ठाणे ४००११०७**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कुलगुरु**
**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती**

**२. जन माहिती अधिकारी तथा संचालक** **उत्तरवादी**
**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती**

***---निर्णय---***

**अपिल क्रमांक ६६१२**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २७.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक ३.५.२०११**

अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२१.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,संचालक, अमरावती विद्यीपठ यांचेकडे :- मुद्या क्र.१ विद्यापीठांतर्गत येणा-या संलग्नित महाविद्यालयामध्ये दि.११.७.२००९ पासून अर्जाच्या तारेखपर्यत अधिव्याख्याता पदी निवड झालेले पी.एचडी धारक(non-Net-set)उमेदवाराची निवउ समिती अहवाल देण्यांत यावा.

मुद्या क्र.२ तसेच वरील क्र.१ मध्ये निवड समितीने निवड न केलेल्या पण मुलाखत दिलेल्या मुलाखतीला बोलविलेल्या उमेदवारांचे नांव, शैक्षणिक अर्हता यासह माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे.

२. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.११.८.२०१० रोजी कलम ८(१)(घ) नुसार माहिती अधिकाराचा अर्ज असलयामुळे माहिती पुरविण्याचे आबंधन असणार नाही असे कळविण्यांत आले त्यामुळे दि.१६.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दि.२९.९.२०१० रोजी देण्यांत आला असून अपिलार्थी सुनावणी गैरहजर असल्याने कुलगुरु तथा अपिलीय अधिकारी यांनी सदर अपील खारीज केले असे अपिलीर्थीस कळविण्यांत आल्याचे दिसून येते.

३. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणामधील नियुक्तीच्या संदर्भातील माहिती ही गोपनीय असू शकत नाही व त्यामुळे अधिनियमाच्या कलम ८(१)(घ)नुसार उपलब्ध करुन देता येणार नाही, याबाबतचे कारण देता येणार नाही. सदरची माहिती ही कोणत्याही प्रकारे वैयक्तिक व त्रयस्थ पक्षाची माहिती नाही व त्यामुळे ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे त्यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी हे सदरची माहिती ही वैयक्तिक माहिती देता येणार नाही म्हणून अधिनियमाच्या

कलम ८(१)(घ) मध्ये उल्लेख केलेला आहेअसे आयोगापुढे सांगितले. तसेचअपिलकर्ता गैरहजर नाही या कारणास्तव अपील खारीज करणे योग्य नाही. कारण अधिनियमाच्या कलम १९(५)अन्वये माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबादारी ही जन माहिती अधिकारी यांची आहे व त्यामुळे अपिलकर्ता हे प्रथम अपिलाच्या सुनावणीस हजर जरी राहिले असते तरी माहिती उपलब्ध झाली नाही या पलिकडे अपिलकर्ता काहीही सांगू शकत नाही व अपिलकर्ता यांनी माहिती कां मागितली ? हे अपिलकर्ता यांना विचारता येत नाही. यापुढे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकर्ता गैरहजर असले तरी जन माहिती अधिकारी यांना विचारुनच माहिती घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश देणे आवश्यक आहे.

४. अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली असली तर ती पूर्ण दिशाभूल करणारी असल्याचे अपिलकर्ता यांचे म्हणणे असल्यास त्यांनी सुनावणीस उपस्थित राहणे आवश्यक असते, अन्यथा अपिलकर्ता गैरहजर आहे याकारणास्तव '**अपिल खारीज** ' करणे योग्य नाही. त्यामुळे अपिलकर्ता याचा युक्तीवाद योग्य आहे.

५. कोणत्याही सार्वजनिक कार्यालयात किंवा प्राधिकरणाचे अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती ही ती योग्य माध्यमाव्दारे मुलाखत घेऊन झाली असे वाटत असली तरी त्याबाबत पारदर्शकता असणे आवश्यक आहे व त्या पारदर्शकतेच्या दृष्टीने सदरहूं माहिती प्रकट करणे आवश्यक आहे तसेच कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणातील अधिका-याची/कर्मचा-याची सेवा विषयी माहिती ही वैयक्तिक माहिती होत नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांनी मुद्या क्र.१ च्या संदर्भात मागितलेली माहिती, निवड समितीचा अहवाल इ. माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>अपिल क्र. ६६३५</u>**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २०.११.२०१०**

अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचेकडे महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.संकिर्ण २००९/३२७/०९ विशि-१ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई दि.१७ मे २०१० च्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते.

२. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून दि.२०.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय अपिलकर्ता हजर नसल्यामुळे अपील खारीज करण्यांत आलेले आहे व त्यामुळेच अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे. अपिलकर्ता यांच्या दि.३.७.२०१० चा अर्ज हा दि.२२.७.२०१० माहिती पुरविण्यासाठी महाविद्यालयाकडे पाठविण्यांत आला, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. माहिती पाठविण्यासाठी तयार करण्यांत आलेली होती. परंतू अर्जदाराचे दि.२०.८.२०१० चे अपील अपिलीय अधिकारी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचेकडे प्राप्त झाल्यामुळे व त्यावेळी सुनावणीसाठी उपस्थित राहणेबाबत अपीलकर्त्यास विद्यापीठ पत्र दि.१७.९.२०१० नुसार कळविण्यांत आले असल्याने माहिती पाठविण्यांत आली नाही, असेही त्यांनी आयोगापुढे सांगितले. अपिलकर्ता सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत म्हणून अपील खारीज करण्यांत आलेले आहे. त्या संदर्भात अपिल क्र.६६१२/०३ मध्ये वर दर्शविलेले पहावे व अपिलकर्ता यांनी त्यांच्या अर्जाची माहिती १० दिवसांत आत विनामूल्य रजिस्टर पोस्टाने पाठविणे संयुक्तिक राहिल त्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१. **अपिलकर्ता यांचे अपिल क्र.६६१२ व ६६३५ ही दोन्ही अपिले मंजूर करण्यांत येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना त्यांचे दि.२१.६.२०१० व दि.३.७.२०१० रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने माहितीच्या कागदपत्राच्या छायांकित प्रती विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात तसे न केल्यास जन माहिती अधिकरी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी**

२. **अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

दि.३/५/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ-नो.क्र.५९९/अपील क्र.६६१३/२०१०/**

**१. श्री.प्रसाद बालाजी तुळसकर** **अपीलार्थी**
**२०, परशुराम बिल्डिंग, राम मारुती रोड,**
**दादर, मुंबई ४०० ०२८**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप प्रमुख अभियंता (परिमंडळ-४)**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनरर्चना मंडळ,**
**सोनावाला बिल्डिंग, शंकर लालाजी पालव मार्ग,**
**दादर, मुंबई ४०० ०१४**

**२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता** **उत्तरवादी**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनरर्चना मंडळ,**
**सोनावाला बिल्डिंग, श्ांकर लालाजी पालव मार्ग,**
**दादर, मुंबई ४०० ०१४**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक ५.६.२०१०**
**सुनावणीचा दिनांक ३.५.२०११**

अपीलार्थी व जन माहिती अधिकारी अपिलीय अधिकारी उपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.७.११.२००९ रोजी कार्यकारी अभियंता,(इमारत प्रस्ताव)प्लॉट नं.५ परशुराम बिल्डिंग, टीपीएस नं.४, माहिम डिव्हिजन, एफ.पी.नं.१६१ राम मारुती रोड, दादर, वेस्ट मुंबई २८ च्या रिपेअरिंगच्या संदर्भात एकूण १० मुद्यावर माहिती मागितलेली दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने तसेच दि.३.११.२००८ रोजी दिलेल्या अर्जाच्या सदंर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. या अर्जाच्या अनुषंगाने दि.८.१२.२००९ रोजी अपिलकर्ता यांना मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि.१६.११.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या दि.७.११.२०१० रोजी च्या अर्जाच्या मुद्यांप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांचे अर्जात जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्यावर जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय मागितलेले आहेत. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे माहिती या संज्ञेची व्याख्या २(च)मध्ये केलेली आहे. त्याप्रमाणे उपलब्ध कागदपत्रासंबंधीची माहिती उपलब्ध होते त्यावर कोणत्याही प्रकारचे जन माहिती अधिकारी यांचे अभिमत किंवा अभिप्राय देण्याची तरतूद नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली असली तरी त्यांच्या प्रश्नांची उत्तरेही देण्यांत आलेली नाहीत. त्यावर अपिलकर्ता यांनी असे सांगितले की, मुद्या क्र.७ व ८ मध्ये जी माहिती मागितली आहे त्याबाबत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सन १९९५-९६ या कालावधीतील इमारत दुरुस्ती झालेली आहे त्या बाबतची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिले असते परंतू नस्ती आढळून नसल्याने ती देता येत नाही. परंतू ज्या अर्थी इमारत उभी आहे व त्या ठिकाणी

लोक रहतात त्यावरुन त्या इमारतीच्या दुरुस्तीच्या संदर्भातील संपूर्ण नस्ती या नष्ट करता येणार नाही व त्या उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांना त्यातील माहिती उपलब्ध करुन द्यावी.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे पुन्हा असेही सांगितले की, नियमाप्रमाणे इमारत दुरुस्तीसाठी कार्यकारी अभियंता यांना पत्र दिली जातात त्याप्रमाणे ती प्रक्रिया सुरु होते त्यासाठी कोणत्याही इमारत दुरुस्तीच्या संदर्भामध्ये इमारत मालकाला परवानगी दिल्यापासून पुढील सर्व कार्यवाहीची माहिती त्या नस्तीतील कागदपत्रांच्या स्वरुपात छायांकित प्रतीच्या स्वरुपात अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व यातूनच अपिलकर्ता यांच्या प्रश्नाचे उत्तर त्यांना उपलब्ध करुन घेता येईल. आयोगाकडे सदर नस्तीतील कागदपत्र दाखल केलेली आहेत त्यावरुन असे दिसून येते की, अपिलकर्ता यांना सुध्दा वेळेवेळी त्या संदर्भातील पत्रव्यवहार दिलेला दिसून येतो व त्यातून त्यांना माहिती वेळोवेळी दिलेली आहे असे दिसून येत असलेतरी अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यांस पात्र आहे.

## आदेश

**१. अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून त्यांना हव्या असलेल्या परशुराम बिल्डिंगच्या दुरुस्तीच्या संदर्भातील ज्या ज्या नस्ती उपलब्ध असतील (नस्ती उपलब्ध नसल्यास पोलिसाकडे एफ.आय.आर. दाखल करावे) त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेण्यांत याव्यात तसेच दुरुस्तीच्या संदर्भात जर परिपत्रके किंवा मार्गदर्शक तत्वे असतील त्याबाबतचे कॉम्पेडीयन त्याबाबत कागदपत्राच्या खर्चाचा भरणा अपिलार्थीने केल्यानंतर उपलब्ध करुन द्याव्यात.**

**२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**दि.३/५/२०११** **(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**
**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ-नो.क्र.३६२/अपील क्र.६६१४/२०१०/**

**१.श्रीम.विलासिनी शिवराम पांचाळ** **अपीलार्थी**
**आग्रीपाडा, बी.आय,डी.बि.नं.१३/१३**
**एम.जी.मार्ग,मुंबई ४०० ०११**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विक्रीकर सहा.आयुक्त. (वसूली)**
**विक्रीकर आयुक्त यांचे कार्यालय, १० वा मजला, माझंगाव,मुंबई ४०० ०१०**

**२. जन माहिती अधिकारी तथा अप्पर विक्रीकर आयुक्त(आस्था)** **उत्तरवादी**
**विक्रीकर आयुक्त यांचे कार्यालय, १० वा मजला, माझंगाव,मुंबई ४०० ०१०**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक १६.६.२०१०**
**सुनावणीचा दिनांक ३.५.२०११**

अपीलार्थी व जन माहिती अधिकारी,अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.४.२.२०१० रोजी वेगवेगळया आस्थापना, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे दि.२२.१२.२०१० च्या निकालानुसार १९८४ पासून कालबध्द पदोन्नतीने मिळणारी उच्च स्तरीय वेतनश्रेणी मंजूर करुन थकबाकीची रक्कम व कालबध्द पदोन्नतीचे आदेशाची प्रत मिळणेबाबत तसेच न्यायालयाच्या निकालाची प्रत शासन निर्णय दि.१७ऑक्टोबर २००९ ची प्रत व विधी न्याय विभाग यांचे दि.२० जानेवारी २०१० चे कार्यालयीन आदेशाची प्रत त्याकरीता जोडत आहेत असा अर्ज केलेला दिसून येतो. सदरहूं अर्जाच्या अनुषंगाने त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.८.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपिलाचा निर्णय दि.७.५.२०१० रोजी देण्यांत आला असून अपिलकर्ता यांनी न्यायालयाच्या निकालाच्या आदेशाची प्रत महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय दि.१५.१०.२००९ रोजी कालबध्द पदोन्नती सेवांतर्गत प्रगती योजना विहित मुदतीत विभागीय परिक्षा उत्तीर्ण न झालेल्या कर्मचा-यांना लाभ अनिवार्य करण्याच्या संदर्भात सुधारित स्पष्टीकरणाचे २००९ च्या आदेशाची प्रत त्वरीत द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात व त्याने समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की,त्यांना अजून पर्यत कालबध्द पदोन्नतीच्या संदर्भामध्ये निर्णय दिलेला नाही व त्यामुळे कालबध्द पदोन्नतीच्या आदेशाचा क्रमांक मिळावा अशी त्यांनी मागणी केलली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे सांगितले की, त्यांचा अर्ज दि.९.२.२०१० रोजी प्राप्त झाला व दि.११.२.२०१० रोजी विकआ ३-४ यांचेकडे पाठविण्यांत आला मात्र अपिलकर्ता यांना दि.१४.७.२०१० रोजी माहिती देण्यांत आलेली आहे असे आयोगास सांगण्यांत आले. त्यावर पुन्हा अपिलकर्ता यांनी आयोगापुढे कालबध्द पदोन्नती, पेन्शन,डयुज त्यानंतर दि.१९.१२.२००८ चे आवेदन पत्र तसेच दि.२९.१२.२०१० च्या निवेदनानुसार दि.२६.५.२००८ च्या २३ कर्मचा-यांच्या कालबध्द पदोन्नतीचे आदेश निर्गमित केले नाहीत. दि.३१.१२.२००८ च्या आदेशात दि.१.१२.२००६ रोजी १३ महिने उशिरा म्हणजे दि.३०.१२.२००७ पासून चुकीचे आदेश निर्गमित केले. त्यावर शिस्त भंगाची कारवाई करावी व नुकसान भरपाई मिळावी असे त्यांनी लेखी दिलेले आहे.

अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २(च) प्रमाणे कागदपत्राच्या स्वरुपात माहिती नाही तरी त्यांना निवेदनाच्या संदर्भामध्ये जी कार्यवाही करुन हवी आहे व चुकीची

कार्यवाही केली त्याबाबत जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती लावावी व त्यांना नुकसान भरपाई मिळावी अशी विनंती केलेली आहे. परंतू **कोणत्याही प्रकरणातील गुणवत्तेबाबत तपासणी किंवा निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये कार्यवाही करण्याचे अधिकार हे आयोगास नाहीत त्यामुळे त्यांच्या पदोन्नती संदर्भामध्ये चुकीचे निर्णय घेतले असतील तर त्याबाबत कोणत्याही प्रकारची कारवाई किंवा नुकसान भरपाई ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे देता येणार नाही** असे असले तरी दि.७.७.२०१० रोजी माहिती दिलेली आहे. त्यामुळे कु. पांचाळ यांचा मुळ अर्जासोबत महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण,मुंबई यांचा निर्णय जोडलेले आहे. तसेच निकालाच्या अनुषंगाने विचारलेली माहिती आस्थापना अभिलेख्यावर उपलब्ध नाही तसेच कु.पांचाळ यांचा मुळ अर्ज महाराष्ट्र शासनाचे वित्त विभाग, दि.१५.१०.२००९ जोडलेले आहे . सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने विचारलेली माहिती या आस्थापना अभिलेख्यावर उपलब्ध नाही अशा प्रकारे कळविण्यांत आलेले दिसून येते. माहिती विलंबाने देण्याचे कारण सदर अर्ज अप्पर विक्रीकर आयुक्त, आस्थापना यांना अग्रेषित केलेला आहे. सदर अभिवेदनावर माहिती अधिकार कायदा असे किंवा तसाच उल्लेख असल्याचे दिसून येत नाही. त्याचप्रमाणे सदर अर्ज महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००५ नियम-३ नुसार नमूद केलेला नसल्यामुळे सदर अभिवेदन माहिती अधिकार कायदा २००५ च्या अंतर्गत नाही अशी या कार्यालयाची धारणा आहे. कु.विलासिनी पांचाळ यांच्या दि.४.२.२०१० चे अभिवेदनात अधिकारी/कर्मचारी यांना विभागीय परिक्षेतून सूट देण्याबाबतचा दि.२९.१.२०१० च्या शासन निर्णयाशी निगडीत असल्यामुळे अप्पर विक्रिकर आयुक्त, आस्थापना, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी कु.पांचाळ यांचे् प्रकरण प्रतिक्षाधीन ठेवावे असे निर्देश दि.१६.२.२०१० रोजी दिलेले आहेत अशा प्रकारची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येत आहेत.**

**२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**दि.५/५/२०११** **(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ-नो.क्र.५८८/अपील क्र.६६१५/२०१०/**

**१.श्री. मोहन रंगनाथ बांगर** **अपीलार्थी**
**१/३, सचित, निवास प्लॉट नं.२७९**
**सेक्टर २८ वाशी, नवी मुंबई.**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा**
**पुनवर्सन उपमुख्य अधिकारी पुनवर्सन गाळे,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनवर्सन मंडळ, बांद्रा पूर्व, मुंबई.५१**

**२. जन माहिती अधिकारी तथा** **उत्तरवादी**
**पुनवर्सन उपमुख्य अधिकारी पुनवर्सन गाळे,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनवर्सन मंडळ, बांद्रा पूर्व, मुंबई.५१**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक १.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक ३.५.२०११**

अपीलार्थी उपस्थित व जन माहिती अधिकारी,अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.१०.३.२०१० रोजी रामदेव निवासी नुरबाडा,मुंबई-९ येथील गाळा क्र.४ माझ्या वडिलांच्या नावे आहे ती माझ्या नावे करण्याबाबत दि.१७.२.२०१० रोजी दिलेल्या अर्जाची माहितीच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती मिळावी असे जन माहिती अधिकारी तथा पुनवर्सन अधिकारी मंडळ, बांद्रा, मुंबई यांचेकडे अर्ज केलेलाआहे.

अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१७.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतू प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे. अपिलार्थी उपस्थित होते परंतू उत्तरवादी गैरहजर होते.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरच्या इमारतीच्या संदर्भामध्ये दि.१५.२.१०१० रोजी श्री. रामजी पंडाया यांनी उपमुख्य अधिकारी, पुनवर्सन दुरुस्ती मंडळ, मुंबई यांचेकडे केलेल्या अर्जाची प्रत जोडलेली आहे. अपिलकर्ता यांच्या दि.१७.२.२०१० रोजीच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते दोषी आढळून येत आहेत व त्यामुळे त्याचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. तसेच अपिलकर्ता यांच्या प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये सुध्दा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची दाखल घेतलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द प्रशासकिय कारवाई होणे आवश्यक आहे व त्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यांस पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

1. **अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांच्या १७.२.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देण्यांत यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.**

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांच्या दि.१०.३.२०१० रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मदुतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांचेविरुध्द माहिती अधिकारी अधिनियम कलम २०(१)शास्ती लादणे आवश्यक आहे. त्यापूर्वी जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत आयोगासमोर समक्ष उपस्थित राहून खुलासा सादर करावा अन्यथा सदरची शास्ती कायम करण्यांत येईल व त्यांचे दरमहाच्या वेतनातून शास्तीची वसूली करण्यांत येईल.

३. अपिलकर्ता यांचे प्रथम अपिल अर्जाच्या संदर्भात अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाची सुनावणी न घेतल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीचे उल्लंघन केलेले असून त्यांचे विरुध्द प्रशासकिय कारवाई होणे आवश्यक आहे. तरी त्यांचे विरुध्द संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी प्रशासकिय कारवाई करावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनवर्सन मंडळ, बांद्रा पूर्व, मुंबई. यांना स्वतंत्रपणे प्रत देण्यांत यावी.

३. अपिलकर्ता  व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

दि.५/५/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ-नो.क्र.१५९५/अपील क्र.६६१६/२०१०/**

**१.श्री. भालचंद्र म.गायतोंडे** **अपीलार्थी**
**९/१० मंदार अपार्टमेंट,**
**सरस्वती बाग, जोगेश्वरी पूर्व, मुंबई ४०००६०**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.पालिका आयुक्त**
**बृहन्मुंबई महागरपालिका, के पूर्व विभाग कार्यालय**
**रु.नं.२०६ आझाद रोड, अे.के.रोड समोर, गुंदावली अंधीर पूर्व मुंबई ४०००६९**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहा.करनिर्धारक व संकलक** **उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महागरपालिका, के पूर्व विभाग कार्यालय**
**रु.नं.२०६ आझाद रोड, अे.के.रोड समोर, गुंदावली अंधीर पूर्व मुंबई ४०००६९**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक ११.०५.२०१०**
**सुनावणीचा दिनांक ३.५.२०११**

अपीलार्थी उपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित.अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक ३.१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी कर निर्धारक यांचेकडे Defination of Addtion & extention[ Revision of assessment, Old property Mean rate of old rate or new rate याबाबत २००५-०६ मधील एकूण अे ते एफ एवढया मुद्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.६.२.२००९ रोजी उत्तर दिलेले दिसून येते त्यांने समाधान झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.१२.२.२००९ रोजी प्रथम अपिल अपिल दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपिलाचा निर्णय दि.२४.२.२००९ रोजी देण्यांत आला असून माहिती उपलब्ध करुन दिलेले आहे व माहिती अधिकारी अधिनियम २००५ मधील २(च)प्रमाणे माहिती ही कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यांत येते व तशी त्यांनी मागितलेली नसल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यांत येत आहे असा दिलेला दिसुन येतो.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी सर्क्युलर दिलेले आहे परंतू त्या सर्क्युलर मधील शब्दांचा अर्थबोध न झाल्यामुळे करनिर्धारण केलेले आहे. याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्याकरिता प्रत्येक विशिष्ट विभागातील शाखाकडे संपर्क साधण्याबाबत कळविण्यांत आले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलकर्ता यांना परिपत्रके, नियमांच्या प्रती मिळालेल्या आहेत. परंतू त्यांना आता परिपत्रकातील नियमाच्या मधील ' **शब्दांचा अर्थ** ' त्यांनी मागितलेला आहे व ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे अपेक्षित नाही. त्यामुळे ते त्यांना देण्यांत आलेले नाही असे असले तरी अपिलकर्ता यांना परिपत्रके, नियमाच्या प्रती देण्यांत आलेल्या असल्या तरी मुख्यालयाकडून आलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे कर निर्धारण केले जाते तर त्या मुख्यालयातून आलेल्या मार्गदर्शकांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून अपिलकार्त यांनी मुख्यालयाकडून मिळालेल्या मार्गदर्शक तत्वाच्या छायांकित प्रती तसेच त्यांच्या दि.३.१.२००९ च्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जर कागदपत्राच्या, परिपत्रकाच्या, निर्णयांच्या किंवा आदेशाच्या स्वरुपात माहिती उपलब्ध असेल तर त्यांना उपलब्ध करुन देण्यांत यावी. सदरची माहिती वैयक्तिकरित्या घेणार असल्यामुळे अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधून सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यांत यावी.

२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

दि.५/५/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९५०१/अपील क्रमांक ६६०९/२०१०**

**श्री. मुनाफ बारमारे,**
**३०१, रोमलुई अपार्टममेंट, ३रा मजला,**
**पितांबर लेन, माहिम, मुंबई-४०००१६. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मुंबइ(१) शहर मुंबई,**
**६वा मजला, मल्होत्रा हाऊस, जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक(जी/एन विभाग),**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मुंबइ(१) शहर मुंबई,**
**६वा मजला, मल्होत्रा हाऊस, जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २१.०८.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ३.५.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

**आदेश**

अपिलकर्ता यांनी दि.२८.९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे एकूण १५ मुद्यांमध्ये त्यांनी वेळोवेळी केलेल्या अर्जांच्या संदर्भात कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.७.६.२०१० रोजी अपिलकर्ता यांना मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि.२४.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, अपिलकर्ता यांच्याविरुध्द अनुदान थकबाकी काढण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांना योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे पुढीलप्रमाणे लेखी खुलासा दाखल केलेला आहे:-

अपीलाच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या वतीने श्री.मुनाफ बरमारे यांचा माहितीची मागणी करणारा मुळ अर्ज दि.२८.५.२०१० व त्या अर्जातील प्रत्येक मुद्यास(एकूण मुद्दे १६) या कार्यालयाने दिलेले उत्तर दि.७.६.२०१० व त्या अनुषंगाने सादर केलेले म्हणणे/उत्तर यांच्या प्रती सोबत जोडून सादर करीत आहे. कृपया यातील सर्व म्हणण्याचा/उत्तराचा विचार या द्वितीय अपीलातील जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून व्हावा ही नम्र विनंती.

याशिवाय खालीलप्रमाणे म्हणणे आपणासमोर सादर करीत आहे-

१) या कार्यालयाने श्री.बरमारे व त्यांची संस्था यांच्या संदर्भातील कार्यवाहीच्या संदर्भात या कार्यालयाचा प्रत्येक कागद श्री.बरमारे यांना संबंधित तक्रारदार म्हणून वेळोवेळी दिलेलाच आहे पण तरीसुध्दा त्यांना अभिलेखाचे स्वतः निरिक्षण करुन आणखी काही न मिळालेली कागदपत्रे हवी असल्यास ती न्यावीत म्हणून दि.२१.९.२०१० रोजीच्या

पत्राने कळवूनसुध्दा ऑक्टोबर महिन्यातील दि.१६.१०.२०१०, ३०.१०.२०१० व नोव्हेंबर महिन्यातील दि.२०.११.२०१० या तीनपैकी कोणत्याही तारखेस या कार्यालयात श्री.बरमारे उपस्थित राहिलेले नाहीत हे नम्रपणे निदर्शनास आणून देत आहे.

२) आपणासमोरील दि.१३.१०.२०१० रोजीच्या श्री.बरमारेंच्या दुस-या एका अर्जाच्या द्वितीय अपीलातील सुनावणीचे वेळी आपण श्री.बरमारे यांना दि.२०.११.२०१० प्रस्तुत अधिका-यांच्या कार्यालयात श्री.बरमारे यांनी उपस्थित राहून कागदपत्रांचे निरिक्षण करुन प्रती न्याव्यात असे सुचित केलेले आहे. मात्र दि.२०.११.२०१० रोजी श्री.बरमारे प्रस्तुत अधिका-यांच्या कार्यालयात हजर राहिलेले नाहीत. तसा अहवाल या कार्यालयाने माहिती आयोगास स्वतंत्र पत्राने सादर केलेला आहे. त्या दि.२९.११.२०११ रोजीच्या पत्राची प्रतसधुदा सोबत जोडून सादर करीत आहे.

३) श्री.बरमारे यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने या कार्यालयाने खालीलप्रमाणे सहकार कायद्याअंतर्गत कारवाई केलेली आहे ती आपल्या निदर्शनास आणून देत आहे.

* दि.१४.१०.२०१० रोजीच्या पत्राने संस्थेची सुमारे २९९ एवढी कागदपत्रे जा.क्र.उपनि/११५६ व ११५७ अन्वये पोस्टाने त्यांना पाठविलेली आहेत.

* कलम ८३ अन्वये त्यांच्या सर्व तक्रारींची चौकशी करुन चौकशी अहवाल दि.१६.१०.२०१० रोजी चौकशी अधिका-यांनी सादर केलेला आहे. श्री.मुनाफ बरमारे यांना या अहवालाची प्रत घेवुन जाणे विषयी कळविलेले असूनही (दि.२८.१०.२०१०) त्यांनी ती नेलेली नाही.

यावरुन प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सहकार कायद्यानुसार कारवाईस ते सहकार्य देत नाहीत हे स्पष्ट होते. माहितीच्या कायद्यानुसार कागदपत्रे मिळतील हे कळवूनही ते त्या मुद्यांकडे सोईस्करपणे दुर्लक्ष करतात.

वरील पार्श्वभूमी विचारात घेता असे स्पष्ट होते की, श्री.बरमारे यांना एक तर या कार्यालयाच्या अभिलेखातून सर्व माहिती/कागदपत्रे मिळाली आहेत किंवा ती माहिती कागदपत्रे मिळवण्यातच त्यांना रस नाही. म्हणून श्री.बरमारे यांचा द्वितीय अपीलाचा हेतू केवळ त्यांचेकडून संस्थेस येणे असलेल्या थकबाकीचा मुद्दा पुढे येऊ नये,दुर्लक्षित रहावा हाच आहे असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. हे कार्यालय सतत त्यांच्या अर्जांना उत्तरे देण्यात, प्रथम व द्वितीय अपीलांना उत्तरे देण्यास, सुनावणीस हजर राहण्यास व्यग्र रहावे व त्यातून प्रस्तुत कार्यालयाने पुन्हा संस्थेविरुध्दच कारवाई करावी जेणेकरुन संस्थेने सुध्दा श्री.बरमारे यांचेकडून थकीत रकमेच्या वसुलीसाठी कारवाई करु नये. परिणामी श्री.बरमारे हे थकबाकी न भरता विना मोबदला संस्थेच्या सर्व सुविधांचा लाभ आज घेत आहेत. एक प्रकारे माहितीच्या अधिकाराच्या कायद्याचा ते वैयक्तिक लाभासाठी दुरुपयोगच करीत आहेत.

म्हणून श्री.बरमारे यांचे द्वितीय अपील नामंजूर करावे.

यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे परंतु जन माहिती अधिकारी यांनी म्हटल्याप्रमाणे संस्थेस येणे असलेली थकबाकीचा मुद्दा पुढे येऊ नये तो दुर्लक्षित रहावा असा उद्देश असल्यामुळे अपिलकर्ता माहितीच्या अधिकारात अर्ज करुन माहिती मागवत असतात व माहिती मिळाली नाही तर आयोगापुढे द्वितीय अपील दाखल करत असतात असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. जन माहिती अधिकारी यांनी जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था यांच्याकडे दि.१३.७.२०१० रोजी प्रथम अपीलाच्या संदर्भात दाखल केलेले निवेदनसुध्दा स्वयंस्पष्ट आहे व अपिलकर्ता हे विनाकारण उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयास वेठीस धरुन अनेक प्रकारे अर्ज करुन माहिती मागविण्याचा प्रयत्न करीत आहेत असे दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**

**दिनांक ३.४.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाि‍र्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९५०२/अपील क्रमांक ६६१०/२०१०**

**श्री. रमेश के.जे. चौहान,**
**दिपक-ज्योती को.ऑप.हो.सो.लि.,**
**फ्लॅट नं.१०४, विंग बी, जी.डी.ए. मार्ग,**
**परेल, मुंबई-४०००३२. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मुंबइ(१) शहर मुंबई,**
**६वा मजला, मल्होत्रा हाऊस, जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक(एफ/एस विभाग),**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मुंबइ(१) शहर मुंबई,**
**६वा मजला, मल्होत्रा हाऊस, जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २१.०८.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ३.५.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

**आदेश**

अपिलकर्ता यांनी दि.३.४.२०१० रोजी माहिती मिळण्यासाठी अर्ज केलेला दिसतो. सदर अर्जाच्या अनुषंगाने दि.१५.४.२०१० रोजी अपिलकर्ता यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०च्या कलम ८९(ए)नुसार या कार्यालयाकडील आदेश क्रमांक मुंबई/सनि/एफ-एस तपासणी/कलम ८९(अे)/४७७८/२०१० दि.२९.३.२०१० अन्वये तपासणी लावण्यात आलेली आहे. तपासणी कामकाज पूर्ण होताच आपण पत्रात नमूद केलेल्या मुद्यांबाबतची/तपासणीच्या अहवालाची प्रत आपणास देण्यात येईल असे सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था एफ-एस विभाग,मुंबई यांनी कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि.२६.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२६.५.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांच्या दि.३.४.२०१० रोजी दाखल केलेल्या मुद्दा क्र.१ ते ९ नुसार मागणी केलेल्या माहितीपैकी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती त्यांना विहित शुल्क आकारुन ३ आठवडयात देण्यात यावी असा निर्णय कळविलेला दिसून येतो. परंतु त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, दि.३.४.२०१० रोजीच्या अर्जामध्ये जी माहिती मागीतलेली आहे ती त्यांना उपलब्ध झालेली नाही व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणेसुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यांनी पुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्याविरुध्द थकबाकी काढण्यात आलेली आहे व त्याबद्दल तक्रारकरतांना कोणत्याही प्रकारे योग्य ती कारवाई

केलेली नाही असे आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.२२.३.२०१०च्या पत्राप्रमाणे दि.१२.४.२०१० रोजी संपूर्ण मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तरीसुध्दा पुन्हा त्यांनी दि.३.४.२०१० रोजी तीच माहिती मागणारा अर्ज कार्यालयाकडे केलेला आहे. कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे ती त्यांना तपासणी अंती उपलब्ध करुन देता येईल असे दि.१२.४.२०१० रोजी कळविले आहे. परंतु तरीही प्रथम अपीलात त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून तक्रार केलेली आहे. वास्तविक अपिलकर्ता हे तीच माहिती अनेक प्रकारे अर्ज करुन मागत आहेत. दि.१९.५.२०१० रोजीसुध्दा अपिलकर्ता यांच्या तक्रारीच्या संदर्भात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०च्या कलम ७८(१) अन्वये आदेश करण्यात आलेले आहेत. दि.२२.७.२०१० रोजी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे खुलासा दाखल करतांना त्यांनी श्री.रमेशकुमार चव्हाण यांनी दि.२५.६.२०१० च्या पत्रान्वये त्यांच्या तक्रारीचे निराकरण केले असून त्यांचे समाधान झाले आहे व त्यांना माहिती मिळाली आहे असे पत्र सादर केलेले आहे असा खुलासा आयोगापुढे सादर केलेला आहे. त्यावरुन अपिलकर्ता यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. मात्र तपासणी अंती माहिती उपलब्ध करुन देता येईल असे जे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले त्याप्रमाणे माहिती उपलब्ध झाल्यास ती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी. अपिलकर्ता यांच्यातर्फे जे प्रतिनिधी उपस्थित होते त्यांनी युक्तीवाद करतांना त्यांच्याविरुध्द अन्याय झ ालेला आहे व थकबाकी काढलेली आहे वगैरे तक्रार केलेली आहे. यावरुन अपिलकर्ता यांनी संस्थेचे देणे देण्यासंबंधात ज्या तक्रारी केलेल्या आहेत त्या संदर्भात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम २००५ प्रमाणे कारवाई केलेली असेल तर त्याप्रमाणे त्यांना माहिती पुरवण्यात यावी. पुन्हा आयोगापुढे खुलासा करतांना अपिलकर्ता यांना त्यांच्या वेगवेगळया अर्जाप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. असे असले तरी अपिलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे कार्यालयात त्यांच्या संदर्भात जी नस्ती उपलब्ध आहे त्या नस्तीतील कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अर्जाच्या संदर्भात कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती व्यक्तीशः उपलब्ध करुन द्याव्यात. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे संपर्क साधून त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती, त्याबाबतचा खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन घ्याव्यात .**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** — **(विलास पाटील)**
**दिनांक ३.४.२०११** — **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ार्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

ˆmay 2011/PA

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९४८८/अपील क्रमांक ६६०७/२०१०**

**श्री. जीतेंद्र धनजानी,**
**१६, श्री.गोपाळ नगर, महेश नगर पोलीस स्टेशनसमोर,**
**जयपूर-३०२०१५. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा औरंगाबाद म्युनिसिपल कॉर्पोरेशन,**
**औरंगाबाद, महाराष्ट्र.**

**जन माहिती अधिकारी तथा औरंगाबाद म्युनिसिपल कॉर्पोरेशन,**
**औरंगाबाद, महाराष्ट्र. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १९.०८.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ३.५.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

**आदेश**

अपिलकर्ता यांनी दि.११.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी महानगरपालिका,औरंगाबाद यांच्याकडे Work Contract File with note sheet of solid waste management of Ramky Enviro Engineers Ltd. बाबत माहिती मागीतलेली दिसून येते. सदर माहिती अर्जासोबत त्यांनी रु.१०/-चा डी.डी.सुध्दा पाठविलेला दिसून येतो. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१६.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहेत परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेला नाही. परुतु अपिलकर्ता यांनी प्रथम अपीलासोबत त्यांचा अर्ज त्यांच्या कार्यालयात स्विकारलेला नाही याबद्दलचा पुरावा सादर केलेला आहे. सदर अर्जावरील स्पीडपोस्ट व पत्ता बरोबर असूनसुध्दा ते परत पाठविण्यात आलेले आहे व ही बाब त्यांनी प्रथम अपीलातही नमूद केलेली होती. परंतु प्रथम अपीलही प्राप्त झालेले नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. परंतु अपिलकर्ता यांनी पाठविलेले स्पीडपोस्टाचे पाकीट व त्यावरील पत्ता हा योग्य असूनसुध्दा महानगरपालिकेच्या कार्यालयाकडून जर स्पीडपोस्ट दि.१५.५.२०१० रोजी परत पाठविले असेल तर त्याबाबत योग्य ती चौकशी करणे आवश्यक आहे व ज्या कर्मचा-याने स्पीडपोस्ट परत पाठविले असेल त्याच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे. अन्यथा अशाचप्रकारे माहितीच्या अधिकारातील पोस्टाने आलेले अर्ज जर आवक लिपिक नाकारत असतील तर नागरिकांना त्यांचे अर्ज सादर करणे अशक्य होईल.त्यामुळे आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्याबाबत योग्य ती कारवाई करणे संयुक्तिक राहील.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा दाखल केलेला आहे व त्यात मागीतलेल्या माहितीच्या संदर्भातील गुणवत्तेच्याबाबत विश्लेषण केलेले आहे व माहिती पोस्टाने आयोगाकडे पाठविली आहे असे नंतरच्या खुलाशात म्हटलेले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी हे अभियंता असूनसुध्दा त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींची काही माहिती आहे असे दिसून येत नाही. राज्य माहिती आयोग कोणतीही माहिती

मागवत नसते याबद्दलची जाणीवही अभियंता यांना नाही यावरुन महानगरपालिकेमध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या संदर्भात कोणतेही प्रशिक्षण झालेले आहे असे दिसून येत नाही. आयोगाने अर्जाची प्रत पाठविल्यानंतर माहिती ही ज्या अर्जदाराने मागीतली आहे त्यांना ती पाठविणे अपेक्षित असते व हे सर्वसामान्य ज्ञान आहे. याबाबत संबंधित जन माहिती अधिकारी यांना समज देणे आवश्यक आहे. असे असले तरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना त्यांनी दिलेल्या पत्त्यावर विनामुल्य माहिती रजिस्टर पोस्टाने पाठविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या त्यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये मागीतलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने त्यांनी दिलेल्या पत्त्यावर पाठविण्यात यावी. तसे न केल्यास व तक्रार आल्यास ते शास्तीस पात्र राहतील याची त्यांनी नोंद घ्यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**३) आदेशाची १ प्रत आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांच्याकडे स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ३.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाािर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०६९५/अपील क्रमांक ६६११/२०१०**

**श्री. प्रमोद लक्ष्मण कदम,**
**१६/डी , वर्सोवा अंधेरी श्री साई सहकारी गृहनिर्माण संस्था म.,**
**एस.व्ही.पी.नगर, म्हाडा, अंधेरी(प.),**
**मुंबई-४०००५३. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा मा.मुख्याधिकारी,म्हाडा,**
**मुंबई मंडळ, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,**
**मुंबई गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मा.मुख्याधिकारी,म्हाडा,**
**मुंबई मंडळ, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,**
**मुंबई गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),मुंबई-४०००५१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २१.०२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ३.५.२०११**
**जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१८.८.२०१० रोजी मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांच्याकडे माहितीचा अर्ज करुन त्यांच्या कार्यालयाच्या वेळेची सविस्तर माहिती व टपाल स्विकारण्यासाठी असलेली निर्धारित वेळ याबाबतची माहिती मागीतलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.७.१०.२०१० रोजी पुन्हा अपीलीय अधिकारी म्हणून मुख्य अधिकारी,मुंबई मंडळ यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२९.१०.२०१० रोजी देण्यात आला असून ७ दिवसाच्या आत माहिती देण्याबाबत आदेश देण्यात आले. त्याप्रमाणे दि.८.११.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली असूनही अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहेत. द्वितीय अपीलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी ज्याप्रमाणे मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांच्याकडे माहितीचा अर्ज सादर केला होता त्याचप्रमाणे त्यांनी २०.८.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडेसुध्दा माहितीचा अर्ज दाखल केला होता व दोन्ही अर्जात एकच माहिती मागीतलेली असल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे अनवधानाने राहून गेले. परंतु त्याच माहितीकरीता अपिलकर्ता यांनी पुन्हा २ प्रथम अपीले दाखल केली. त्यानंतर मात्र त्यांना दि.१८.११.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीचे स्वरुप पहाता त्यांनी कार्यालयाच्या कामकाजाची वेळ व सार्वजनिक सुट्टया व टपाल स्विकारणा-या कर्मचा-याच्या संदर्भातील माहिती मागीतलेली दिसून येते. याचा अर्थ कार्यालयीन वेळेत त्यांना अधिकारी/कर्मचारी यापैकी कोणीही आढळून येत नसल्यामुळे त्यांनी ती माहिती मागीतली असावी असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही व याबद्दल मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांनी दखल घेतलेली आहे किंवा

नाही याबद्दल खुलासा देण्यात आलेला नाही. मात्र माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**
**३) सदरच्या निर्णयाची १ प्रत मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्याकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ३.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाणिर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९५७६/अपील क्रमांक ६६०८/२०१०**

**कु.अफताब ए. सिद्दिकी,**
**४, सदानंद क्लासीक, प्लॉट नं.५२८,३३वा रस्ता,**
**खार(प.), मुंबई-४०००५२. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, मुंबई,**
**धर्मादाय आयुक्त भवन, २रा माळा, ८३,डॉ.ॲनी बेझंट रोड,**
**वरळी, मुंबई-४०००१८.**

**जन माहिती अधिकारी तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, मुंबई,**
**धर्मादाय आयुक्त भवन, २रा माळा, ८३,डॉ.ॲनी बेझंट रोड,**
**वरळी, मुंबई-४०००१८. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.०८.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ३.५.२०११**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२१.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सहारा वेलफेअर सोसायटीच्या संदर्भात एकुण ४ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.८.५.२०१० रोजी अपिलकर्ता यांना आपल्या अर्जात मागीतलेली माहिती या कार्यालयातील अभिलेखा शाखा,लेखा शाखा या शाखांच्या अधिकाराखाली येत असल्याने त्यांच्याकडून मागणी केली आहे ती प्राप्त होताच आपणास विनाविलंब पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते.परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२२.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१६.७.२०१० रोजी देण्यात आला असून सहारा वेलफेअर सोसायटीच्या संदर्भात कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दि.२५.११.२०१० रोजी अनुसुची- १ ची प्रत पृष्ठ १ ते ४, ज्ञापन नियम व नियमावलीची प्रत पृ. १ ते ११ त्यांना उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी दि.२१.५.२०१० रोजीच्या अर्जाच्या संदर्भात आयोगाच्या कार्यालयात २ वेळा द्वितीय अपील दाखल केलेले असल्यामुळे व अशारीतीने राज्य माहिती आयोगाची दिशाभूल करुन राज्य माहिती आयोगाचा वेळ वाया घालविला असल्यामुळे इतर अतिशय आवश्यक असणा-या अपिलांच्या संदर्भात अपीले प्रलंबित रहातात असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपिलार्थीच्या अर्जाच्या संदर्भात दि.९.३.२०११ रोजी श्री.भास्कर पाटील प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी निर्णय दिलेला आहे. परंतु अपिलकर्ता यांच्याकडे पत्र असूनसुध्दा तेच पत्र अपीलाच्या निर्णयात दिलेले आहे याची माहिती नाही असे सांगून विनाकारण आयोगापुढे येऊन माहिती न करुन घेता आयोगाचा वेळ घेत आहेत त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने  उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ३.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ािर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल**

**झालेली तक्रार**

**क्रमांक-मुमाआ/२०११/१०९/तक्रार क्र. १३०/का.१**

**श्री. अब्दुलकरीम अब्दुल्ला,**
**६१३, अमीर बाग, ६ लतीफा चाळ,**
**हेमूकलानी मार्ग, चेंबूर, मुंबई-४०००७१. .... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**उप जिल्हाधिकारी(अति.निष्का.), वेल्फेअर सेंटर बिल्डिंग,**
**थोरात मार्ग, चेंबूर(प.), मुंबई-४०००८९. .... उत्तरवादी**

**निर्णय**

**तक्रारीचा दिनांक : ६.०१.२०१०**
**तक्रारदार,जन माहिती अधिकारी उपस्थित.**

तक्रारदार यांनी दि.६.१.२०१० रोजी त्यांच्या दिनांक १०.१२.२००९च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून आयोगाकडे तक्रार केलेली आहे. तसेच तक्रारदार यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी दि.१०.१२.०९ रोजी हस्ताक्षरात अर्ज दाखल केला परंतु तो अर्ज स्विकारला नाही व त्यानंतर त्यांनी टंकलिखित अर्ज दाखल केल्यावर मात्र तो स्विकारला. परंतु त्यानंतर त्याही अर्जाच्या संदर्भात माहिती दिलेली नाही. तसेच दि.१८.३.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी(अतिक्रमण निष्कासन-चेंबूर) यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले होते परंतु त्यानुसारसुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. गैरतक्रारदार तहसिलदार या सुनावणीस हजर झाल्या होत्या परंतु त्या नवीन आहेत असे त्यांनी सांगितले व या प्रकरणी त्यांना आजही काही माहिती नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यामुळे तक्रारदाराचा हस्तलिखित अर्ज ज्या लिपिकाने स्विकारण्यास नकार दिला किंवा नायब तहसिलदार यांनी तो स्विकारला नसेल तर त्यांच्या विरुध्द योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे. तक्रारदार यांना त्यांच्या दि.१०.१२.०९च्या अर्जाप्रमाणे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील त्याकरीता सदरची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दि.१०.१२.०९च्या अर्जाच्या अनुषंगाने तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या दि.१८.३.२०१० च्या आदेशाप्रमाणे मागीतलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत विनाशुल्क रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) तक्रारदार यांचा हस्तलिखित अर्ज दि.१०.१२.०९ रोजी ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी स्विकारला नसेल त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.**
**३) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना सदर आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ६.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाि‍र्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल**

**झालेली तक्रार**

**क्रमांक-मुमाआ/२०११/३२६/तक्रार क्र. १२८/का.१**

**श्री. ज.ना.संदानशिव,**
**१/१ झाकीर मंझील, आनंद नगर, साज सिनेमा जवळ,**
**एस.पी.एस.मार्ग, भांडूप(प.), मुंबई-४०००७८.** .... **तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी,**
**विभागीय समाज कल्याण अधिकारी, मुंबई विभाग,**
**कोकण भवन,६वा माळा, सी.बी.डी.बेलापूर,**
**नवी मुंबई-४००६१४.**

**जन माहिती अधिकारी,**
**विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, मुंबई उपनगर,**
**प्रशासकीय इमारत,४था माळा, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग,**
**चेंबूर(पूर्व), मुंबई-४०००७१.** .... **उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**तक्रारीचा दिनांक : १६.०२.२०१०**
**तक्रारदार,जन माहिती अधिकारी उपस्थित.**

तक्रारदार यांनी दि.१६.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) प्रमाणे त्यांच्या दि.७.१०.०९रोजी जन माहिती अधिकारी,सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग यांच्याकडे मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने तक्रारार यांनी दि.३.२.२०१० रोजी अवर सचिव,महाराष्ट्र शासन यांना असे कळविले की, त्यांचा दि.७.१२.०९चा अर्ज विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेला आहे व पत्राची प्रत सोबत जोडली आहे व त्यांच्याशी संपर्क साधावा असे कळविण्यात आलेले दिसून येते.ही बाब सुध्दा दि.६.१.२०१० रोजी त्यांना कळविण्यात आली होती. त्या अर्जाच्या संदर्भात दि.२५.१.२००९ रोजी विभागीय समाज कल्याण अधिकारी, मुंबई विभाग, मुंबई यांनी विमोचित समाज सहकारी गृहनिर्माण संस्था म.,कुर्ला(पूर्व), मुंबई-२४ या संस्थेची सन १९६०ची मूळ प्रवर्तक ३६ सभासदांची नस्ती गहाळ झाल्याची खबर देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, मुंबई उपनगर यांनी त्यांचे पत्र क्र.९३३ दि.२०.४.२००७ मध्ये नमूद केले आहे की, त्यांचे कार्यालयाची निर्मिती सन २०००मध्ये झाली असून दोन तीन वेळा कार्यालयाच्या जागा बदलण्यात आल्याने सदर संस्थेच्या नस्तीचा शोध घेऊनही ती प्राप्त झ ाालेली नाही. जी माहिती उपलब्ध होती ती देण्यात आलेली आहे. याचा अर्थ सदर नस्ती गहाळ केलेली आहे असा होत नाही.शोध घेऊनही एखादी नस्ती विहित वेळेत उपलब्ध होत नसेल व तद्‌नंतर उपलब्ध झाली तर ती कायमस्वरुपी गहाळ झाली आहे असे म्हणता येणार नाही त्यामुळे या कार्यालयामार्फत सदर खबरीची कार्यालयीन प्रमाणित प्रतीचा प्रश्न उद्‌भवत नाही. विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, मुंबई उपनगर यांनी आपल्या दि.३०.१२.०९ अन्वये पाठविलेल्या पत्रात नस्ती गहाळ केल्याचे नमूद केलेले नाही. त्यामुळे या कार्यालयाकडून खबर विभागीय कार्यालयास देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे सदर पत्रावरुन दिसून येते. प्रथम खबर देण्याचा पत्ता दि.३०.१२.०९रोजी आपणास पाठविलेल्या पत्रात नमूद केलेला आहे. तरी पुनश्च पोलीस ठाण्याचा पत्ता देण्यात येत

आहे. चेंबूर पोलीस ठाणे,आर.सी.मार्ग, चेंबूर(पूर्व), मुंबई-४०००७१ या पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात येते. तसेच संबंधित सक्षम अधिका-यांचे नांव संबंधित पोलीस ठाण्याशी संपर्क साधून प्राप्त करुन घ्यावे असे कळविलेले दिसून येते. परंतु तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, नस्ती सुध्दा उपलब्ध होत नसेल तर त्याकरीता पोलीसांकडे एफआयआर दाखल करणे आवश्यक होते. विभागीय समाजकल्याण अधिकारी मुंबई विभाग हे सुनावणीस दुपारी उशीरा उपस्थित झाले व त्यांनी आयागापुढे मुद्देनिहाय खुलासा दाखल केलेला आहे व त्यामध्ये तक्रारदाराला सर्व वस्तुस्थिती निदर्शनास आणून देण्यात आलली आहे असा खुलासा करुन पुन्हा मुद्देनिहाय खुलासा केलेला आहे तो खालीलप्रमाणे आहे-

अर्जदार श्री.ज.ना.संदानशिव यांनी जन माहिती अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेकडे त्यांचे दि.७.१०.२००९ चे अर्जान्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहितीची मागणी केली होती. सदरचा अर्ज या कार्यालयास दि.६.१.२०१० रोजी प्राप्त झालेला आहे(जोडपत्र-१). त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र.मुंवि/विसकअ/मावक/गृ.नि./मा.अधि./०९.१०/१२२ दि.२५.१.२००९ अन्वये माहिती दिलेली आहे(जोडपत्र-२)सदरची माहिती स्पीड पोस्टद्वारे पाठवली आहे(जोडपत्र-३)

अर्जदारास माहितीचा अधिनियम २००५ कलम(७) मध्ये विहित केलेल्या मुदतीत माहिती दिलेली असल्याने कृपया कलम २० प्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेवर शास्ती लादण्यात येवू नये ही विनंती.

तक्रारदार श्री.ज.ना.संदानशिव १/१ झाकिरमंझील, आनंदनगर, भांडूप(प.), मुंबई-७८ यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लागू असलेल्या मुद्दानुसार खालीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

मुद्दा क्र.१ - वस्तुस्थिती आहे.

मुद्दा क्र.२ - जन माहिती अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, मुंबई यांचेशी संबंधित नाही.

मुद्दा क्र.३ - तक्रारदार यांचा दि.७.१०.२००९ च्या माहिती अर्जातील मुद्दा क्र.१ची माहिती "शोध घेऊनही उपलब्ध होत नाही असे कळविले आहे तसेच विमोचीत समाज सहकारी गृहनिर्माण संस्था(म.) कुर्ला(पूर्व) या संस्थेची १९६० ची मूळ प्रवर्तक ३६ सभासदांची नस्ती गहाळ केल्यानंतर सदरची नस्ती गहाळ केल्याची खबर मा.विभागीय समाज कल्याण अधिकारी मुंबइ विभाग,मुंबई यांना दिलेली आहे का? "

सदर योजना ही विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, मुंबई उपनगर यांचे मार्फत राबविण्यात येत असल्याने संबंधित कार्यालयाकडे विचारणा केली असता त्यांचे कार्यालयाी निर्मिती सन २००० मध्ये झालेली असून तीन वेळा कार्यालयाच्या जागा बदल झाल्याने संस्थेची नस्ती शोध घेऊनही प्राप्त झालेली नसल्याने ती गहाळ केलेली आहे असा होत नाही. तसे संबंधितांनी दि.२०.४.२००७ चे पत्रान्वये कळविलेले आहे, त्यामुळे विभागीय कार्यालयास त्यांनी नस्ती गहाळ झाल्याची खबर दिलेली नसेल असा अर्थ अभिप्रेत असल्याची या कार्यालयाची पक्की धारणा आहे.

मुद्दा क्र.४ - तक्रारदाराने मा.विभागीय समाज कल्याण अधिकारी, मुंबई विभाग, मुंबई यांचेमार्फत गृह कर्ज व सबसिडी रक्कमेचे आर्थिक सहाय्याबाबतची माहिती मागितली आहे.

तक्रारदाराने अर्जात नमूद केलेली विमोचित समाज सहकारी गृहनिर्माण संस्था(म.)कर्ला(पू.) ही संस्था १९६० ची पंजीबध्द असून त्या वर्षापासून सदर संस्थेवर नियंत्रण हे सहकार खात्याचे होते व तद्नंतर सन १९८१ पासून जिल्हा समाज कल्याण अधिकारी वर्ग-१ ही कार्यालये शासनाने सुरु केली. तद्नंतर सहकार खात्याकडून मागासवर्गीय गृहनिर्माण योजनेचे अभिलेख वर्ग(जिल्हा कार्यालयास) करण्यात आले. त्यामुळे विभागीय कार्यालयाकडे गृहकर्ज व सबसिडी रक्कमेचे आर्थिक सहाय्य बाबतची माहिती उपलब्ध नाही. ती जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालयाकडे नोंदणी रजिस्टर करुन उपलब्ध होऊ शकते.

मुद्दा क्र.५ :- शासनाने सदर संस्थेस दिलेला आर्थिक सहाय्य रकमेचा लाभ अपात्र सभासदांना दिलेला आहे.

सदर संस्थेस १९६० साली शासनाने जमिन उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावेळी संस्थेवर नियंत्रण सहकार खात्याचे होते. त्या दरम्यान संबंधित संस्थेने काही सभासद बदल परस्पर केले असल्यास समाज कल्याण खात्यास जबाबदार धरता येणार नाही. समाजकल्याण खात्याकडे योजना वर्ग केल्यानंतर कोणत्याही प्रकारचे

सभासद बदल झालेले नाहीत. त्यामुळे आर्थिक लाभासाठी अपात्र सभासदांना मान्यता देवून संगनमत करुन शासनाची फसवणूक केली असे म्हणता येणार नाही.

मुद्दा क्र.६ - तक्रारदाराने दि.७.१०.२००९च्या माहिती अर्जातील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती तक्रारदारास न देण्याकरीता अयोग्य व गैरकायदेशीर कारण दाखवून तक्रारदाराने मागणी केलेली माहिती तक्रारदारास देण्यास अडथळा निर्माण केलेला आहे.

दि.७.१०.२००९ रोजीचा अर्ज या कार्यालयास प्रत्यक्षात दि.६.१.२०१० रोजी प्राप्त झालेला आहे. याबाबत श्री.संदानशीव तक्रारदार यांनी दि.२० जानेवारी,२०१० रोजी या कार्यालयास सादर केलेल्या अर्जामध्ये स्वतःच्या हस्ताक्षरात ७.१०.२००९ ऐवजी ७.१२.२००९ असे वाचावे असे नमूद केलेले आहे(प्रत सोबत जोडली आहे.).

दि.६ जानेवारी,२०१० रोजी प्राप्त झालेल्या अर्जानुसार आवश्यक माहिती विभागीय कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.मुंवि/विसकअ/मावक/गृ.नि./मा.अधि./०९१०/१२२ दिनांक २५.१.२०१० रोजीच्या स्पीड पोस्टद्वारे पाठविलेल्या पत्रान्वये दिलेली आहे(सोबत पत्र प्रत)त्यानुसार सद पत्राद्वारे सन १९६० ची मूळ प्रवर्तक सभासदांची नस्ती गहाळ झाल्याची खबर देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. ही वस्तुस्थिती तक्रारदाराचे निदर्शनास आणून दिलेली आहे. त्यामुळे दिलेली माहिती गैरकायदेशीर आहे असे म्हणता येणार नाही.

मुद्दा क्र.७(अ)(२)- दि.७.१०.२००९ चे जोडपत्र "अ" मधील मुद्दा क्र.१ व २ ची तक्रारदाराने मागीतलेली माहिती त्रारदारास मोफत देण्यासाठी जन माहिती अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, मुंबई विभाग, मुंबई यांना आदेश द्यावा.

तक्रारदाराचा दि.७.१०.२००९ चा अर्ज विभागीय कार्यालयास दि.६.१.२०१० रोजी प्राप्त झाला असून मागणी केलेली आवश्यक माहिती पत्र क्र.जा.क्र.मुंवि/विसकअ/ मावक/ गृ.नि./ मा.अधि./०९.१०/१२ दि.२५.१.२०१० अन्वये दिलेली आहे. (त्याची प्रत पुनश्च या खुलाशासह जोडली आहे.)

मुद्दा क्र.७(ब)(२)- कलम २०(१) अन्वये असलेल्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, मुंबई विभाग, मुंबई यांचेवर रु.२५,०००/- अधिकतम शास्ती लावण्याचे आदेश द्यावेत.

तक्रारदारास माहिती १ महिन्याचे आत उपलब्ध करुन मागणीनुसार दिलेली आहे. त्यानंतर सदर माहिती मान्य नसल्यास त्यांनी नियमानुसार प्रथम अपीलीय अधिकारी यंचंकडे विहित मुदतीत अपील करणे आवश्यक असल्याने तक्रारदाराने त्याकडे दुर्लक्ष करुन मा.राज्य माहिती आयुक्त यांचेकडे अपील केले आहे.

वरील खुलासा पहाता सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**
**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ६.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल**

**झालेली तक्रार**

**क्रमांक-मुमाआ/२०११/३६/तक्रार क्र. १२७/का.१**

**श्री. ज.ना.संदानशिव,**
**१/१ झाकीर मंझील, आनंद नगर, साज सिनेमा जवळ,**
**एस.पी.एस.मार्ग, भांडूप(प.), मुंबई-४०००७८. .... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४०० ००१. .... उत्तरवादी**

**निर्णय**

**तक्रारीचा दिनांक : २१.१२.२००९**
**तक्रारदार उपस्थित,जन माहिती अधिकारी अनुपस्थित.**

तक्रारदार यांनी दि.१०.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी,उच्च शिक्षण,शिक्षण संचालनालय यांच्याकडे तसेच दि.२५.९.०९ रोजी जन माहिती अधिकारी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे १० वर्षांच्या संलग्न सेवेनंतर राजीनामा दिलेल्या कर्मचा-यांना स्वेच्छा निवृत्ती वेतनाचे फायदे देण्याकरीता असलेली माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनषंगाने दि.१६.९.०९ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय यांनी मागीतलेली माहिती मुद्दा क्र.१ व मुद्दा क्र.२ व ३ या संचालनालयाशी संबंधित नाही असे कळविले होते. मात्र जन माहिती अधिकारी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय यांनीसुध्दा माहिती दिलेली नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे.

जन माहिती अधिकारी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय हे सुनावणीस हजर नाहीत त्यामुळे त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे ते दोषी आढळून येतात व ते शास्तीस पात्र आहेत. परंतु शास्ती लादण्यापूर्वी त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे व सदर प्रकरणी माहिती उपलब्ध करुन दिलली नसल्यामुळे सदरची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) सदरची तक्रार मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी,माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय यांनी तक्रारदार यांच्या दि.२५.९.०९ च्याअर्जाच्या अनुषंगाने माहिती विनाशुल्क रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.**

**२) तक्रारदार यांच्या दि.२५.९.०९ च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये रु.१०,०००/- ची शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत**

**आयोगापुढे समक्ष सादर करावा. तसे न केल्यास शास्ती कायम करण्यात येईल व ती त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्याचे आदेश देण्यात येतील याची नोंद घ्यावी.**
**३) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ६.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ि्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्रमांक-मुमाआ/२०११/३६/तक्रार क्र. १२६/का.१**

**श्री. रमेशचंद्र खुशालचंद परदेशी,**
**कमलदीप अंगण, बी/१५, मोहन नगर,**
**धनकवडी, पुणे-४११०४३. .... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी,**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र राज्य,**
**जुने जकात घर, विकास विभाग इमारत, दुसरा मजला,**
**शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई-४०००३३. .... उत्तरवादी**

**निर्णय**

**तक्रारीचा दिनांक : २८.१०.२००९**
**तक्रारदार,संचालक(सां.कार्य) उपस्थित,जन माहिती अधिकारी अनुपस्थित.**

तक्रारदार यांनी दिनांक १०.५.२०१० रोजी त्यांच्या दि.३.६.०९ च्या अर्जाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य ॲकॅडमी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केलेली आहे. महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य ॲकॅडमीच्या कार्यालयात जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी हे नियुक्त झालेले नसल्यामुळे कार्याध्यक्ष श्री.नंदकिशोर नौटियाल यांनी दि.२१.७.२००९ रोजी अपिलकर्ता यांना ३ मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली होती परंतु अपिलकर्ता यांचे समाधान झाले नसल्यामुळे त्यांनी सचिव कार्याध्यक्ष,महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य ॲकॅडमी यांच्याकडे पुन्हा निवेदन दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती मिळाली नाही म्हणून तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केलेली आहे. त्याबाबत आयोगापुढे खुलासा करतांना संचालक,सांस्कृतिक कार्य यांनी तक्रारदार यांनी मागविलेली माहिती मा.कार्याध्यक्ष, हिंदि साहित्य ॲकॅडमी यांनी संचालक सांस्कृतिक कार्य यांच्या निदर्शनास न आणता परस्पर दिलेली आहे. परंतु श्री.परदेशी यांनी मागितलेली माहिती आता जन माहाती अधिका-यांमार्फत विहित मुदतीत देण्यात येईल असे म्हटलेले आहे. त्यांनी पुढे असेही सांगितले की, राज्य हिंदी साहित्य ॲकॅडमी या कार्यालयात कर्मचारी/अधिकारी वर्ग नियुक्त नाही त्यामुळे संचालक,सांस्कृतिक कार्य किंवा मंत्रालयातील अधिकारी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नियुकती करतील व त्यानंतर त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यामुळे सदरची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१) सदरची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांनी मागीतलेली माहिती त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन देण्यात यावी.**
**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ६.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

\

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्रमांक-मुमाआ/२०११/८९/तक्रार क्र. १२५/का.१**

**श्री. फरीद-उल-हसन इकबाल हूसेन,**
**एफ सेक्टर, आय-लाईन, खोली क्र.९/१०,**
**शहाजीनगर, चिताकँप, ट्रॉंबे, मुंबई-४०००८८. .... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी,**
**एम-पूर्व विभाग, शरदभाऊ आचार्य मार्ग,**
**चेंबूर, मुंबई-४०००७१. .... उत्तरवादी**

**निर्णय**

**तक्रारीचा दिनांक : ५.०१.२०१०**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, तक्रारदार अनुपस्थित.**

तक्रारदार यांनी दि.५.१.२०१० रोजी त्यांच्या दि.१०.१०.२००९ च्या अर्जाच्या अनुषंगाने निरिक्षण करुन माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही या संदर्भात राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केलेली आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना त्यांच्या दि.१६.१०.०९ च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे दि.१३.११.०९ रोजी उत्तर दिलेले आहे. त्यामध्ये जनता कॉलनी(अणुशक्ती नगर) येथील झोपडपट्टी धारकांचे स्थलांतर/पुर्नवसन शहाजी नगर(चिता कँप) मध्ये करण्यात आले होते. या घटनेस ३० वर्षांपेक्षा जास्त कालावधी झ ालेला आहे. सबब या संदर्भातील सर्व कागदपत्रांच्या नस्ती(फाईल्स) या कार्यालयाच्या दप्तरी कसून शोध घेऊनही सध्या उपलब्ध झालेल्या नाहीत. यास्तव चिता कँप या वसाहतीचे स्थलांतर व पुनर्वसन याबाबतची कागदपत्रे आपणास पहाण्यासाठी देता येत नाहीत. सदर कागदपत्र उपलब्ध झाल्यास त्वरित कळविण्यात येईल असे कळविले होते. त्यानंतर पुन्हा दि.२४.१२.०९ रोजी शहाजी नगर,चिता कँप या वसाहतीच्या पुनर्वसनाबाबतची काही कागदपत्र या कार्यालयात उपलब्ध झाली आहेत. सदर कागदपत्रांची पहाणी करुन आपणास अभिप्रेत असलेल्या माहितीच्या प्रती आवश्यक शुल्क स्विकारुन देण्यात येतील. संदर्भिय अभिलेख तपासणीसाठी पहिल्या तासाची फी नसून तद्नंतरच्या प्रत्येक १५ मिनिटांसाठी रु.५/- अदा करावे लागतील. तपासणीसाठी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत उपरोक्त पत्त्यावर संपर्क साधावा असे कळविले असल्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे म्हणता येणार नाही. त्याप्रमाणे तक्रारदार यांना दि.२८.१.२०१० रोजी संपूर्ण कागदपत्र दाखविण्यात आलेली आहेत व ती विनाशुल्क दाखविलेली आहेत असे तक्रारदार यांनीच लेखी दिलेले निवेदन आयोगाच्या निदर्शनास आणल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**
**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ६.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाि्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल**

**झालेली तक्रार**

**क्रमांक-मुमाआ/२०११/३०१०/तक्रार क्र. १६१/का.१**

**श्री. एस.के. नानगिया,**
**७०४, गोल्डन चॅरिएट सह.गृह. नि.संस्था(म.),**
**१३३/सेक्टर ९, चारकोप, कांदिवली(प.),**
**मुंबई-४०००६७.** .... **तक्रारदार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कुलसचिव,**
**मुंबई विद्यापीठ, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव,**
**मुंबई विद्यापीठ, मुंबई.** .... **उत्तरवादी**

**निर्णय**

**तक्रारीचा दिनांक : २३.११.२०१०**

**तक्रारदार,रजिस्ट्रार मुंबई विद्यापीठ उपस्थित.**

तक्रारदार यांनी दि.२५.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी तक्रार क्र.७१८/०१ मधील दि.३.५.२०१० च्या निर्णयाप्रमाणे चौकशीच्या संपूर्ण अहवालाची प्रत उपलब्ध झालेली नाही म्हणून तक्रार केलेली आहे. तक्रारदार यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, प्राध्यापक(प्रिन्सीपॉल) राजाध्यक्ष यांनी सदरच्या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करुन संपूर्ण अहवाल तत्कालीन उप कुलगुरु यांच्याकडे दाखल केला होता परंतु त्यांनी माहितीच्या अधिकारात माहिती मागीतल्यावर मात्र त्यांना फक्त त्या अहवालाचा ऑपरेटीव्ह पार्ट देण्यात आला आहे व त्या अहवालाचा पूर्वार्ध भाग मात्र देण्यात आलेला नाही व सदर अहवालाचा भाग लपविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे व सर्व माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा करतांना असे सांगितले की. जन माहिती अधिकारी यांच्याकडे तसेच आस्थापना विभागाकडे व परीक्षा विभागात तपास केला परंतु राजाध्यक्ष समितीचा संपूर्ण अहवाल कोणत्याही कार्यालयात उपलब्ध नाही. मा.कुलगुरुंच्या कार्यालयातसुध्दा विचारणा करण्यात आली परंतु कुलगुरुंच्या कार्यालयातून संपूर्ण अहवाल उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. तसेच श्री.राजाध्यक्ष, यांना अहवालाची पूर्ण प्रत उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात आली असता श्री.राजाध्यक्ष यांनी पत्राद्वारे कळविले की, पूर्ण अहवाल माजी कुलगुरु यांच्या नावे सिलबंद लिफाफ्यात त्यांनी स्वतः कुलगुरु कार्यालयात दिलेला आहे. श्री.राजाध्यक्ष यांनी पत्रात नमूद केल्यानुसार पूर्ण अहवाल परीक्षा मंडळापुढेही ठेवण्यात आला नव्हता. श्री.राजाध्यक्ष यांना पाठविलेल्या पत्राच्या अनुषंगाने परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग यांना पत्राद्वारे अहवालाबाबत विचारणा करण्यात आली असता त्यांनीसुध्दा परीक्षा विभागाकडे पूर्ण अहवाल उपलब्ध नसल्याचे पत्राद्वारे कळविले आहे. एम.एस.राजाध्यक्ष समितीने विद्यापीठाकडे सादर केलेल्या अहवालातील फक्त कार्यक्षम(ऑपरेटीव्ह) भाग उपलब्ध असून त्याची छायांकित प्रत अपिलकर्ता अर्जदार यांना देण्यात आलेली आहे. तसेच सदर अहवालातील जबाबदार असणा-या दोषी व्यक्तींची वेतनवाढ बंद करण्यात आलेली होती. त्यामुळे त्यांना असत्य किंवा चुकीची माहिती देण्यात आलेली नाही. असे असले तरी तक्रारदार यांनी आयोगापुढे पुन्हा युक्तीवाद करतांना असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे तो अहवाल उपलब्ध नसेल तर कुलगुरु यांना पाचारण करुन त्यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. परंतु श्री.राजाध्यक्ष यांनी खुलाशात असे सांगितले आहे की, सदरचा अहवाल त्यांनी माजी कुलगुरु यांच्याकडे सादर केला होता व कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक श्री.गोपाल एस. यांनी दि.१९.४.२०११ रोजी प्रबंधकांना जे पत्र दिलेले आहे त्यामध्ये त्यांच्या सर्व सहकार्यांकडे त्यांनी चौकशी केली परंतु उपकुलगुरु यांच्या

कार्यालयामध्ये सदरचा अहवाल आढळून येत नाही असे कळविलेले आहे. त्यामुळे उपकुलगुरु यांना पाचारण करणे योग्य नाही. तसेच अध्यक्ष श्री.एम.एन.राजाध्यक्ष समिती यांनी प्रबंधक यांना दिलेल्या पत्राची प्रत सुध्दा सादर केलेली आहे व त्यामुळे प्रबंधकांना पाचारण करण्यासाठी अंतरिम आदेश आयोगाने पारित केले होते. त्याप्रमाणे आज मुंबई विद्यापीठाचे प्रबंधक आयोगापुढे सुनावणीस हजर झाले आहेत. त्यांनी सुध्दा सदरचा संपूर्ण अहवाल हा विद्यापीठाच्या कोणत्याही कार्यालयात उपलब्ध नाही असे आयोगास सांगितले. परंतु त्या अहवालातील जो कार्यक्षम भाग आहे(ऑपरेटीव्ह पार्ट) त्यामध्ये दोषी अधिका-यांवर कारवाई करण्यास सुचविलेले आहे त्याप्रमाणे सर्व दोषी अधिका-यांच्या विरुध्द त्यांची वेतनवाढ थांबवण्याची कारवाई करण्यात आली होती. असे असल्यास सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**
**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ६.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ िर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्रमांक-मुमाआ/२०११/तक्रार क्र. १०४/का.१**

**श्री. गोपीनाथ सखाराम अवसरे,**
**१/४९, ठोकरशी जिवराज बिल्डिंग,**
**टी.जे. रोड, शिवडी, मुंबई-४०००१५. .... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार,**
**तहसिलदार कार्यालय,हवेली,**
**ता.हवेली, जि. पुणे. .... उत्तरवादी**

**निर्णय**

**तक्रारीचा दिनांक : २६.०४.२०१०**
**तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित.**

तक्रारदार यांनी दि.२६.४.२०१० रोजी त्यांच्या अपील क्र.४०८९/०२ मधील दि.२५.१.२०१० च्या आदेशाप्रमाणे १५ दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही या कारणास्तव तक्रार केलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या खुलाशात तक्रारदार यांना१)क्र.माअ/एसआर/६३/० पुणे-२ दि.६.२.२००९, २)अभिलेखे/मा.अ./एसआर/१२४/२००९, दि.१८.३.२००९,३)क्र.अभिलेख/मा.अ./ एसआर/२००९, दि.१५.५.२००९ व ४)क्र.माअ/कावि/ /२०१० दि.१.६.२०१० रोजी माहिती पुरविलेली दिसून यते. तसेच वर नमूद केलेल्या पत्रांच्या सोबत गट नं.३०८ चे ७/१२ उता-यावर शाळेची नोंद कोणत्या कागदपत्रांच्या आधारे घेण्यात आली याबाबतचा कोणताही फेरफार झालेला नसल्याचे दिसून येत असून त्यासाठी गट नं.३०८ चे सन १९८६-८७ पासूनचे ७/१२ चे उतारे तसेच विवादग्रस्त प्रकरणाची नोंदवहीची प्रत आणि नमुना १४ ची प्रत अर्जदारास उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्याकरीता उपरोक्त पत्रांच्या छायांकित प्रती, पोस्ट दाखल्याच्या छायांकित प्रती सोबत दाखल केलेल्या आहत. आवक नोंदवहीची छायांकित प्रत सुध्दा दाखल केलेली आहे. त्यावरुन तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. तक्रारदार यांनीही माहिती उपलब्ध झाली हे मान्य केले परंतु तक्रारदार यांची तक्रार ही फेरफाराच्या संदर्भात दिसून येत असल्यामुळे अर्जदार यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या तरतुदींप्रमाणे संबंधित उपविभागीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केल्यास त्यांना त्या फेरफाराच्या संदर्भात न्याय मिळवून देता येईल. त्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे

**आदेश**

**१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**
**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ६.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ िर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्रमांक-मुमाआ/२०१०/तक्रार क्र. ३६०/का.१**

**डॉ.एस.एस.प्रभू,**
**बी-२३, उद्यानप्रभा, तेजपाल स्कीम रोड नं.२,**
**विलेपार्ले(पूर्व), मुंबई-४०००५१. .... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी,**
**सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१. .... उत्तरवादी**

**निर्णय**

**तक्रारीचा दिनांक : १.१.२००९ व ४.०६.२०१०**
**तक्रारदार अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.**

तक्रारदार यांनी दि.३०.३.०९ रोजी त्यांच्या अपील क्र.२००८/३१०५/०२ मधील दि.१०.१२.२००८च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून आयोगाकडे तक्रार केलेली दिसून येते. सदरच्या तक्रारीच्या संदर्भात दि.२८.५.२००९ रोजी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी,श्रेणी-I यांनी श्री.एस.एस.प्रभू यांचे माहिती मिळणेसाठीचे वेगवेगळे अर्ज विचारात घेता त्यांना कार्यालयात समक्ष बोलावून दि.२९.८.२००८ रोजी त्यांच्याशी चर्चा करण्यात आली व चर्चेअंती सर्व मुद्यांचा विचार करुन कार्यालयात उपलब्ध असलेल्या धारीकेतील सर्व कागदपत्र त्यांना दि.१२.१.०९ रोजी देण्यात आलेली आहेत. त्याशिवाय इतर माहिती/माहितीची धारिका कार्यालयात उपलब्ध नाही असे त्यांना १२.१.२००९ च्या पत्राने कळविलेले आहे. संस्था पातळीवर असणारी माहिती देण्यासाठी कार्यालयाने दि.१२.१.०९ रोजी संस्थेचे प्रशासक यांना पत्र देवून सुचित केले आहे. श्री. प्रभू यांच्या तक्रारीबाबत सहकार खात्याकाडून आवश्यक ती कारवाई करुन प्रशासक नेमलेला आहे व संस्थेची वैधानिक चौकशी सुरु आहे. कार्यालयात उपलब्ध असलेली सर्व माहिती तक्रारदार यांना माहिती अधिकारी या नात्याने देण्यात आलेली आहे. आज पुन्हा तक्रारीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी खुलासा करतांना मा.मुख्य माहिती आयुक्त यांच्याकडे केलेल्या खुलाशानुसार त्यांनी दि.१३.५.२०१० रोजी तक्रार निकाली काढली असून आदेशाची प्रत सोबत जोडलेली आहे असे आयोगाच्या निदर्शनास आणले. जन माहिती अधिकारी,श्रेणी-I यांनी त्यांच्या खुलाशात तक्रारदार यांना त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली सर्व माहिती वेळोवेळी दिलेली आहे तरीही त्यांचे समाधान होत नाही असे म्हटलेले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालयात किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेल्या कागदपत्रांच्या/अभिलेख्यांच्या/दस्तऐवजांच्या स्वरुपात असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. कोणत्याही प्रकरणात कारवाई करुन माहिती मिळवून देणे अपेक्षित नाही त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली कागदपत्रांच्या स्वरुपातील सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामुळे व पूर्वी मुख्य माहिती आयुक्त यांनी तक्रार खारीज केलेली असल्यामुळे पुन्हा त्याच विषयाच्या संदर्भातील माहितीच्या संदर्भात तक्रार करणे योग्य नाही. यास्तव सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक ६.५.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ार्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्रमांक-मुमाआ/२०११/४६६-अे/तक्रार क्र. १५१/का.१**

**श्री.अरुण गणपत भोवर,**
**अे/६०३, साई आशिष, स्टेशन रोड,**
**विक्रोळी(पूर्व), मुंबई-४०००८३. .... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी(श्रेणी-II),**
**उप निबंधक सहकारी संस्था कार्यालय, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१. .... उत्तरवादी**

**निर्णय**

**तक्रारीचा दिनांक : ५.३.२०११**
**तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित.**

तक्रारदार यांनी दि.२३.३.२०१० रोजी त्यांच्या अपील क्र.५४७३/०२च्या निर्णयाप्रमाणे तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना वेळोवेळी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. कार्यालयामध्ये जी माहिती उपलब्ध आहे त्याबाबत सर्व नस्त्याही त्यांना दाखविलेल्या आहेत. तक्रारदार यांच्या तक्रारीप्रमाणे आत्तापर्यंत ३ प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली होती. तक्रारदार यांनी तक्रारीसोबत दाखल केलेल्या माहितीच्या दि.२.६.२००९च्या अर्जात मागीतलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील असे आदेश पारीत झाले होते. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी,उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई यांनी तक्रारदार यांना दि.२.६.२००९ च्या अर्जात मागीतलेली माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मान्य करण्यात येत असून तक्रारदार यांच्या दि.२.६.२००९च्या दाखल केलेल्या माहितीच्या अर्जामध्ये त्यांनी नमूद केलेल्या पत्रांच्या संदर्भात झालेल्या निर्णयाच्या छायांकित प्रती हे आदेश मिळाल्यापासून १० दिवसात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या.**
**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना या आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई (विलास पाटील)**
**दिनांक ६.५.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाि‍र्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्रमांक-मुमाआ/२०११/४६६/तक्रार क्र. १५०/का.१**

**श्री.अरुण गणपत भोवर,**
**अे/६०३, साई आशिष, स्टेशन रोड,**
**विक्रोळी(पूर्व), मुंबई-४०००८३. .... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी,**
**उप निबंधक सहकारी संस्था मुंबई मंडळ कार्यालय,**
**गृहनिर्माण भवन, कलानगर,वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१. .... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**तक्रारीचा दिनांक : ५.३.२०११**
**तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित.**

तक्रारदार यांनी तक्रार क्र.९०/०२,८७५/०२ तसेच अपील क्र.५४०९/०२ च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे दि.५.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.५४०९ मधील निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही अशी तक्रार केलेली आहे. तक्रारदार यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी अनेकवेळा उपनिबंधक सहकारी संस्थेस सादर झालेला अहवाल मागीतला परंतु त्या अहवालाच्या प्रती अद्यापपर्यंत त्यांना मिळालेल्या नाहीत. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-II यांनी तक्रारदार यांना दि.३१.७.२००९ रोजी श्री.बी.पी.महाजन,प्राधिकृत अधिकारी यांची नेमणूक करुन त्यांनी २ वेळा उपनिबंधक सहकारी संस्थेला आपला अहवाल सादर केला त्या अहवालाच्या प्रती कार्यालयीन वेळेत संपर्क साधून उपलब्ध करुन घेऊ शेतात असे कळविले होते. तसेच संबंधित संस्थेच्या संदर्भातील सर्व कागदपत्र जी उपनिबंधक यांच्या कार्यालयात उपलब्ध आहेत ती तक्रारदार यांना वेळोवेळी दाखविण्यात आलेली आहेत व त्यातूनच त्यांनी त्या अहवालाच्या प्रती उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते. त्यावर पुन्हा तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्या अहवालाच्या प्रती अद्यापपर्यंत मिळालेल्या नाहीत व त्या कारणास्तव वारंवार तक्रार करणे भाग पडत आहे. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत तक्रारदार यांना श्री.बी.पी.महाजन,हिशोब तपासासाठी नियुक्ती केलेले प्राधिकृत अधिकारी यांनी २ वेळा सहकारी संस्थेला सादर केलेल्या अहवालाच्या छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्याव्यात. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहातील याची त्यांनी नोद घ्यावी.**
**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना या आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ६.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ïर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्रमांक-मुमाआ/२०११/२६२/तक्रार क्र. १०७/का.१**

**श्री.रविंद्र मुरलीधर कालेकर,**
**अे/१०३, अमित दर्शन सोसायटी, दादाभाई रोड नं.३,**
**विलेपार्ले(पश्चिम), मुंबई-४०००५६. .... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,**
**विस्तारीत इमारत, ५वा मजला, महापालिका मार्ग, फोर्ट,**
**मुंबई-४०० ००१. .... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**तक्रारीचा दिनांक : १५.१२.२०१०**
**तक्रारदार, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.**

तक्रारदार यांनी अपील क्र.५२९०/०२ मधील दि.३०.१.२०१० च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीमध्ये माहिती पुरविण्यात आली आहे तसेच निरिक्षण केलेल्या नस्तीतील कागदपत्रांच्या छायांकित प्रतीदेखील मागणीनुसार पुरविण्यात आलेलया आहेत म्हणूनच पूर्वीचे दोन्हीही तक्रार अर्ज निकाली काढण्यात आलेले आहेत असे आयोगाकडून त्यांना कळविण्यात आले आहे. परंतु अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झालेली नसून सुध्दा तक्रारी खारीज करण्यात आल्या आहेत याबद्दल आश्चर्य वाटते अशी तक्रारदार यांची तक्रार आहे. तसेच अपील सुनावणीच्या वेळेस मुख्य राज्य माहिती आयुक्तांनी जन माहिती अधिका-यांना अर्जदाराची विनंती का नाकरली हे तपासले गेलेले नाही तसेच कलम ७(१) अन्वये जन माहिती अधिका-यांनी विनिर्दिष्ट वेळेत माहिती सादर केली आहे की नाही हा मुद्दा उपस्थित करुनही त्याची दखल घेतली नाही अशाप्रकारची तक्रार आयोगापुढे केलेली आहे व माहिती उपलब्ध झालेली नाही त्यामुळेदोषी अधिका-यांवर दंडात्मक कारवाई करावी अशी विनंती केली आहे. परंतु सदरच्या तक्रारीच्या अनुषंगाने दोन वेळा सुनावणीची तारीख देऊनही तक्रारकर्ता हजर झालेले नाहीत व माहिती अधिकारीसुध्दा उपस्थित झाले नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या नोटीसचा अवमान केला आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. तक्रारदार यांची तक्रार जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शास्ती का लादण्यात येऊ नये याकरीता असल्यामुळे ती मान्य करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१) तक्रारदार यांची तक्रार मान्य करण्यात येत असून तक्रारदार यांना अपील क्र.५२९०/०२ च्या दि.३०.१.२०१० च्या निर्णयाप्रमाणे माहिती का उपलब्ध करुन देण्यात आली नाही व त्या संदर्भात त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत आयोगापुढे करावा. तसे न केल्यास त्यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी.**

**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ६.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ा्णियाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्रमांक-मुमाआ/२०११/३०७/तक्रार क्र. १४९/का.१**

**श्री.रणछोडभाई चित्ताभाई सोळंकी,**
**मुक्काम खेरडा,पोस्ट अनास्तु, ता.करजन,**
**जि.वडोदरा, -३९१२४०. .... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**व्ही.एन.देसाई म्युनिसिपल जनरल हॉस्पीटल,**
**सांताक्रुझ(पूर्व), मुंबई-४०००५५. .... उत्तरवादी**

**निर्णय**

**तक्रारीचा दिनांक : ११.०२.२०१०**
**तक्रारदार उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.**

तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार क्र.२००९/४४५/०२, तक्रार क्र.४७९०/०२ चा निर्णय अनुक्रमे दि.२८.१०.०९ व ३०.११.०९ रोजी झालेला असून तक्रारी खारीज करण्यात आलेल्या आहेत. तरीसुध्दा तक्रारदार यांनी आयोगाकडे पुन्हा दि.११.२.२०१० रोजी तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार आज सुनावणीस हजर आहेत. तक्रारदार यांनी त्यांना सेवानिवृत्तीवेतन लवकरात लवकर मंजूर व्हावे याबद्दल आयोगाकडे विनंती केलेली आहे.परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणी गुणवत्तेच्याबाबत निर्णय होण्यासाठी राज्य माहिती आयोगास आदेश देता येत नाहीत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेल्या कागदपत्रांच्या स्वरुपातील माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देता येतात. त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार मान्य करता येत नाही व ती निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**
**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई (विलास पाटील)**
**दिनांक ६.५.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०३७७/अपील क्रमांक ६६३७/२०१०**

**श्री. सुदिन रमेश प्रधान,**
**नालंदा को.ऑप.हौ.सो. बिल्डिंग नं.३४/१२३६,**
**सुभाषनगर, चेंबूर,मुंबई-४०००७१. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता(इ.प्र.),**
**इमारत प्रस्ताव पूर्व उपनगरे, राज लेगसी जवळ, पेपर मिल कंपाऊंड,**
**लाल बहादूर शास्त्री मार्ग, विक्रोळी, मुंबई-८३.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इ.प्र.),**
**इमारत प्रस्ताव पूर्व उपनगरे, राज लेगसी जवळ, पेपर मिल कंपाऊंड,**
**लाल बहादूर शास्त्री मार्ग, विक्रोळी, मुंबई-८३. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ९.५.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.७.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(बी.पी.ई.एस.) यांच्याकडे सुभाष नगर येथील इमारत क्र.८,९,१०,११,१२ यांच्या जागेवर बांधण्यात आलेल्या संक्रमण शिबीरा(ट्रांझ ीट कँप)च्या संदर्भात युनियनचे पदाधिकारी व बी.पी.ई.एस. यांच्यामध्ये जो करार झाला व इतर बाबी या सर्वांच्या प्रती मिळाव्यात, २)सुभाष नगर सी.टी.एस.नं.८३३ समोर आरएनए बिल्डर्सने फूटपाथ कव्हर करुन शेड ठोकली आहे व अतिक्रमण केले आहे. तिस-यांदा वारंवार असे अतिक्रमण करणा-या या बिल्डर विरुध्द आपण काय कायदेशीर कारवाई केली? ३)ट्रांझीट कँप जेव्हा युनियनच्या नावावर केला तेव्हा संबंधित इमारतीचे जी ना हरकत प्रमाणपत्र घेतली त्याची प्रत, माहितीचा कालावधी सन २००० ते २०१० अशी माहिती मागीतलेली दिसते.अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२२.७.२०१० रोजी उत्तर दिलले आहे. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झ ााल्यामुळे त्यांनी दि.२५.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले.प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, सुभाषनगर भागात आरएनए बिल्डर्सने फूटपाथवर जे अतिक्रमण केले तसेच ट्रॅन्झीट कँपच्या संदर्भात जी कारवाई झालेली आहे त्याबाबत त्यांनी आत्तापर्यंत अनेक तक्रारी केल्या परंतु सदरच्या तक्रारींच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची चौकशी करण्यात येत नाही व त्यांना उत्तर पण देण्यात येत नाही. सदर ट्रांझीट कँप तोडण्याचे आदेश मिळावेत अशी माहिती मागीतली परंतु ते आदेश सुध्दा देण्यात येत नाहीत. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना दि.२२.७.२०१० रोजी उत्तर पाठवण्यात आले आहे. त्या अनुषंगाने अर्जदाराने संबंधित धारिणीचे निरिक्षण दि.१०.८.२०१० रोजी करुन त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांचे पृष्ठ क्रमांक नमूद करुन त्यासंबंधीची फी रु.८८/- मात्र भरणेविषयी कळविले. त्याप्रमाणे अर्जदाराने दि.११.८.२०१० रोजी फी चा भरणा म.न.पा.मध्ये करुन दि.१३.८.२०१० रोजी कागदपत्रांच्या प्रती प्राप्त झाल्याची पोच दिली आहे. अर्जदाराने अ.क्र.३ अन्वये विचारणा केलेली माहिती कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध नसल्यामुळे देता येणे शक्य नाही. यावरुन

अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. परंतु अपिलकर्ता यांनी आयोगापुढे जो युक्तिवाद केलेला आहे त्यावरुन त्यांची मूळ तक्रार ही कारवाई करण्यासंदर्भात आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणात कारवाई करण्याचे आदेश देण्याची तरतूद नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांच्या अपेक्षेप्रमाणे आयोग कोणत्याही प्रकारणात कारवाई करा असे आदेश देऊ शकत नाही. मात्र माहिती ही कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध होते व तशी ती अपिलकर्ता यांना उपलब्ध झ ालेली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार सुभाषनगर ही वसाहत म्हाडाची वसाहत असल्यामुळे त्याबाबतची माहिती म्हाडाकडून उपलब्ध होऊ शकेल. त्यामुळे अपिलकर्ता यांना म.न.पा.कडील माहिती उपलब्ध झ ालेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**

**दिनांक ९.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

\

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९९५९/अपील क्रमांक ६६३८/२०१०**

**श्री. सैफी एफ.सरीया,**
**११२/१२४, अब्दुल्ला बिल्डिंग,जे.जे. हॉस्पीटल,**
**गेट नं.६च्या समोर, जेल रोड(नॉर्थ), मुंबई-४००००९. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक पालिका आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभाग, ७६,श्रीकांत पालकर मार्ग,**
**चंदनवाडी, मुंबई-४०० ००२.**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभाग, ७६,श्रीकांत पालकर मार्ग,**
**चंदनवाडी, मुंबई-४०० ००२. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ४.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ९.५.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१२.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि.१.१.२०१० व १७.२.२०१० च्या तक्रारीच्या अनुषंगाने महानगरपालिका,सी विभागाच्या कार्यक्षेत्रातील विनापरवाना कॅटरींग व्यवसाय करणा-यांविरुध्द काय कारवाई केली याबद्दलची माहिती स्वतः घेणार असे नमूद करुन माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२०.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१९.७.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे असलेल्या अभिलेखांप्रमाणे माहिती पुरविलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात संबंधित अधिका-यांनी कोणत्याही प्रकारे प्रामाणिक चौकशी केलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या तक्रारीची चौकशी केलेली आहे व काही कॅटरर्सच्या विरुध्द कारवाईसुध्दा केलेली आहे. मात्र काही कॅटरर्स जेथे कोणत्याही प्रकारे कार्यवाही होत नसेल त्याबाबत कारवाई करणे शक्य नसल्यामुळे त्याबाबत कळविण्यात आलले नाही. जन माहिती अधिकारी डॉ.रविंद्र नारकर यांनी आयोगापुढे खुलासा दाखल केलेला असला तरी अपिलकर्ता यांना कोणत्या प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिली याबद्दल काहीही खुलासा केलेला नाही. यावरुन जन माहिती अधिकारी हे आयोगाच्या कामकाजाबाबत गंभीर आहेत असे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांनी त्यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे जे आयोगापुढे सांगितले त्यावरुन जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती अपिलकर्ता यांना दिलेली नाही अशी आयोगाचीही खात्री झालेली आहे. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे जो तोंडी युक्तीवाद करण्यात आला तो समाधानकारक नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व ते शास्तीस पात्र आहेत. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

<u>**आदेश**</u>

**१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.१.१.२०१०,१७.२.२०१० च्या तक्रारीच्या संदर्भात संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) जन माहिती अधिकारी हे आयोगाच्या कामकाजाबाबत गंभीर नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात यावी.**

**३) सदरच्या आदेशाची प्रत आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.**

**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**

**दिनांक ९.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाािर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०८२८/अपील क्रमांक ६६३९/२०१०**

**श्री. शेख महेबूब हुसेन,**
**मु.पो.बालमटाकळी, ता.शेवगाव,**
**जि.अहमदनगर. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप सचिव,**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,**
**मंत्रालय विस्तार भवन, मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,**
**मंत्रालय विस्तार भवन, मंत्रालय, मुंबई-४०००३२. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १०.०३.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ९.५.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

सदर प्रकरणी अपिलकर्ता यांनी अवर सचिव,प्राथमिक शिक्षण-१,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांच्याकडे १)अहमदनगर जिल्हापरिषद शिक्षण विभाग(प्राथमिक) जा.क्र.कार्या.-१/शिसेभ/२००८ अहमदनगर दि.२६.११.२००८ या पत्राबाबत २)मा.शिक्षण मंत्री यांचेकडील जा.क्र.१८३,दि.२५.११.२००९ या अर्जाबाबत ३)शालेय शिक्षण विभागाचे दि.१२ जुलै,२००१ चे परिपत्रकातील मुद्दा क्र.२१(२) च्या धोरणाबाबत, तसेच या मुद्यास अनुसरुन राज्यात शिक्षण सेवक योजनंतून दिलेल्या सुटीबाबत- माहितीचा कालावधी १० मार्च २००० ते ३१ डिसेंबर,२००९, अशी एकूण ३ मुद्यांच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन द्यावी असे म्हटले आहे. सदरची माहिती ही नोंदणीकृत पोस्टाने मिळावी असेही नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१५.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी विषय क्र.१ नुसार शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची प्रत सोबत जोडली आहे. विषय क्र.२नुसार आपण मा.मंत्री(शालेय शिक्षण) यांना लिहिलेले पत्र या कार्यासनास अद्याप प्राप्त झालेले नाही. विषय क्र.२ नुसार आपण नमुद केलेल्या शासन निर्णय दि.१२ जुलै,२००१ मधील मुद्दा क्र.२१(२) वेतनश्रेणी देण्याबाबत कोणताही आदेश नमुद केलेला नाही. तसेच आपण रु.५०/- ची मनीऑर्डर पाठविलेली आहे. ही बाब माहितीच्या अधिकारात अपेक्षित नाही. एका प्रतीची झेरॉक्स रु.२/- + शिघ्र टपाल खर्च रु.२५/- असे एकूण रु.२७/- एवढा खर्च आपणास आलेला आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.२५.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.निरंक मार्च,२०१० रोजी देण्यात आला असून अपिलार्थी यांना मूळ अर्जातील मुद्दा क्र.२च्या संदर्भात मा.मंत्री(शालेय शिक्षण)महोदयांकडे प्राप्त झालेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती १५ दिवसात उपलब्ध करुन द्यावी, शासन निर्णय दि.१२ जुलै,२००१ मधील क्र.२१(२) च्या संदर्भात स्पष्टीकरण द्यावे, मुद्दा क्र.३, दि.१२ जुलै,२००१ मध्ये नमूद केल्यानुसार बीड जिल्हा सोडून राज्यातील इतर

जिल्हयांची माहिती अर्जदारास परस्पर उपलब्ध करुन द्यावी असेही त्यांना कळविण्यात यावे. तसेच बीड जिल्हा सोडून इतर जिल्हयातील सर्व शिक्षणाधिका-यांना अर्जदारास वरील माहिती तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात यावे असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु सदरच्या आदेशाप्रमाणे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता सुनावणीस हजर असून त्यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली ती अपूर्ण आहे व प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जे आदेश दिलेले आहेत त्या आदेशाप्रमाणे अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी सुनावणीस गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा कोणतेही कागदपत्र आयोगापुढे दाखल केलेली नाहीत व ते हजरही झालेले नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यानंतर कोणत्या प्रकारची कार्यवाही केली याबद्दल आयोगापुढे कोणतेही कागदपत्र नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये शास्ती लादण्यापूर्वी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे तीनही मुद्यांची माहिती रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१)अन्वये रु.५,०००/- ची शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी आयोगापुढे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत समक्ष करावा. तसेच आयोगापुढे सुनावणीस ते का उपस्थित राहिले नाहीत याबद्दलही खुलासा करण्यात यावा. तसे न केल्यास त्यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात येईल व ती त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसूल करण्याचे आदेश देण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** — **(विलास पाटील)**
**दिनांक ९.५.२०११** — **राज्य मुख्य माहिती आयुक्त**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाीर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०४४१/अपील क्रमांक ६६३६/२०१०**

**श्रीमती उन्नती त्रिपाठी,**
**२०२, लोकसागर, सेक्टर १४,**
**वाशी, नवी मुंबई-४००७०३. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा पालीस उप आयुक्त,**
**परिमंडळ-९, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त,**
**पश्चिम प्रादेशिक विभाग व पश्चिम नियंत्रण कक्ष,**
**वांद्रे(प.), मुंबई-४०००५०. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १९.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ९.५.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२५.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,बांद्रा(प.) यांच्याकडे २००८च्या कालावधीतील २ मृत्यू प्रकरणी सहार पोलीस्ट स्टेशन यांनी हाताळलेल्या केसबद्दल माहिती १)मिनाक्षी चिन्नु २) फातिमा शेख मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती स्पीडपोस्टाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२७.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२७.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे या कारणास्तव सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्या संबंधीत मृत्युच्या प्रकरणी त्यांच्या क्षेत्रामध्ये काम करतात व त्यावेळेस त्या संपूर्ण केसच्या संदर्भात हजर होत्या. त्या दोन्ही मृत्यूंच्या संदर्भात त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक झाले असते परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम ८(१)(ज) व कलम ८(१)(एच) अन्वये अपमृत्यू नोंद क्र.६७/०८ ची माहिती सहार पोलीस ठाणेकडून नाकारण्यात येत आहे तसेच अपमृत्यू नोंद क्र.४८०८ ची नोंद करण्यात आली आहे. नमूद अपमृत्यूवरुन गु.र.क्र.३८२/०८ कलम ३०६,३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून नमूद गुन्हयात दोन आरोपी व एक बाल अपचारी यांना अटक करण्यात आली असून दोन आरोपी यांचे विरोधात दोषारोपपत्र C.C. No.६५/PW/०९ दि.७.१.०९ अन्वये महानगर दंडाधिकारी, २२ वे न्यायालय, मुंबई यांचे न्यायालयात सादर करण्यात आले आहे. तसेच बाल अपचारी यांचे विरोधात दोषारोपपत्र CC No.२९/JW/०९ दि.२.११.०९ अन्वये बाल न्यायालय, डोंगरी, मुंबई येथे सादर करण्यात आले आहे. तरी आपणास आवश्यक कागदपत्र मा. न्यायालयाकडून प्राप्त करुन घेण्यात यावी असे त्यांना कळविण्यात आले आहे. त्यावर जन माहिती अधिका-यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ज्यावेळेस

अपिलकर्ता यांनी माहिती मागीतली त्यावेळेस चौकशी सुरु होती/तपास सुरु होता व त्यामुळे तपासावर कोणत्याही प्रकारचा विपरित परिणाम होऊ नये म्हणून माहिती नाकारण्यात आली होती. मात्र त्यानंतर अपमृत्यू झालेल्या मिनाक्षी चिन्नु यांच्याबाबत यांचे वडील श्री.रामास्वामी मुतल्ला यांनी माहिती उपलब्ध करुन देऊ नये अशी हरकत घेतली असल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही. दुस-या अपमृत्यूबाबत मा.न्यायालयातील प्रकरण संपलेले आहे त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देता येईल. त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की. त्या संपूर्ण प्रकरणात सुरुवातीपासून उपस्थित असल्यामुळे श्री.रामास्वामी मुतल्ला यांनी हरकत घेतली असली तरी ती माहिती उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही. परंतु त्याबाबत पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्रयस्थ पक्षाने हरकत घेतल्यानंतर जर माहिती उपलब्ध करुन दिली तर त्या संदर्भात त्रयस्थ पक्ष पुन्हा हरकत घेऊ शकतो किंवा न्यायालयातही जाऊ शकतो. तसेच अर्जदाराचा नमूद गुन्हयाशी किंवा अपमृत्यूशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. तसेच गु.र.क्र.३८२/०८ मधील कागदपत्र मा. महानगर दंडाधिकारी न्यायालयात सादर असल्यामुळे अर्जदार यांनी मा.महानगर दंडाधिकारी न्यायालय, मुंबई येथे विनंती अर्ज करुन सदर कागदपत्र प्राप्त करुन घ्यावीत असे जन माहिती अधिका-यांनी सांगितले.

अधिनियमाच्या कलम ११(१) अन्वये त्रयस्थ पक्षाने म्हणजे मिनाक्षी चिन्नु यांचे वडिल रामास्वामी मुतल्ला यांनी तिच्या मृत्यूच्या संदर्भात कागदपत्र उपलब्ध करुन देण्यास हरकत घेतलेली असल्यामुळे सदरची कागदपत्र उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होणार नाही. परंतु गु.र.क.३८२/०८ च्या संदर्भात मा.महानगर दंडाधिकारी न्यायालयातील कार्यवाही संपलेली असल्यामुळे पोलीस कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. अधिनियमाच्या कलम ८(१)(ख)अन्वये न्यायालय किंवा न्यायाधिकरणाने जी माहिती प्रकाशित करण्यात स्पष्टपणे मनाई केलेली आहे किंवा जी प्रकट केल्यामुळे न्यायालयाचा अवमान होऊ शकेल अशी माहिती प्रकट करण्यास अपवाद करण्यात आला आहे. सदर प्रकरणी मागीतलेली माहिती जरी न्याय प्रविष्ठ असेल व न्यायालयाच्या अधिनियमाच्या कलम ८(१)(ख) अन्वये प्रकट करण्यास मनाई केलेली नसेल तर माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. त्याप्रमाणे पोलीस कार्यालयातील गु.र.क्र.३८२(०८) मधील माहिती ही अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना ग.र.क्र.३८२/०९ मधील त्यांच्या दि.२५.६.२०१० च्या अर्जात मागीतलेली माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

२) **अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** — **(विलास पाटील)**
**दिनांक ९.५.२०११** — **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाणियाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४०७/अपील क्रमांक ६६०५/२०१०**
**क्रमांक-मुमाआ/४०८/अपील क्रमांक ६६०६/२०१०**
**क्रमांक-मुमाआ/अपील क्रमांक ६६१७ ते ६६२४/२०१०**

**श्री.पांडुरंग वासुदेव ढोके,**
**श्री.पांडुरंग वासुदेव ढोके,**
**श्री.विजय लक्ष्मण तळेकर,**
**श्री.राजेश कृष्णा गोसावी,**
**श्री.अशोक प्रभाकर नाचणकर,**
**श्री.रोनाल्ड फ्रान्सीस अल्बुकर्क,**
**श्रीमती पुजा प्रभाकर साटम,**
**श्री.जानराव दत्ताजीराव जाधव,**
**श्री.अनंत राजाभाऊ गांगुर्डे,**
**श्री.संजय गोविंद साळवी ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रमुख कर्मचारी अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,प्रमुख कर्मचारी अधिकारी यांचे कार्यालय,**
**सामान्य प्रशासन विभाग, जुनी इमारत, दुसरा मजला,महापालीका मुख्यालय,**
**महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहप्रमुख कर्मचारी अधिकारी(आस्था.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,प्रमुख कर्मचारी अधिकारी यांचे कार्यालय,**
**सामान्य प्रशासन विभाग, जुनी इमारत, दुसरा मजला,महापालीका मुख्यालय,**
**महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ०७.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १९.०४.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता श्री.पांडुरंग वासुदेव ढोके,श्री.जानराव दत्ताजीराव जाधव,श्रीमती पूजा प्रभाकर साटम, श्री.रोनाल्ड फ्रान्सीस अल्बुकर्क, श्री.अशोक प्रभाकर नाचणकर, श्री.राजेश कृष्णा गोसावी,श्री.विजय लक्ष्मण तळेकर,श्री.अनंत राजाभाऊ गांगुर्डे,श्री.संजय गोविंद साळवी यांनी दि.१०.९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सह प्रमुख कर्मचारी(आस्थापना),सा.प्र.वि.(परीक्षा विभाग),बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे १)दुकाने व आस्थापना खात्याच्या दि.२३.७.२०१० रोजी झालेल्या पेपर-१ च्या आदर्श उत्तरपत्रिकेची प्रमाणित प्रत व बैठक क्र.१४ च्या उत्तरपत्रिकेची प्रमाणित प्रत मिळणेबाबत, माहितीचा कालावधी १ जुलै,२०१० ते ३१ जुलै,२०१० तसेच २)पेपर क्र.१ मध्ये उत्तीर्ण झालेल्या परिक्षार्थी कर्मचा-यांच्या तपासलेल्या उत्तरपत्रिकेच्या प्रमाणित प्रती मिळणेबाबत, माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन माहिती मागीतलेली दिसून येते. तोच अर्ज त्यांनी पुन्हा दि.१६.८.२०१० रोजी दिलेला आहे. इतर अपिलार्थी यांनी दि.१५.१.२०११ रोजी वरीलप्रमाणे संबंधित माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागणेबाबत अर्ज केलेले आहेत. सदरच्या अर्जांच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी

तथा सह प्रमुख कर्मचारी अधिकारी(आस्थापना) यांनी दि.१६.८.२०१० रोजी व २९.१.२०११ रोजी सर्व अर्जदारांनी केलेली उत्तरपत्रिकांच्या प्रमाणित प्रती देण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१)(च) मधील तरतुदीनुसार तसेच प्रचलित धोरणानुसार मान्य करता येत नाही असे कळविलेले दिसून येते.

२. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे सर्व अपिलकर्ता हयांनी दि.२४.८.२०१० व १०.२.२०११ रोजी प्रथम अपीले दाखल केलेली दिसून येतात. सर्व प्रथम अपीलांच्या संदर्भात दि.२३.९.२०१० रोजी दि.५.३.२०११ रोजी अपिलकर्त्यांनी मागीतलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नसल्यामुळे तसेच महानगरपालिकेच्या नियमानुसार देता येत नाही व उत्तरपत्रिकेची प्रमाणित प्रत अद्यापपर्यंत कोणत्याही सक्षम अधिका-यांकडून मान्यता प्राप्त झाली नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तरास सहमती दर्शवून अपीलीय अधिकारी यांनी सर्व अपीले निकाली काढलेली दिसून येतात.

३. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे सर्व अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपील क्र.६६०५,६६०६(पूर्वीचा अपील क्र.६४५६ व ६४५७) यांची सुनावणी दि.२३.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या समोर झाली होती. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती नाकारतांना श्रीमती त्रिसा ईरीश विरुध्द केंद्रीय जन माहिती अधिकारी, केरळ,पो.त्रिवेंद्रम यांच्या दि.६.२.२००६ रोजी अपील क्र.PCPB/A-2/CIC/2006 च्या निकालाचा संदर्भ दिला आहे. मात्र त्या निकालाच्या संदर्भात मा.उच्च न्यायालय, केरळ यांच्या दि.३०.८.२०१० रोजी दिलेला निर्णय अपिलकर्ता यांना सादर केला होता. सदर न्यायालयाचा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांना माहिती उपलब्ध नसल्याने त्या निर्णयाची प्रत त्यांना देण्यात यावी असे आदेश देऊन सुनावणी पुढील तारखेपर्यंत पुढे ढकलण्यात येत आहे असे मा.राज्य माहिती आयुक्त यांनी जाहीर केले. त्यानंतर अपिलकर्ता श्री.ढोके व इतर अपिलकर्ता यांची सर्व अपीले एकाच विषयाची माहिती मागीतलेली असल्याने दि.१९.४.२०११ रोजी घेण्यात आली.

४. अपिलकर्ता यांनी लेखी युक्तीवाद साद केला आहे. तसेच तोंडी युक्तीवाद करतांनासुध्दा त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, उत्तरपत्रिका उपलब्ध करुन देऊ नये अशाप्रकारची कोणतीही तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींमध्ये नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम २(त्र)(४)अन्वये जी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात/हस्ताक्षरात लिहून साठविलेली माहिती याबाबत दि.७.१.२०१० रोजी अपिल क्र.CIC/WB/A/२००९/०००६१५(श्री.विनोद कुमार विरुध्द न्यू पोलीस लाईन, किंग्जले कॅंप) अन्वये "आदर्श उत्तरपत्रिका"ही माहितीच्या व्याख्येत येत असून ती अपिलकर्त्याला उपलब्ध करुन देण्यात यावी. आदर्श उत्तरपत्रिकेवरुन प्रशासनाला आदर्श उत्तरे कशाप्रकारे अभिप्रेत आहेत/होती याचा उमेदवाराला बोध घेता येईल. परीक्षार्थी आणि प्रशासन(परीक्षा मंडळ/विभाग) यांमधील विश्वासाधित संबंध हे तपासलेल्या उत्तरपत्रिका या सार्वजनिक माहिती म्हणून संबोधण्यात येऊन प्रत्ये परीक्षार्थिला किंवा अन्य कोणत्याही त्रयस्थ व्यक्तिला अवलोकनार्थ खुल्या केल्या जातील तेव्हा अधिक दृढ,स्पष्ट व निशःक होतील.

"An answer sheet is not a private parchment supplied by a third party. It is a public paper in the custody of a public authority i.e.M.C.G.M. The answer sheets or the marks obtained by candidated are not their private possessions, but sacrosanct record impacting public life and also the fate and future of the competitors. Nothing in the administrative reals is personal or private those who choose to enter public affairs, must learn to live by public scrutiny."

कलम ८(१)(च)चे संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात चर्चा केली असता एखाद्या कोणत्याही बढतीच्या/पदोन्नतीच्या खात्यांतर्गत परीक्षेच्या पेपर तपासणीतील भ्रष्टाचारासंदर्भात किंवा चुकीच्या/अन्यायकारक पेपरतपासणी संदर्भात संसदेत किंवा राज्य विधानमंडळात प्रश्न उपस्थित केला गेल्यास, संबंधित प्राधिकरण त्यास उत्तरपत्रिका देण्याचे नाकारु शकत नाही अशा स्थितीत परीक्षार्थीने अथवा कोणत्याही व्यक्तीने उत्तरपत्रिका मागीतल्यास संबंधित प्राधिकरण म्हणजेच बृहन्मुंबई म.न.पा. उत्तरपत्रिका देण्याचे नाकारु शकत नाही.

There is no provision in the Act to deny information on the ground that the supply of the information would disproportionately divert the resources of the public authority.

The difficulties a public authority may encounter in the matter of supply of information are no grounds to deny the information, if that information is available and not exempted from disclosure. Whatever be the difficulties, unless the information is exempt from disclosure, the public authority is bound to disclose the same. The information is voluminous, if all candidated apply for the information with the available infrastructure it may not be possible to cope up with the request, the cuthority will have to depute additional manpower to collect and supply the information etc. are not reasons available to the public authority to deny information to a citizen who applies for the same. The public Authority can only insist on reasonable fees for supply of the information as per rules prescribed for the same. Even otherwise it is idle for a public authority to assume that only these candidates dissatisfied with the results would apply for copies of the answer sheets, which would be a small fraction of the total number, if the evaluation is fair and proper and if the valuation is largely unfair and improper, then it is in public interest that the truth come out, whatever be the difficulties. Therefore unless the public authority has something to hide, they should not worry about those difficulties,which in any event are not likely to occur in the normal course.

उत्तरपत्रिका तपासण्यात अन्याय झाला आहे किंवा नाही हे उत्तरपत्रिका हातात मिळाल्यानंतरच समजू शकते. अनुत्तिर्ण् होणा-या प्रत्येक कर्मचा-याला आपल्यावर अन्याय झाला आहे असे वाटते पण हातात उत्तरपत्रिका मिळाल्याशिवाय तो त्याच्यावर झालेला अन्याय वरिष्ठांसमोर सिध्द करु शकत नाही.

मुंबई महानगरपालिकेने(प्राधिकरणाने) कोरी उत्तरपत्रिका आणि प्रश्नपत्रिका पुरविली. परीक्षार्थींनी कोरी उत्तरपत्रिका त्यांच्या घरुन आणली नव्हती म्हणजेच ती उत्तरपत्रिका सार्वजनिक मालमत्ता होती हे मान्य करावे लागेल.परीक्षार्थींनी त्यावर उत्तरे लिहिली त्यानतर प्राधिकरणाने त्या लिहिलेल्या उत्तरपत्रिका तपासून निर्णय लावण्यासाठी ताब्यात घेतल्या. तपासून निर्णय जाहीर होईपर्यंत त्या पेपरवर लिहिलेला सारा मजकूर ‘‘गुपित’’या व्याख्येत येत होता. संबंधित परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर त्रयस्थ परीक्षार्थीचे गुपित सुध्दा जनतेसमोर खुले झाले होते म्हणजेच माझ्या उत्तरपत्रिकेसह माझ्या सर्व सहका-यांच्या उत्तरपत्रिका या सार्वजनिक दस्तऐवज म्हणून विश्वस्त या नात्याने प्राधिकरणाच्या परीक्षा विभागाच्या ताब्यात देण्यात आल्या. मला माझ्या उत्तरपत्रिकेत लिहिलेल्या उत्तरांनी उत्तीर्ण होण्याची खात्री असतांना जेव्हा अनुत्तीर्ण असा निर्णय हाती येतो तेव्हा माझ्यावर अन्याय झाल्याची भावना जागृत होते आणि अशावेळी मी मागणी केलेली माझी व इतर सहका-यांच्या उत्तरपत्रिका देण्यासाठी प्राधिकरण नकार देते तेव्हा विश्वासाश्रित संबंधांना तडा जातो.

इतर सहका-यांनी लिहिलेली उत्तरे अचूक व आदर्श असतील तसेच सर्वांना झालेले गुणदान न्याय्य असेल तर माझ्या इतर सहका-याच्या (त्रयस्थ व्यक्ती) तपासलेल्या उत्तरपत्रिका माझ्या माहितीसाठी, प्रबोधनासाठी, मार्गदशक ठरतील त्यामुळे इतर सहका-यांच्या उत्तरपत्रिका मला माहिती म्हणून देण्यास प्रशासनाची कोणतीही हरकत नसावी कारण यातूनच प्रशासनाची,परीक्षा मंडळाचा पारदर्शिपणा,प्रामाणिकपणार, योग्य न्यायदान व्यापक सार्वजनिक हित साधणारे असेल. Once the result has been declaired, fairness of the competitive process itself makes it imperative to lift the veil of secrecy and confidentiality. Openness is the essence of fairness an answersheets is not a private

property supplied by the public authority(M.C.G.M.)It is a public document in the custody of a public authority conducting an examination for a public service.

संदर्भ-१) दिल्ली उच्च न्यायालयाचा दि.३०.४.२००९ चा याचिका क्र.WP(c) ८५२९/२००९ (ICAI v/s CIC)

२) पटना उच्च न्यायालयाचा दि.११.१२.२००८ चा याचिका क्र.CWJC No.१६०६६५/२००८(BPSC v/s SIC & Ors)

३)केरळ उच्च न्यायालयाचा दि.२९.२.२००८ चा याचिका क्र.WP-No.३०९६३/ २००६(J) आणि दि.३०.८.२०१० चा याचिका क्र. WP(c)No.-६५३२/२००६(c) (Trisa Irish v/s CPIO Dept. of Post,Govt. of India & others) तसेच केंद्रीय महिती आयोगाच्या खंडपीठाचा दि.२३.४.२००७ चा कंप्लेंट केस नं.CIC/WB/C२०००६/००२२३, Appeal Nos.CIC/WB/A/२००६/००४६९ & ००३९४, Appeal Nos.CIC/OK/A/२००६/ OC२६६/०००५८/०००६६/००३१५.

वरील सर्व बाबी विचारात घेऊन माझ्या माहितीप्रमाणे माझ्यावर झालेल्या अन्यायाला दूर करण्यासाठी व माझ्यासारख्या इतर सहका-यांवर होणा-या/झालेल्या अन्यायाला दूर करण्यासाठी व्यापक लोकहिताच्या दृष्टीने भविष्यात प्रत्येकाला त्यांची उत्तरपत्रिका मिळावी यादृष्टीने मी मागीतलेली माहिती मला देण्यासाठी आपण संबंधित प्राधिकरणास आदेश द्वावेत अशी मी विनंती करतो.

मुद्दा क्र.३ - पेपर क्र.१मध्ये उत्तीर्ण झालेल्या परीक्षार्थी कर्मचा-यांच्या तपासलेल्या उत्तरपत्रिकेच्या प्रमाणित प्रती मिळण्याबाबत.

वरिष्ठ निरीक्षक, दुकाने व आस्थापना या पदाच्या परीक्षेकरीता दि.२३ जुलै,२०१० रोजी पेपर क्र.१ करीता एकूण ३१ परीक्षार्थी कर्मचारी बसले होत व त्यापैकी एकूण १५ परीक्षार्थी उत्तीर्ण  झाले आहेत. पुर्नमोजणीनंतर ४२ ऐवजी ५० गुण मिळवून ०१

मागीतलेली माहिती अतिशय मोजकी असून ती माहिती या स्वरुपात सहज उपलब्ध आहे. प्रश्न क्र.२ मध्ये युक्तीवाद केल्याप्रमाणे, सदर माहिती ही त्रयस्थ खाजगी नसून सार्वजनिक स्वरुपाची आहे. वैयक्तिक हिताची नसून ती व्यापक सार्वजनिक हिताची आहे. तसेच ती प्राधिकरणावर अतिरिक्त कामाचा बोजा टाकणारी नसून मोजक्या/माफक स्वरुपाची आहे. उत्तीर्ण झालेल्या परीक्षार्थींची आदर्श उत्तरे ही व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आदर्श उत्तरपत्रिका म्हणून भविष्यात सर्वांना मार्गदर्शक ठरणारी माहिती म्हणून उपयुक्त पडणारी आहे. परिक्षकाला आदर्श उत्तरे म्हणून कशी लिहावीत याचा नमुना सर्वांच्याकरीता उपलब्ध असेल. भविष्यात उत्तरे लिहितांना मागितलेल्या उत्तरपत्रिकांचा मार्गदर्शक म्हणून उपयोग होऊन स्वत:मध्ये योग्य तो बदल करता येईल. अधिनियमाद्वारे विहित केलेले शुल्क भरण्यास मी तयार असून आपण प्राधिकरणास तशा स्वरुपाचे आदेश द्यावेत ही विनंती.

मागीतलेली संदर्भाधीन माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२१.८.२०१० च्या क्र.साप्रवि/४४२/मप, व दि.१६.८.२०१० च्या क्र.साप्रवि/४१६/मप अन्वये तसेच अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.२७.९.२०१० च्या अपिल क्र.साप्रवि/४६५/मप अन्वये ''महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार व नियमानुसार देता येत नाही'' असे दिशाभूल करणारे व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये,तरतूद असल्याप्रमाणे कोणतेही संयुक्तिक कारण किंवा कलमाचा उल्लेख करुन न देता उक्त अधिनियमाच्या कलम-२०(१) आणि २०(२) चा भंग केला आहे.

संदर्भ म्हणून अपीलीय अधिका-यांनी दिलेल्या दि.६.२.२००६ चे ऑपिल क्र.पीसीपीवी/अे-२१ सीआयसी/२००६ च्या विरोधातील केरळ उच्च न्यायालयाचा दि.३०.८.२०१० चा निकाल आपण विचारात घ्यावा तसेच अन्य राज्यातील मा.उच्च न्यायालयांचे, केंद्रीय मुख्य माहिती आयोगाचे खंडपीठांचे,मुख्य राज्य माहिती आयुक्तांचे संदर्भ सोबत म्हणून जोडलेले सन २००७ पासून सप्टेंबर,२०१० पर्यंतचे सर्व निकाल एकूण १७, विचारात घेऊन एक सर्वसमावेशक व महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील ग्रामपंचाययतीपासून वरिष्ठ पातळीवर होणा-या विविध प्रकारच्या कर्मचारी, अधिकारी यांची नियुक्ती किंवा बढती संबंधातील परीक्षांना व्यापक

लोकहिताच्यादृष्टीने, भविष्यात कोणत्याही कर्मचा-याला अपिलात न जाता योग्य न्याय मिळेल असा निर्णय देऊन मी मुद्दा क्र.१ ते ५ मध्ये मागीतलेली माहिती देण्याचे आदेश संबंधितांना द्यावेत अशी महोदयांस विनंती आहे.

जन माहिती अधिकारी यांनी दि.२१.८.२०१० रोजी व अपिलीय अधिकारी यांनी दि.२७.९.२०१० रोजी दिलेला निर्णय, "आपण मागीतलेली माहिती महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार व नियमानुसार देता येत नाही" याला अनुसरुन मी दि.७.१०.२०१० च्या अर्जान्वये, परीक्षेसंदर्भात महानगरपालिकेच्या धोरणाची किंवा नियमपुस्तिकेची प्रत माहिती म्हणून मागीतली असता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.१४.१०.२०१० च्या क्र.सा.प्र.वि./६२०/मप अन्वये, "परीक्षा आयोजित करण्यापासून ते निकाल घोषित करण्यापर्यंतच्या कार्यवाहीबाबत महानगरपालिकेने कोणतीही नियमपुस्तिका तयार केलेली नाही." असे उत्तर दिले याचाच अर्थ यापूर्वी मला अपिलात जाण्यासाठी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देऊन उक्त अधिनियमाच्या अंमलबजावणीची एकप्रकारे चेष्टा करुन कलम-२०(१) व (२) चा अवमानच केला आहे.

५. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, बृहन्मुबई महानगरपालिकेच्या दि.२३.१२.०८ रोजी अतिरिक्त आयुक्त(पूर्व उपनगरे) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परीक्षा मंडळाच्या बैठकीमध्ये विभागीय परीक्षेच्या संदर्भात निर्णय घेतलेला असून त्यामध्ये विषय क्रमांक ३ मधील(क्र.२ मध्ये) मुख्य लिपिक, ले.प. व ले.स.(प्रमुख लेखापाल),वरिष्ठ निरिक्षक(अनुज्ञापन) परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या कमचा-यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत उत्तरपत्रिकेची मागणी केल्याबाबत अध्यक्ष,परीक्षा मंडळ यांनी प्रचलित धोरणानुसार कोणत्याही कर्मचा-यास त्यांच्या उत्तरपत्रिकेची प्रत देण्यात येऊ नये अशा स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. मात्र उत्तरपत्रिकेची पुर्नमोजणी करण्याबाबत मुख्यालयातील प्रशासकीय अधिका-यांची नेमणूक करण्यात यावी असाही निर्णय घे्ण्यात आलेला आहे व या निर्णयाप्रमाणेच सर्व अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी उत्तरपत्रिकांची छायांकित प्रत प्रचलित धोरणानुसार उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविले होते. उत्तरपत्रिका तपासतांना परिक्षक व परिक्षा मंडळ यांच्यामध्ये एक विश्वासार्ह नाते तयार झाले असते व त्या विश्वासानेच प्रामाणिकपणे उत्तरपत्रिका तपासण्यात आलेल्या असतात व त्यामुळे जर उत्तरपत्रिका उपलब्ध करुन दिल्यास परिक्षकांच्या संदर्भात विनाकारण गैरसमज निर्माण होतील व पुढे उत्तरपत्रिका तपासण्यासाठी परिक्षक उपलब्ध होऊ शकणार नाहीत. त्यामुळे अधिनियमाच्या कलम ८(१)(ज) अन्वये कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक हित नसल्यामुळे सदरच्या उत्तरपत्रिका उपलब्ध करुन देण्यात येऊ नये अशी आयोगास विनंती आहे.

६. सार्वजनिक प्राधिकरणात पदोन्नतीच्या संदर्भात ज्या विभागीय परीक्षा घेतल्या जातात त्या अर्थातच सार्वजनिक सेवेमध्ये कुशलता/कार्यक्षमता यावी यादृष्टीने घेतल्या जातात व त्यामुळे उमेदवारांच्या म्हणजेच पर्यायाने अधिका-यांच्या उच्च पदावरील जबाबदारीसुध्दा वाढते. अशा वेळेस सदरच्या उमेदवाराबाबत कार्यक्ष्मता असण्याच्या संदर्भात निवडपध्दतीमध्ये पारदर्शकता असणे आवश्यक आहे. अन्यथा प्रशासनामध्ये ज्या कार्यक्षमतेची आवश्यकता असते त्या कार्यक्षमतेलाच बाधा येण्याची शक्यता निर्माण होऊ शकते व त्याकरीता विभागीय परीक्षांमध्येही निःपक्षपातीपणा व समतोलपणा ठेवणे आवश्यक आहे. परिक्षांमध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता झालेली नाही याबद्दलची खात्री होण्याकरीता पारदर्शकता आवश्यक आहे. विभागीय परीक्षांना बसलेले उमेदवार मर्यादित असल्यामुळे त्या परीक्षांच्या संदर्भातील उत्तरपत्रिका त्या परिक्षार्थीस उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास सार्वजनिक प्राधिकरणाच्या यंत्रणेवर कोणत्याही प्रकारचा भार पडण्याची शक्यता नाही.

७. काही अपिलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी उत्तर देतांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कोणत्याही कलमाचा आधार घेऊन माहिती नाकारलेली नाही तर म.न.पा.च्या प्रचलित धोरणानुसार माहिती देता येणार नाही असे उत्तर दिलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंमलात आल्यानंतर अधिनियमाच्या कलम २२ प्रमाणे त्या अधिनियमाच्या सर्व तरतुदींना अधिभावी परिणाम दिलेला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींशी कोणत्याही अधिनियम/नियम, आदेश किंवा धोरणाशी विसंगत असणा-या सर्व तरतुदी या निष्प्रभ ठरतात आणि माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी या प्रभावी ठरतात. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा 'संसदेचा' अधिनियम असल्यामुळे तो संपूर्ण देशात

अंमलात आलेला आहे व त्यामुळे त्या अधिनियमाच्या तरतुदी या म.न.पा.ला तितक्याच प्रभावीपणे लागू आहेत. त्यामुळे म.न.पा.ने कोणतेही धोरण ठरविले असल्यास ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींशी जर विसंगत असेल तर म्हणजे सार्वजनिक प्राधिकरणातील माहिती प्रकट करणे हा नियम आहे व प्रकट न करणे हा अपवाद आहे व त्यामुळे अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींशी संबंधित नसलेले धोरण किंवा नियम हा प्रभावी ठरणार नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना म.न.पा.च्या प्रचलित धोरणाप्रमाणे माहिती देता येणार नाही असे म्हणता येणार नाही. काही अर्जातील माहितीच्या संदर्भात माहिती प्रकट करावयाची नसल्यास कलम ८(१) प्रमाणे दिलेल्या निकषांच्या आधारावरच ती अपवाद म्हणून कारणमिमांसा देऊन नाकारणे  हे अपेक्षित असते. काही अपिलार्थी यांच्या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ८(१)(ञ)प्रमाणे माहिती देता येणार नाही असे कळविलेले आहे. परंतु कलम ८(१)(ञ)च्या तरतुदी काय आहेत व त्या तरतुदीप्रमाणे मागीतलेली माहिती का देता येणार नाही याबद्दलची कोणतीही कारणमिमांसा त्यांनी दिलेली नाही. अधिनियमाच्या कलम ८(१)(ञ) प्रमाणे जी माहिती प्रकट करणे हे व्यापक लोकहिताच्यादृष्टीने आवश्यक आहे अशी, राज्य जन माहिती अधिका-यांची किंवा अपिल प्राधिका-यांची खात्री पटली असेल ती खेरीज करुन,जी प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधांशी काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्तीच्या खाजगी बाबतीत आगंतुक हस्तक्षेप करेल, अशी वैयक्तिक तपशीलासंबंधातील माहिती अशी तरतूद आहे.

८. वरील तरतुदीमध्ये व्यापक सार्वजनिक हिताच्यादृष्टीने जी संकल्पना घेतलेली आहे त्याबाबत विचार केल्यास कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणातील सार्वजनिक सेवांच्या संदर्भातील कोणतीही बाब ही व्यापक सार्वजनिक हिताचीच असते व त्यामुळे सदरच्या उत्तरपत्रिकांबाबत पारदर्शकतेच्यादृष्टीने व कार्यक्षमतेच्यादृष्टीने कोणतीही अनियमितता झालेली नाही व ते पडताळणी करण्याकरीता प्रकट करणे याचाच अर्थ सार्वजनिक व्यापक हिताकरीता प्रकट करणे होय.सार्वजनिक सेवेतील कार्यक्षमता व पदोन्नती याकरीता सार्वजनिक सेवांमध्ये विभागीय परीक्षा घेण्यात येत असल्याने सार्वजनिक सेवांचा दर्जा सुधारणे असा उद्देश असल्याने विभागीय परीक्षांच्या उत्तरपत्रिका या अधिनियमाचे कलम २(च) मधील 'माहिती' या संज्ञेच्या व्याख्येत समावेश होतो व पर्यायाने सार्वजनिक अभिलेख्यांचाच भाग होतो. उत्तरपत्रिका ही कोणत्याही परीक्षार्थीची वैयक्तीक/खाजगी बाब राहत नाही. Evidence Act,१८७२ च्या कलम ७४ प्रमाणे 'सावजनिक दस्तऐवजाची'(Public Document)ची व्याख्या केलेली आहे ती येणेप्रमाणे -७४.Public Documents - The following documents are public documents - १)Documents forming the acts, records of public documents - i) of the sovereign authority

ii) of official bodies and tribunals, and

iii) of public officers, legislative,judicial and executive, of any part of Indi or of the common wealth, or of a foreign country

२) Public records kept in any state of private documents

कलम २(च)(अ)मधील 'माहिती' व 'अभिलेख' व वरील Evidence Act प्रमाणेची व्याख्या एकत्रित वाचल्यास उत्तरपत्रिका हया सार्वजनिक अभिलेख्याचा भाग होतात.त्यामुळे उत्तरपत्रिका उपलब्ध करुन दिल्यास विभागीय परिक्षा पध्दतीमध्ये पारदर्शकता,कार्यशीलता,उत्तरदायित्व व निःपक्षपातीपणा येऊन सार्वजनिक सेवांचा दर्जा सुधारण्यास वाव राहील. त्यामुळे सार्वजनिक अभिलेख्याचा भाग उत्तरपत्रिका होत असल्यामुळे त्या नियमानुसार प्रकट करणे आवश्यक राहील. महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानसार प्रकट करता येणार नाही असे म्हटले असले तरी प्रचलित धोरणानुसार त्या प्रकट करण्यात येऊ नये याबद्दल कारणमिमांसा दिलेली नाही. त्यामुळे विभागीय परिक्षांचे उत्तरपत्रिका गोपनीय अभिलेखे नाहीत व प्रकट करणे अधिनियमाचे तरतुदींशी संबंधित आहे. परंतु उत्तरपत्रिका उपलब्ध करुन देतांना त्याबरोबर जर परिक्षकांची नावे उपलब्ध करुन दिली तर त्याबाबत सार्वजनिक प्राधिकरणात अंतर्गत वाद वाढण्याची शक्यता असल्यामुळे उत्तरपत्रिका उपलब्ध करुन देतांना परिक्षकांची नावे प्रकट होणार नाहीत अशाप्रकारे तरतूद करुन (बार कोड देऊन) सदरची उत्तरपत्रिका उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व अपिलकर्त्यांच्या माहितीच्या अर्जामधील मागणीप्रमाणे त्यांच्या स्वतःच्या

उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. मात्र इतर परिक्षार्थी कर्मचा-यांच्या उत्तरपत्रिका मात्र कोणत्याही दुस-या कर्मचा-यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होणार नाही. तसेच अर्जामध्ये 'आदर्श उत्तरपत्रिका'सुध्दा अपिलकर्ता यांनी मागीतलेली आहे. 'आदर्श उत्तरपत्रिका' ही कोणत्याही परिस्थितीत गोपनीय उत्तरपत्रिका असू शकत नाही. त्याकरीता अपिलकर्ता यांनी जो युक्ती वाद केलेला आहे तो योग्य आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांना आदर्श उत्तरपत्रिकासुध्दा उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. हा निर्णय या अर्जात मागीतलेल्या विभागीय परीक्षांचे मर्यादेपर्यंतच लागू राहील. त्याकरीता सर्व अपीले मंजूर करण्यास पात्र आहेत.

## आदेश

**१) अपिलकता यांची सर्व अपीले मंजूर करण्यात येत असून प्रत्येक अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जात मागीतल्याप्रमाणे आदर्श उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत तसेच त्यांच्या स्वतःच्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. अर्जदार अपिलार्थी यांना इतर कोणत्याही परिक्षार्थींची उत्तरपत्रिका देता येणार नाही.**
**२) आदेशाची प्रत अपिलार्थी व उत्तरवादी यांना पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.**

**मुंबई** — **(विलास पाटील)**
**दिनांक १९.४.२०११** — **राज्य मुख्य माहिती आयुक्त**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ िर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०६७७/अपील क्रमांक ६६९५/२०१०**
**क्रमांक-मुमाआ/५०६७९/अपील क्रमांक ६६९७/२०१०**

**कु.अफ्ताब ए. सिद्दिकी,**
**४, सदानंद क्लासिक, प्लॉट नं.५२८,**
**३३वा रस्ता, खार(प.), मुंबई-४०००५२. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**परिमंडळ-९,हिल रोड,**
**बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त(पश्चिम नियंत्रण कक्ष),**
**परिमंडळ-९,हिल रोड,**
**बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २२.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १८.५.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांच्या दि.२१.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,नॉर्थ वेस्ट रिजन, कार्टर रोड, बांद्रा(प.), मुंबइ-४०००५० यांच्याकडे सन १९९० पासून अदखलपात्र दाखल झालेल्या गुन्हयांच्या संदर्भात पोलीस स्टेशन डायरीत श्री.तबरेज ए.शेख आणि श्री.अलीजान सुलेमान शेख यांच्याविरुध्द निर्मल नगर पोलीस स्टेशनमध्ये दाखल झालेल्या केसेसच्या संदर्भात लोकल क्राईम रजिस्टरचे निरिक्षण मागीतलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.६.९.२०१० रोजी तबरेज शेख व अलीजान शेख यांच्याविरुध्द कोणत्याही गुन्हयाच्या नोंदी आढळून आलेल्या नाहीत याकरीता निरंक अहवाल, अर्जदार यांनी अभिलेख पडताळणीसाठी सोमवार ते शनिवार कार्यालयीन वेळेत निर्मल नगर पोलीस ठाणे, पोलीस निरिक्षक(तपास) यांच्याशी संपर्क साधावा. येण्यापूर्वी सदरबाबत आगाऊ माहिती द्यावी तसेच अर्जदार दाखवतील त्या संबंधित अभिलेखाच्या प्रती त्यांना देण्यात येतील असे कळविण्यात आले होते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.२५.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात दि.२७.१०.२०१० रोजी अपिलार्थी गैरहजर असल्यामुळे व श्री.तबरेज शेख व अलीजान शेख यांच्याविरुध्द निर्मल नगर पालीस ठाणे, मुंबई येथे सन १९९० ते २१.८.२०१० या कालावधीत नोंदविलेल्या गुन्हयांच्या अनुषंगाने अदखलपात्र व दखलपात्र गुन्हयांची स्टेशन डायरी आणि एल.ए.सी. रजिस्टर या अभिलेखाची पडताळणी करणेबाबत नमूद केले आहे. त्याबद्दल अपिलार्थी यांना समाधानकारक उत्तर दिलले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून यते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्याकडे श्री.तबरेज शेख व श्री.अलिजान शेख यांच्याविरुध्द गुन्हे दाखल झाल्याची माहिती आहे परंतु जन माहिती अधिकारी हे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करीत आहेत. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, श्री.

तबरेज शेख यांनी अधिनियमाच्या कलम ११(१)(२) अन्वये मागीतलेली माहिती ही त्यांच्या स्वतःच्या व त्यांच्या वडिलांच्या संदर्भात असल्यामुळे ती त्रयस्थ पक्षाची माहिती आहे व अर्जदार हे त्यांच्या विरोधात सूड भावनेने तक्रार अर्ज करत असून त्यांच्याबाबत व त्यांच्या वडिलांच्याबाबत माहिती मिळवून त्या माहितीचा ते दुरुपयोग करु शकतात व त्यामुळे त्यांच्यापासून त्रास होऊ शकतो असा जबाब दिलेला असल्यामुळे त्यांना ती माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. परंतु पोलीस स्टेशन डायरी व एल.ए.सी. रेकॉर्ड हे सार्वजनिक अभिलेख असल्यामुळे व ती कोणत्याही त्रयस्थ पक्षाची माहिती होत नाही. त्यामुळे त्यांनी कळविलेल्या दिनांक ६.९.०९ च्या उत्तराप्रमाणे व घेतलेल्या जबाबामध्ये निर्मलनगर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केलेला आहे असे दिसून येत असून तफावत दिसून येते व तसे असल्यास अपिलकर्ता यांचे म्हणणे पडताळून घेणे आवश्यक आहे. त्याकरीता अपिलकर्ता यांनाी त्यांच्या दि.२१.८.२०१० च्या अर्जाप्रमाणे मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात पोलीस स्टेशन डायरी व एल.ए.सी.(लोकल क्राईम रजिस्टर) च्या संदर्भात (उपलब्ध असल्यास निरिक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे कामकाजाच्या दिवसाची तारीख व वेळ लेखी कळवून त्या दिवशी उपस्थित राहून त्यांच्या दि.२१.८.२०१० च्या अर्जात मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात स्टेशन डायरी व एल.ए.सी.चे निरिक्षण करुन आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन घ्यावी. जन माहिती अधिकारी यांनी अर्जदार यांनी लेखी कळविल्यानुसार त्यावेळेस पोलीस स्टेशन डायरी व एल.ए.सी.रेकॉर्ड निरिक्षणासाठी विनामुल्य उपलब्ध करुन द्यावे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १९.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ार्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०६७७/अपील क्रमांक ६६९६/२०१०**

**कु.अफ्ताब ए. सिद्दिकी,**
**४, सदानंद क्लासिक, प्लॉट नं.५२८,**
**३३वा रस्ता, खार(प.), मुंबई-४०००५२. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रमुख अग्निशमन अधिकारी,**
**मुंबई अग्निशामक केंद्र, ई वार्ड म्युनिसिपल बिल्डिंग,**
**२रा मजला, शेख हफिजुद्दिन मार्ग, भायखळा, मुंबई-०८.**

**जन माहिती अधिकारी तथा उप-प्रमख अग्निशमन अधिकारी,**
**मुंबई महानगरपालिका, मुंबई अग्निशमन दल,**
**प्रमख अग्निशमन अधिकारी यांचे कार्यालय, मरोळ फायर स्टेशन,**
**अग्निशमन दल मार्ग, मरोळ नाका,**
**अंधेरी(पूर्व), मुंबइ-४०००५९. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २२.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १८.५.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२१.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्य अग्निशमन अधिकारी यांच्या कार्यालयात Misuse of condonation file No.२४६८, २४५८,२४३२,२७३८ & २२०७ च्या संदर्भात एनओसी दिली असेल तर त्या संदर्भात एकूण ३ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२७.७.२०१० रोजी अर्जदाराचा अर्ज पूर्ण नसून त्यामध्ये सीटीएस,प्लॉट नंबर, एरीया,आर्किटेक्टचे नाव वगैरे कोणतीही माहिती नाही व त्यामुळे कोणत्या प्रकारची माहिती द्यावी ते कळून येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.३०.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागीतली आहे ती माहिती देण्याची टाळाटाळ जन माहिती अधिकारी अग्निशमन विभाग करत आहेत. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, अपिलकर्ता यांच्या दि.२१.७.२०१० च्या अर्जामध्ये त्यांनी नस्ती क्रमांक दिलेले आहेत व प्रत्यक्ष जागेवरील लोकेशन दिलेले आहे. परंतु त्यांच्या कार्यालयात सीटीएस नंबरप्रमाणे अभिलेखे ठेवले जातात व त्यामुळे त्यांना तसे कळविण्यात आले होते. परंतु त्यांनी जे सीटीएस नंबर कळविलेले आहेत ते मागीतलेल्या माहितीशी जुळुन येत नाहीत व त्याबाबत त्यांना दि.१६.११.२०१० रोजी कळविण्यात आले होते. त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. यावरुन अर्जदार अपिलकर्ता यांना ज्या सीटीएसच्या संदर्भात माहिती अपेक्षित आहे त्याकरीता त्यांनी प्रत्यक्ष निरिक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, त्यांच्याकडे बांधकाम व प्रस्ताव या विभागाकडून किंवा वास्तुशास्त्रज्ञ या विभागाकडून नस्त्या पाठवल्या जातात व त्यांचे अभिप्राय घेतले जातात किंवा एनओसी मागीतली जाते. तरी या संदर्भात त्यांनी निरिक्षण घेतल्यास त्यांना अपेक्षित माहिती मिळू शकेल. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांच्याकडे कामकाजाच्या दिवसाची तारीख व वेळ लेखी कळवून त्याप्रमाणे उपस्थित राहून त्यांना अपेक्षित असलेल्या बांधकामाच्या संदर्भात अभिलेखे उपलब्ध असतील त्यांचे निरिक्षण करुन आवश्यक ती माहिती(एनओसी संदर्भात) उपलब्ध करुन घ्यावी. जन माति अधिकारी यांनी अपिलकर्ता अर्जदार हजर झाल्यावर त्यांना त्यांच्या दि.२१.६.२०१० च्या अर्जात मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात तसेच त्यांनी दि.८.११.२०१० रोजी कळविलेल्या सीटीउस क्रमांकाच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १९.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाíर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०६८०/अपील क्रमांक ६६९८/२०१०**

**कु.अफ्ताब ए. सिद्दिकी,**
**४, सदानंद क्लासिक, प्लॉट नं.५२८,**
**३३वा रस्ता, खार(प.), मुंबई-४०००५२. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा विधी अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका लिगल डिपार्टमेंट,२रा मजला,**
**हॉल नं.२००, न्यू ॲनेक्स बिल्डिंग,**
**म्युनिसिपल हेड ऑफीस, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपविधी अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका लिगल डिपार्टमेंट,२रा मजला,**
**हॉल नं.२००, न्यू ॲनेक्स बिल्डिंग,**
**म्युनिसिपल हेड ऑफीस, महापालिका मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-४००००१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २२.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १८.५.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

सदर प्रकरणी माहिती मिळाली आहे असे अपिलकर्ता यांनी लेखी लिहून दिले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १९.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०६७६/अपील क्रमांक ६६९४/२०१०**

**कु.अफ्ताब ए. सिद्दिकी,**
**४, सदानंद क्लासिक, प्लॉट नं.५२८,**
**३३वा रस्ता, खार(प.), मुंबई-४०००५२. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा वार्ड ऑफीसर बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालीका आयुक्त, एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,**
**सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी तथा लॉ ऑफीसर बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालीका आयुक्त, एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,**
**सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २२.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १८.५.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२१.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी विधी विभाग,एच/डब्ल्यू वार्ड, बांद्रा(प.) यांच्याकडे अर्ज करुन List of legal cases in City Civil Court & Bombay High Court from the year २००० till date, तसेच Please specify Suit Nos.MCGM v/s(name of the party))Address of the structure with CTS Nos., Plot Nos. and proper address of the party अशी माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२३.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर दि.१४.९.२०१० रोजी व पुन्हा दि.२३.९.२०१० रोजी सुनावणी ठेवण्यात आली असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर सुनावणी १.१०.२०१० पर्यंत पुढे ढकलण्यात आलेली दिसून येते. त्या संदर्भात मात्र कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येत नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, अद्यापपर्यंत त्यांना कोणतीही माहिती मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी सुनावणीस गैरहजर असून त्यांनी कोणतीही कागदपत्र दाखल केलेली नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगाच्या नोटीसचा अवमान केलेला आहे यास्तव ते शास्तीस पात्र आहेत अशी आयोगाची खात्री झाली आहे. त्यामुळे त्यांनी आयोगापुढे हजर रहाण्यासाठी सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी १० दिवसाच्या आत आयोगापुढे समक्ष हजर राहून ते सुनावणीस का हजर राहिले नाहीत याचा खुलासा करावा अन्यथा**

त्यांच्याविरुध्द माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे असा निष्कर्ष काढून शास्ती लादण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक १९.५.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाािर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./१६३ /अपील क्र.६६४४/२०१०/०२**

**श्री. विठ्ठल अनाजी गिरकर ,**
**मु.पो.सोंदळ,कुंभारवाडी,**
**ता. राजापूर,जि. रत्नागिरी.** **...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी**
**राजापूर पंचायत समिती कार्यालय, राजापूर**
**ता. राजापूर जि. रत्नागिरी.**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
**ग्रामपंचायत सौंदळ (कुंभारवाडी)**
**ता. राजापूर जि. रत्नागिरी.** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक २०/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - ०९/०५/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक ३१/०५/२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांचेकडून सन २००७-०८, सन २००८-०९, सन २००९-१० या वित्तीय वर्षात ग्रुप ग्रामपंचायत सौंदळने केलेल्या विकास कामाची माहिती मिळणेबाबत उदा. रस्ते, विहीरी, घरकुल योजना, संरक्षण भिंती, संडास व अन्य काही ग्रामपंचायत निधी वापरुन केलेली कामे त्यासाठी किती निधी वापरला व ती कामे कोणामार्फत करण्यात आली याबाबत अभिलेखाचे नोंदणीनुसार तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी व द्वितीय अपिलीय प्रधिकारी यांची माहिती देण्यात यावी असा अर्ज करण्यात आला होता. सदरची माहिती प्रत्यक्ष घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि. २१/०७/२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना माहिती मिळाली परंतु ती विलंबाने व अपूर्ण माहिती मिळाली त्यावर जन माहिती अधिकरी यांनी आयोगापुढे सांगितले की , अपिलकर्ता यांनी मागितलेली

माहिती ही अतिशय व्यापक प्रमाणात आहे व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक व्यापकहित नाही. ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये प्रत्येक वर्षामध्ये अनेक कामे होत असतात. त्या सर्वच कामाची ३ वर्षातील माहिती उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास ग्रामपंचायतीतील अधिकारी कर्मचारी ही यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागली. माहिती व्यापक प्रमाणात असल्यामुळे अनेक अभिलेख, दस्तऐवज व कागदपत्रे तपासून सदरची माहिती तयार करुन ती एकत्रित रित्या देता आलेली आहे. त्यांचे स्वतःकडे ३ ग्रामपंचायतीचा अधिभार आहे तसेच माहिती काढण्यासाठी कर्मचारी स्टाफ नाही , ग्रामपंचायत सौंदळ येथे निवडणूक असल्याने आचारसंहितेचा प्रश्न उद्‌भवत होता. तसेच जून महिन्यात त्यांची आजी मयत झालेली होती. त्याचप्रमाणे मागितलेली माहिती ही जास्त होती. तरी सुध्दा नियमित माहिती देणार फक्त थोडा उशीर होईल असे अपिलार्थी यांना तोंडी कळविण्यात आले होते. याकारणास्व माहिती विलंबाने प्राप्त झाली परंतु तयार करुन देण्यात आलेली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) प्रमाणे माहिती ३० दिवसात उपलब्ध करुन द्यावयाची आहे. व त्यामुळे माहिती ही निश्‍चित अशा कादपत्रांचे वर्णन करुन मागणे अपेक्षित आहे. अनेक वर्षाच्या कालावधीतील माहिती ही मोघम स्वरुपात मागणे अपेक्षित नाही. व तशा प्रकारची मोघम माहिती मागितली असल्यास त्यास विलंब होणे अपरिहार्य आहे. मागितलेली माहिती ही विशिष्ट योजनेचे किंवा प्रकल्पाचे वर्णन करुन मागितल्यास तीस दिवसाच्या कालावधीत उपलब्ध होऊ शकते. तसेच मोघम माहिती मागितली असल्यास ती तयार सर्व नस्त्यामधून काढून तयार करुन देणे सुध्दा अपेक्षित नाही.अपिलकर्त्याने मागितलेल्या माहितीची कागदपत्रे जशा स्वरुपात असतील त्यांच्या छायांकित प्रती अधिनियमाचा निकाल दोन (ञ) मधील संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे असून त्या मधील 'माहिती' या कलम २ (ज) मधील संज्ञेच्या व्याख्येतील सहीच्या स्वरुपातील कागदपत्रे अभिलेख, दस्तऐवज, परिपत्रके इत्यादींचा समावेश होता व त्यामुळे अपिलकर्ता यांना उपलब्ध झालेली माहिती ही अपूर्ण आहे असे जरी त्यांनी प्रतिपादन केलेले असले तरी ती कशाप्रकारे अपूर्ण आहे व त्यातून त्यांना काय अर्थबोध होत नाही याबाबतचा कोणताही लेखी खुलासा त्यांनी आयोगापुढे केलेला नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. याकारणास्तव अपिल निकाली काढण्यात येते.

**---आदेश---**

**१) अपिल निकाली काढण्यात येते.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**

ˆmay 2011/PA

**दिनांक : ०९-०५-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

1. **निवडनस्ती**
2. **स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./१६६/अपील क्र.६६४५/२०१०/०२**

**श्री.डॉ. अनिरुद्ध अच्युत लेले,**
**१०५,अरिहन्त टॉवर्स,**
**जुना माल नाका,**
**रत्नागिरी .** **...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**ग्रांन्ट मेडीकल फाऊंडेशन,**
**रूबी हॉल क्लिनीक,**
**४०,सस्सून रोड,**
**पुणे ४११ ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा** **...उत्तरवादी**
**ग्रांन्ट मेडीकल फाऊंडेशन,**
**रूबी हॉल क्लिनीक,**
**४०,सस्सून रोड,**
**पुणे ४११ ००१**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक १७ /०९/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - ०९/०५/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. ०९/०५/२०१० रोजी जन माहिती आधिकारी म्हणून ग्रांन्ट मेडीकल फाऊंडेशन, रूबी हॉल क्लिनीक यांचेकडे EMS व DIHM या दोन कोर्स संदर्भामध्ये संस्थेने २००६ साली हा कोर्स शासन मान्यतेसाठी महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ , नाशिक यांचेकडून पाठविलेला आहे असे कोर्सचे डायरेक्टर डॉ.संजय व्होरा यांनी लेखी अर्ज दिलेला आहे. सदर कोर्सच्या मान्यतेसाठी प्रत्यक्ष अर्ज केलेला आहे का ? आणि केलेला असल्यास अर्जाची प्रत मिळावी तसेच जी कागदपत्रे या कोर्सच्या शासन मान्यतेसाठी पाठविलेली आहे त्याची सहीसूद नक्कल मिळावी त्यास होणारा आवश्यक तो खर्च देण्यास तयार आहे असे अपिलकर्ता यांनी पत्राद्वारे कळविले होते. परंतु अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही , म्हणून

अपिलकर्ता यांनी दि. २८/०७/२०१० रोंजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता व उत्तरवादी गैरहजर आहेत. परंतु अपिलकर्ता यांनी स्वतः सदर कोर्स जून ०८ ते सप्टें ०८ या कालावधीत केलेला असल्याने त्यांना माहिती मिळणे आवश्यक आहे.परंतु उत्तरवादी यांनी अर्जाच्या अनुषंगाने माहिती तर दिली नाहीच तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नाही व त्यामुळे जनामहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) अन्वये रु २५,०००/- च्या शास्तीस पात्र आहेत. अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र.

**---आदेश---**

**१) अपिलकर्ता यांची अपिल मंजूर कण्यात येत असून हा निर्णय दिल्यापासून दहा दिवसाचे आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ०९/०५/२०१० चे अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) जन माहिती आधिकारी म्हणून डॉ संजय व्होरा किंवा ग्रान्ट मेडीकल फाऊंडेशन, रूबी हॉल यांनी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द रुपये २५,०००/- ची शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा दहा दिवसाचे आत राज्य माहिती आयोगाकडे समक्ष करावा व तसे न केल्यास डॉ संजय व्होरा यांच्या विरुध्द रुपये २५०००/- ची शास्ती कायम करण्यात येईल व ते त्यांचे वरिष्ठांना वसूल करण्यासाठी क ळविण्यात येईल.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०९-०५-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांकःअपील क्र.१३८९ /०९/ पुणे**

**श्री. कांताराम तात्याबा काळे,**
**मु. पो. घोडेगाव,**
**ता. आंबेगाव , जि. पुणे. ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**गट विकास अधिकारी ,**
**पंचायत समिती आंबेगाव,**
**ता. आंबेगाव जि. ठाणे.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**ग्रामसेवक, ग्रामपंचायत काळेवाडी,**
**दरेकवाडी (घोडेगाव),**
**ता. आंबेगाव, जि ठाणे. ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक -०९/०९/२००९**
**सुनावणीचा दिनांक - १४/०२/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक २२/०६/२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत कोळेवाडी यांच्याकडे घरपट्टी व पाणीपट्टी खर्चाबाबत प्रत्येक खातेदारांच्या संदर्भात
सन ०१/०४/२००४ ते ३०/०३/२००९ अखेर असे पाच मुद्दयावर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती विहीत मुदतीत मिळाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.०३/०८/२००९ रोजी प्रथम अपिल दाखल केला. प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल करण्यात आले आहे.

अपिलकर्ता तसेच उत्तरवादी गैरहजर आहेत. अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती अतिशय व्यापक प्रमाणात आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक व्यापकहित नाही. मागितलेली माहिती ही सुमारे ५ वर्षाची आहे व ती माहिती मुदतीत उपलब्ध करुन देणे हे सर्वस्वी अशक्य आहे. तीस दिवसाच्या कालावधीत माहिती उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास माहितीचे

निश्चित वर्णन करणे आवश्यक आहे. एखाद्या योजने किंवा प्रकल्पाविषयीची तपशीलवार माहिती तीस दिवसात उपलब्ध होऊ शकते, असे असल्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १४-०२-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती**
**२) स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :मुमाआ२०११/४३३१८/तक्रार क्र. १२१९**

**श्री. नविन एस. परब,**
**१ ला मजला, मुळगावकर इमारत,**
**७, टोपीवाला लेन, लॅमिटंन रोड,**
**मुंबई ४०० ००७ .** **... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त,**
**दक्षिण प्रादेशिक विभाग कार्यालय इमारत,**
**के/ पश्चिम विभाग, बस डेपोसमोर,**
**सर जे.जे. मार्ग, नागपाडा,**
**मुंबई ४०० ००८.** **...गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - २०/०४/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

तक्रारदार यांनी दि. २०/०४/२०११ रोजी माहिती अधिकारी अधिनियम २००५ चे कलम १८(१) अन्वये त्यांनी अपिल क्रमांक ३८४०/०२ दि २०/०७/२००९ रोजीच्या अपिलाच्या निर्णयाच्या संदर्भात माहिती प्राप्त झाली नाही म्हणून तक्रार दाखल केली आहे.

या सदंर्भामध्ये तक्रारदार यांनी खुलासा करताना त्याना माहिती प्राप्त झाली नाही असे आयोगापुढे सांगितले. परंतु जन माहिती अधिकरी यांनी आयोगापुढे खुलासा करताना सांगितले की, अपिलाच्या निर्णयाच्या संदर्भातच दि.२०/०७/२००९ रोजी कार्यालयात खुलाश्यासह आपल्या दालनात प्रत्यक्ष बोलावण्यात आले होते. त्याप्रमाणे या कार्यालयातून जा.क्र.१४८६/सपोआ/दप्रवि/माअधि/०९, दि. १८/०७/२००९ रोजी खुलासा माननीय आयुक्त यांच्या समोर सादर करण्यात आला होता. त्याप्रमाणे क्रमांक मु.मा.आ./३६६३६/अपिल क्रमांक ३८४०/०२, दि.२०/०७/२००९ रोजी माहिती देण्यात आली आहे. तसेच खुलासा मान्य करण्यात येत असून शास्तीचे प्रकरण बंद करण्यात येत आहे, असे आदेश पारित करुन अपिल निकाली काढण्यात आले होते. परंतु अपिलर्थी यांनी पूर्वीचे आदेश जोडून पुन्हा तक्रार अर्ज सादर

केलेला आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या मूळच्या कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर तक्रारदार यांना माहिती वेळेत मिळालेली आहे असा निष्कर्ष काढून तक्रार ही निकाली काढण्यास पात्र.

**-- - आदेश- --**

**१. तक्रार निकाली काढण्यात येते.**
**२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २०-०४-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**१) निवडनस्ती**
**२) स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांकःमुमाआ/नोंदणी क्र./५०६७१/अपील क्र. ६६४१/ ०२**

**श्री.प्रमोद एल.कदम,**
**प्लॉट नं. १६/डी-३ वर्सोवा अंधेरी,**
**श्री साई को.हौ .सो.**
**सरदार वल्लभभाई पटेलनगर,**
**अंधेरी पश्चिम, मुंबई ४०० ०५३ ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त**
**बृहन्मुंबई मनपा मुख्यालय,**
**जल अभियंता यांचे कार्यालय,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. (जलकामे)**
**बृहन्मुंबई मनपा मुख्यालय,**
**जल अभियंता यांचे कार्यालय,**
**मुंबई ४०० ००१. ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक - ०५/ ०६/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - ०९/०५/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक ०२/०१/२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा जल अभियंता यांचेकडे १९९८ पासून D.N.A. मध्ये ०७/१२/२००९ रोजी प्रसिध्द झालेल्या वॉटर ऑडीट च्या बातमीच्या संदर्भामध्ये काय कार्यवाही केली गेली या बद्दलची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद करुन मागितलेले होते. सदर अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १२/०१/२०१० रोजी वॉटर ऑडीट ची प्रमाणित प्रत कार्यालयात उपलब्ध मुद्दा क्रमांक २ च्या संदंभार्मधील माहिती उपलब्ध आहे. त्यातील ३० पृष्ठांकरिता रुपये २/- प्रमाणे रुपये ६०/- चा भरणा करावा. तसेच मुद्दा क्र.३ हा लागू होत नाही. व पोस्टाचा खर्च रुपये २५/- भरावा असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १९/०१/२०१० रोंजी अपिलकर्ता यांनी पुन्हा माहितीच्या संदर्भात मध्ये कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान झाले नाही , म्हणून अपिलकर्ता यांनी दि. २३/०१/२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले.प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये दि. ०२/०२/२०१० अपिल अर्ज हा पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेला आहे असे त्यांना कळविलेले दिसून येते.अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपिल दाखल केलले आहे.

अपिलकर्ता गैरहजर आहेत. मात्र अपिलकर्ता यांनी दि. २२/१/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सागितले की, अपिलकर्ता यांनी दोन **(a)** आणि तीन

मुद्दयांची माहिती मात्र उपलब्ध करुन दिलेली नाही. कार्य अभि(जमा) महसूल यांनी सदर अर्ज दि. ०७/०१/२०१० रोजी सअजकीडी विभाग यांचेकडे पाठविला होता. परतु त्यांनी दि. १९/०१/२०१० रोजी उत्तर दिलेले आहे असे आयोगापुढे यांनी सांगितले .

जन माहिती अधिकारी यांनी ज्याप्रमाणे त्यांच्याशी पत्रव्यवहार केला त्या पत्रव्यवहाराचा उल्लेख त्यांनी त्यांच्या द्वितीय अपिलात केलेला नाही व स्वतंत्रपणे असे कोणतेही स्पष्टीकरण किंवा निवेदन त्यांना दिलेले नाही. व म्हणून जन माहिती अधिकारी यांनी खर्चाचा भरणा करावा असे कळविले असून सुध्दा त्यांनी खर्चाचा भरणा केला आहे किंवा नाही व माहिती प्राप्त झाली किंवा नाही, याबद्दल कोणताही खुंलासा त्यांनी आयोगापुढे केलेला नसल्यामुळे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

**१) अपिल निकाली काढण्यात येते.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०९-०५-२०११**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांकः मुमाआ/नोंदणी क्र./५०६९६/अपील क्र. ६६४६/ ०२**

**श्री.प्रमोद एल.कदम,**
**१६/डी-३ वर्सोवा अंधेरी,**
**श्री साई को.हौ .सो.**
**सरदार वल्लभभाई पटेलनगर,**
**म्हाडा,अंधेरी पश्चिम,**
**मुंबई ४०० ०५३.** **...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**मा. मुख्याधिकारी ,म्हाडा मुंबई मंडळ,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,**
**मुंबई गृहनिर्माण भवन,बांद्रा.(पू)**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मा. मुख्याधिकारी ,म्हाडा मुंबई मंडळ,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,**
**मुंबई गृहनिर्माण भवन,बांद्रा.(पू)**
**मुंबई ४०० ०५१.** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक - निरंक.**
**सुनावणीचा दिनांक - ११/०५/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक १९/८/१० रोजी जन माहिती अधिकरी तथा मुख्याधिकारी म्हाडा यांच्या कार्यालयात पुर्नविकासाठी कलम ३३ (५) च्या नियमाप्रमाणे किती म्हाडा इमारंतींना मंजूरी दिली, एन.ओ.सी. दिली, तसेच उपनिबधकांच्या संमती शिवाय मंजूरी दिली वगैरे ही माहिती दिनांक ०१/०१/२००० पासून ते अर्जाच्या तारखेपर्यंत मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि ०७/०७/२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले व प्रथम अपिलाचा निर्णय देण्यात आलेला नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्ता गैरहजर आहेत, जन माहिती अधिकारी तथा सहा. वास्तुशास्त्रज्ञ यांना अर्जदाराचा अर्ज हा मुख्य अधिकारी /मुंबई मंडळ यांचे नावे केला असल्यामुळे त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करता आलेली

नाही ,असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. परंतु अपिलकर्ता यांच्या माहितीचा अर्ज व प्रथम अपिलाच्या मेमोचे अवलोकन केले असता लिपिक मुंबई गृहनिर्माण क्षेत्रविकास यांचकडे सदरचे अर्ज प्राप्त झाल्याची स्वीकृती त्यांना मिळालेली आहे, याचा अर्थ असा होतो की लिपिक यांनी सदरचा अर्ज प्राप्त झाल्याची आवक नोद वही मध्ये नोंदणी तरी केली नाही किंवा संबधीत माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज सादर केलेला दिसून येत नाही.त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज प्राप्त झालेला नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. असे असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ७(१) अन्वये ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावयाची आहे या तरतूदीस कोणताही अर्थ उरत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज प्राप्त झालेला नसेल तर त्यांना दोषी धरता येणार नाही. परंतु सार्वजनिक प्रधिकरणाची ही जबाबदारी आहे , त्या प्रधिकरणातील सर्वच अधिकारी कर्मचारी यांनी स्वतःच्या जबाबदारीने कामकाज केले पाहीजे. परंतु ते तसे होत नसेल तर त्या त्या कर्मचारी अधिकाऱ्यांची अकार्यक्षमता आहे म्हणजेच पर्यायाने सार्वजनिक प्राधिकरणाची अकार्यक्षमाता आहे असे म्हणावयास हरकत नाही. माहितीचा अर्ज ज्या तारखेस सार्वजनिक प्रधिकरणास दिला जातो त्या तारखेपासूनच तीस दिवसाच्या कालावधीची परिगणना होते. व त्यामुळे सदरचा अर्ज ज्यांच्या अकार्यक्षमतेमुळे योग्य माहिती अधिकऱ्याकडे सादर झालेला नसेल त्या कर्मचाऱ्या विरुध्द जबाबदारी निश्चित करुन त्याच्या विरुध्द प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे. मात्र दि. ०७/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाने नोटीस मिळाल्यानंतर जन माहिती अधिकारी तथा वास्तूशास्त्रज्ञ श्रीमती जोशी. यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेले दिसून येते परंतु याबाबत सुध्दा अपिलकर्ता यांनी आयोगापुढे कोणतेही स्पष्टीकरण किंवा निवेदन केलेले दिसून येत नाही. त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. मात्र विलंबाच्या संदर्भात तसेच अर्ज किंवा अपिल हे योग्य रीतीने सादर केले जात नसल्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर कराण्यास पात्र आहे.

**--- आदेश---**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यात येत असून मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास यांचे मुख्याधिकारी यांच्या कार्यालयामध्ये आवक कक्षतून अर्जाची स्वीकृती दिलेली असली तरी तो अर्ज योग्य त्या संबधीत अधिकाऱ्याकडे का सादर का होत नाही याबद्दलची योग्य ती चौकशी करावी व संबधित अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या विरुध्द जबाबदारी निश्चित करुन त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करावी अन्यथा माहितीची अधिकारातील अर्ज हे संबधित माहिती अधिकारी यांचेकडे त्याच दिवशी सादर होऊ शकणार नाहीत, तीस दिवसाच्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही तर जन माहिती अधिकारी हे सर्वच अर्जामध्ये दोषी आढळून येतील.**

**२) सदरच्या निर्णयाची एक प्रत मा. मुख्याधिकारी म्हाडा मुंबई मंडळ, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,मुंबई गृहनिर्माण भवन,बांद्रा.(पू) यांच्याकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावा.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ११-०५-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

१. **मा. मुख्याधिकारी म्हाडा मुंबई मंडळ, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई गृहनिर्माण भवन,बांद्रा.(पू) मुंबई ४०० ०५१, यांचेकडे माहिती तथा उचित कार्यावाहीसाठी अग्रेषित.**
२. **निवडनस्ती (शास्ती).**
३. **निवडनस्ती.**
४. **स्वीय सहाय्यक.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांकःमुमाआ/नोंदणी क्र./५०६९७/अपील क्र. ६६४७/ ०२**

**श्री.प्रमोद एल.कदम,**
**१६/डी-३ वर्सोवा अंधेरी, श्री साई को.हौ .सो.**
**सरदार वल्लभभाई पटेलनगर,म्हाडा, अंधेरी (प),**
**मुंबई ४०० ०५३.** **...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मा. मुख्याधिकारी ,म्हाडा मुंबई मंडळ,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,**
**मुंबई गृहनिर्माण भवन,बांद्रा.(पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मा. मुख्याधिकारी ,म्हाडा मुंबई मंडळ,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,**
**मुंबई गृहनिर्माण भवन,बांद्रा.(पू) मुंबई ४०० ०५१.** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक- निरंक**
**(नोंदणी दि.२१/१२/२०१०).**
**सुनावणीचा दिनांक - ११/०५/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उशिरा उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी म्हणून मुख्याधिकरी म्हाडा मंडळ यांचेकडे दि. १९/८/२०१० रोजी महाराष्ट्र टाईम्स मध्ये 'पूर्नविकास योजना' या आर्टिकलबाबत माहिती मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. माहिती एकूण ८ मुद्दयांमध्ये मागितलेली दिसून येते.सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती मिळालेली नाही म्हणून प्रथम अपिल दिनांक ११/१०/२०१० रोजी दाखल करण्यात आले आहे. परंतु त्यांनतर ही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकरी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपिलकर्ता हे संबधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करीत नाही तर ते मुख्याधिकारी म्हाडा मंडळ मुंबई, यांचेकडे अर्ज करतात त्यामुळे सदरचा अर्ज हा संबधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे वर्गतरी होतो परंतु विलंबाने हस्तांतरित होतो. म्हाडा हे सार्वजनिक प्राधिकरण कारभाराच्या बाबतीत अतिशय विस्तारित असल्यामुळे अधिनियमाचे कलम ५ (१) अन्वये निरनिराळया विभागामध्ये व शाखांमध्ये जन माहिती अधिकाऱ्यांची नियुक्ती केली गेली आहे.अधिनियमाचा कलम ६ (१) प्रमाणे अर्जदाराने विषयाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज दाखल करणे आवश्यक आहे अशा प्रकारेच अर्जदाराने संबधीत जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज दाखल केल्यास अधिनियमाचे कलम ७ (१) प्रमाणे ३० दिवसामध्ये माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होईल. परंतु अर्जदाराने अर्ज हा कोण्त्याही माहिती

अधिकाऱ्याकडे करण्याऐवजी मुख्याधिकारी यांच्याकडे केल्यामुळे अर्जाचा प्रवास हा दिशाहीन होतो.व तसे अपिलकर्ता यांच्या अर्जाच्या व प्रथम अपिलाच्या संदर्भात झालेले असल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही किंवा प्रथम अपिल सुध्दा त्यांनी मुख्याधिकारी म्हाडा मंडळ मुंबई, यांचेकडे केलेला आहे.त्यामध्ये सुध्दा माहिती ज्या कार्यालयाशी संबधित आहे त्या कार्यालयाचे नाव किंवा विभागाचे वर्णन न करता मुख्याधिकारी म्हाडा मंडळ मुंबई, असेच केलेले आहे, कोणताही माहिती अधिकाऱ्यांचा उल्लेख न करता प्रथम अपिल केलेले आहे.परंतु राज्य माहिती आयोगाकडून नोटीस बरोबर माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर अपिलकर्ता यांना दि.०५/०७/२०११ रोजी माहिती प्रत्यक्ष उपलब्ध करुन दिली आहे.

३. जन माहिती अधिकरी यांनी अपिलकर्ता यांचा अर्ज करण्याची कार्यपध्दती निदर्शनास आणल्यानंतर त्यांच्या म्हणण्यामध्ये तथ्य असल्याचे दिसून येते. सार्वजनिक प्रधिकरणास ज्या
प्रमाणे अधिनियमाच्या तरतूदी लागू होतात तशाप्रकारे अर्जदाराने सुध्दा अधिनियमांच्या तरतूदी प्रमाणे अर्ज करणे आवश्यक आहे. अर्जदाराने केलेला अर्ज व प्रथम अपिल हे नियमाप्रमाणे नसेल तर निकाली काढण्यास पात्र होतात व त्याकरिता अधिका-यांना जबाबदार धरता येणार नाही. अपिलकर्ता यांनी अधिनियमाच्या तरतूदी प्रमाणे अर्ज व अपिल केले नसले तरी सुध्दा जन माहिती अधिकारी तथा वास्तूशास्त्रज्ञ यांना अपिलकर्ता यांच्या आयोगाच्या नोटीस सोबत माहिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर दिनांक ०७/०५/२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे हे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ११-०५-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती**
**२) स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांकःमुमाआ/नोंदणी क्र./५०६९८/अपील क्र. ६६४८/ ०२**

**श्री.प्रमोद एल.कदम,**
**१६/डी-३ वर्सोवा अंधेरी,**
**श्री साई को.हौ .सो.**
**सरदार वल्लभभाई पटेलनगर,**
**म्हाडा,अंधेरी पश्चिम,**
**मुंबई ४०० ०५३.** **...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**मा. मुख्याधिकारी ,म्हाडा मुंबई मंडळ,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,**
**मुंबई गृहनिर्माण भवन,बांद्रा.(पू)**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मा. मुख्याधिकारी ,म्हाडा मुंबई मंडळ,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,**
**मुंबई गृहनिर्माण भवन,बांद्रा.(पू)**
**मुंबई ४०० ०५१.** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक - निरंक.**
**सुनावणीचा दिनांक - ११/०५/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि. ११/०८/२०१० रोजी मा. मुख्याधिकारी ,मुंबई मंडळ, यांच्याकडे नामांतरणासाठी आकारण्यात येणाऱ्या सदनिका हस्तांतरण फी /नियम नूतनीकरण फी रद्द करण्याबाबत सन २००० ते आजपर्यंतची अशी एकूण दहा मुद्दयावर माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती ही व्यक्तीशः हवी असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहीत मुदतीत माहिती मिळालेली नाही म्हणून त्यांनी दि. ०७/१०/२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि. २९/१०/२०१० रोजी देण्यात आलेला असून माहिती अधिकारी यांनी आवश्यक माहिती तयार ठेवलेली होती परंतु अर्जात माहिती ही व्यक्तीशः घेणार असे नमूद केले असल्यामुळे माहिती त्याना उपलब्ध करुन देता आलेली नाही असे माहिती अधिकाऱ्याने सांगितल्यामुळे अपिलार्थी यांना माहिती त्याच दिवशी दि. २९/१०/२०१० रोजी देण्यात आली व माहिती मिळाल्याची पोच घेतली. तरी सुध्दा

अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे बिनचूक व पूर्ण अशी माहितीच्या तक्त्यामधील माहिती द्यावी असे कारण देऊन, कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

२. अपिलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी माहिती तयार ठेवली होती. परंतु अपिलकर्ता यांना माहिती ही व्यक्तीशः हवी होती. परंतु ते माहिती घेण्यास आले नाहीत म्हणून त्यांना माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.परंतु सुनावणीच्या दिवशी ते हजर झाले म्हणून त्यांना व्यक्तीशः माहिती देता आली व त्याची पोच सुध्दा घेतली आहे. अपिलकर्ता मुळातच अर्ज व अपिल हे संबधित जन माहिती अधिकरी यांचेकडे करीत नाहीत. त्यामुळेच अपिलकर्ता यांचा अर्ज व अपिल हा जन माहिती अधिकारी यांना मुदतीत प्राप्त होत नाही. म्हाडा प्रशासन हे अतिशय व्यापक प्रशासन आहे. व त्यामुळे अधिनियमाचे तरतूदीप्रमाणेच अर्ज किंवा प्रथम अपिल दाखल केले तर त्यांना विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होते. म्हाडा प्रशासन या सार्वजनिक प्रधिकरणामध्ये अनेक विभाग , अनेक विषय, अनेक शाखा-उपशाखा असल्यामुळे त्या त्या स्तरावरील जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती केलेली आहे.

३. अर्जदार हे अतिशय मोघम व दहा-दहा वर्षाची माहिती मागत असतात , वास्तविक अशी माहिती देण्यासाठी सार्वजनिक प्रधिकरण कार्यालयातील दैनंदिन कामकाज बाजूला ठेऊन यंत्रणा प्रमाणबाहेर वळवावी लागते. अधिनियमाचे कलम ७ (९) अन्वये मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन देण्यासाठी सार्वजनिक प्रधिकरणातील शासकीय यंत्रणा ही प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्यास मागितलेल्याप्रमाणे माहिती देणे शक्य होत नाही . त्यामुळे अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती ही मागितलेल्या स्वरुपामध्ये उपलब्ध करुन देणे हे शक्य होत नाही, असे त्यांनी आयोगापुढे प्रतिपादन केले.

४. जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमांच्या तरतूदी आयोगाच्या निदर्शनास आणल्या त्याप्रमाणे या तरतूदी अर्जदाराला सुध्दा लागू असतात. माहिती व्यक्तीशः मागितली तर तीस दिवसाचे आत व्यक्तीशःमाहिती घेण्यास हजर होणे आवश्यक असते. जर तीस दिवसात माहिती न दिल्यास संबधित जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती दिली नाही असा आक्षेप घेणारे पत्र देणे आवश्यक आहे. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करावयाचे व माहिती घ्यावयास जायचे नाही नंतर मात्र प्रथम अपिल दाखल करुन माहिती मिळाली नाही असे कारण द्यावयाचे असे अर्जदारास करता येणार नाही. माहिती तयार करुन द्यावयाची नाही हे अधिनियमाचे कलम २(च) व (त्र) मधील 'माहिती' व 'माहितीचा अधिकार' या दोन व्याख्येप्रमाणे दिसून येते. माहिती जशी आहे त्या कादपत्रांच्या छांयाकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे.तसेच अर्जदार हे एकाच विषयावर दोन कार्यालयामध्ये अर्ज करतात असे आयोगाच्या निदर्शनास

आणून दिलेले आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेला खुलासा तसेच दाखल केलेली कागदपत्रांप्रमाणे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

**१) अपिल निकाली काढण्यात येते.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ११-०५-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./१३६५/अपील क्र. ६६४२/ ०२**
**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./१३६६/अपील क्र. ६६५४/ ०२**
**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./१३६४/अपील क्र. ६६५५/ ०२**

**श्री. राष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्त मंच,**
**२१७०४,श्री.शाश्वत कॉम्प्लेक्स प्लेझंट पार्क,**
**मिरा रोड, जिल्हा. ठाणे -४०११०७.** **...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ,**
**कोलहपूर ४१६००४.**

**जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव**
**शिवाजी विद्यापीठ,**
**कोलहपूर ४१६००४** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक - २०/ ११/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - ११/०५/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपील क्रमांक ६६४२/०२ मध्ये अपिलकर्ता यांनी अर्जदार म्हणून दिनांक २०/०६/२०१० रोजी राष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता मंच उर्फ नॅशनल फोरम फॉर क्वालिटी एड्युकेशन संस्थेने जन माहिती अधिकारी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचेकडे महाराष्ट्र शासनाचे पत्र क्रमांक संकिर्ण २००९/(३२७/०९)/विशि-१ उच्च व तंत्र शिक्षण विभाग दिनांक १७/०५/२०१० तसेच सन २००६ ते आज पावेतोर यासंदर्भामध्ये एकूण तीन मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती शीघ्र टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे.

२. अपील क्रमांक ६६५४/०२ मध्ये दिनांक. २१/०६/१० रोजी अपिलकर्ता यांनी राष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता मंच उर्फ नॅशनल फोरम फॉर क्वालिटी एड्युकेशन अर्जदार म्हणून माहिती अर्ज जन माहिती अधिकारी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांना ११/०६/२००९ पासून अधिव्याख्यातापदी निवड झालेले P.H.D.धारक पण नेट-सेट नसलेल्या उमेदवारांचा निवड समिती अहवाल, २) दि. ११/०७/२००९ ते आतपावेतोर संदर्भामध्ये दोन मुद्दयामध्ये माहिती शीघ्र टपालाद्वारे घेणार असे मागितलेले दिसून येते.

३. अपील क्रमाक ६६५५/०२ मध्ये अपिलकर्ता यांनी अर्जदार म्हणून दिनांक २२/०६/२०१० रोजी राष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता मंच उर्फ नॅशनल फोरम फॉर क्वालिटी इड्युकेशन जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०६/०५/२००७ ते दि.११/०६/२००९ दरम्यान निवड झालेल्या M.Phil/P.H.D. पण नेट-सेट नसलेल्या अधिव्याख्यात्यांची माहिती , २) १२/०७/२००९ ते आजमर्यंत नियुक्त अधिव्याखेते (Non Net-Set) च्या संदर्भात दोन मुद्यांवर माहिती शीघ्र टपालाने मागितलेली दिसून येते.

४.	वरील तीनही अर्जाच्या अनुषंगाने दि. २६/०७/२००९ ,१५/०७/२००९ व २६/०७/२००९ रोजी माहितीची अधिकार अधिनियमांच्या तरतूदीनुसार अर्जदार हा भारतीय नागरिक असावा , कोणताही मंच किंवा फोरम अर्जदार असू शकत नाही या कारणास्तव त्यांचे तीनही अर्ज नाकारण्यात आलेले दिसून येतात. तीनही अर्जाच्या संदर्भामध्ये अपिलकर्ता यांनी दिनांक. २८/०८/२०१० रोजी दोन व दि. १९/०८/२०१० रोजी एक असे एकूण तीन प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. तीनही प्रथम अपिलाचा निर्णय दिनांक १८/१०/२०१० रोजी देण्यात आलेला असून अपिलकर्ता अपिलाच्या सुनावणीच्या दिवशी कुलसचिव शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचे कार्यालयात उपस्थित न राहिल्याने खालील माहिती पाठवित आहोत, माहितीचा अधिकार कायदा २००५ कलम (३) नुसार माहिती अधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर हे योग्य व बरोबर आहे असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे तीन द्वितीय अपील दाखल केलेली आहेत.

५.	अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे सांगितले की त्यांच्या माहितीचा अर्ज हा राष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता मंच उर्फ नॅशनल फोरम फॉर क्वालिटी एड्युकेशन या नावाने असला तरी अध्यक्ष व उपध्यक्ष म्हणून रमेश झाडे व भूपेश मोडे अशी स्वाक्षरी केलेली आहे. त्यामुळे रमेश झाडे व भूपेश मोडे हे नागरिक नाहीत असे म्हणता येणार नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ३ प्रमाणे 'या अधिनियमांच्या तरतूंदीना अधिन राहून सर्व नागरिकना माहितीचा अधिकार असेल 'अशी तरतूद आहे. व संस्था किंवा फोरम हे नागिाक नसल्याने त्यांना माहितीचा अधिकार प्राप्त होत नाही. म्हणून कोणताही फोरम किंवा संस्था यांचा समावेश होऊ शकणार नाही. संविधानामध्ये संविधानामध्ये नागरिकता यामध्ये दिलेल्या अनुच्छेद ३ प्रमाणेअसणारी व्यक्ती होय. सर्व नागरिक हे व्यक्ती असतात परंतु सर्व व्यक्ती हया नागरिक असतात असे नाही. व त्यामुळे कोणतीही संस्था किंवा फोरम यांचा समावेश नागरिक या संज्ञेच्या व्याख्यामध्ये येत नाही. व त्यांस माहितीचा अधिकार प्राप्त होणार नाही. तसेच जन माहिती अधिकारी हे संस्थेंच्या एका पदाधिका-याशी पत्रव्यवहार करतात त्या वेळेस संस्थेतील दुसरे पदाधिकारी किंवा मुदत संपल्यानंतर आलेले नवीन पदाधिकारी हे जन माहिती अधिकारी यांनी केलेला पत्रव्यवहार नाकारतात किंवा मिळाला नाही असे सांगतात. त्यामुळे अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी तीनही अर्जाच्या संदर्भात फोरम किंवा संस्था नागिरिक होऊ शकत नाही असे पत्राद्वारे कळविलेले होते व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले उत्तर योग्य आहे.

६.	जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद हा योग्य असल्यामुळे त्यांना माहिती दिली नाही, या कारणास्तव त्यांना जबाबदार धरता येणार नाही. मात्र अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या तीनही अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील. संस्था किंवा फोरम नागरिक नाही या कारणास्तव अपिलकर्ता यांची तीनही अपिले निकाली काढण्यास पात्र असले तरी अंशतः मंजूर करण्यात येत आहेत.

**---- आदेश----**

**१) अपिलकर्ता यांची तीनही अपिले अनुक्रमे अपील क्र. ६६४२/ ०२, अपील क्र. ६६५४/ ०२ अपील क्र. ६६५५/ ०२ अशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांच्या तीनही अर्जांच्या सदंर्भा मध्ये उपलब्ध असलेली माहिती (जन माहिती अधिकरी यांचे गुणवत्तेच्या बाबतीत मत वगळून) हा निर्णय मिळाल्यापासून तीस दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्यात यावी. माहितीचा व रजि. पोस्टाचा खर्च हा अपिलकर्ता यांनी करावयाचा आहे. व तसे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळवावा आणि खर्चाचा भरणा केल्यानंतर दहा दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ११-०५-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ ाािर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती**
**२) स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५९३/अपील क्र. ६६५१/ ०२**

**श्री. क्रांती किरण पत्तार,**
**c/o श्री. काशिनाथ शंकर भोगटे,**
**४३७, शिव पार्वती निवास,**
**भोंगटे वाडी ता. राजापूर,**
**जिल्हा. रत्नागिरी ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप-आयुक्त,**
**परिमंडळ क्र.२, पुणे शहर,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे**
**जिल्हा. पुणे.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहकार नगर पोलीस स्टेशन, पुणे. जिल्हा. पुणे ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक - ०५/ ०१/२०११.**
**सुनावणीचा दिनांक - ११/०५/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक.१७/०८/२०१० रोजी जन माहिती अधिकारी सहकार नगर पोलीस स्टेशन, पुणे यांच्याकडे राजापूर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ०/२००७ भा.द.वि. कलम ४९८ (अ),३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे स्टे.ज.न.१०/०७ ई.नं. २०/१५.१५ या तक्रारीवर केलेल्या कारवाईची उपलब्ध माहितीच्या संदभामध्ये एकूण ४ मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि. १४/१०/१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.०२/०४/११ रोजी देण्यात आलेला असून अपिलार्थी यांनी दाखल केलेला गुन्हा पोलीस अधिक्षक पुणे ग्रामिण हवेली यांच्या कार्यक्षेत्रातील पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नं. १३/२००७ भा.द.वि. कलम ४९८ (अ),३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे दाखल केला आहे. अपिलार्थी यांनी केलेला अपील अर्ज हा सदरचे गुन्हे संदर्भात असल्यामुळे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु तत्पूर्वीच अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी लेखी व तोंडी युक्तीवाद करताना आयोगापुढे सांगितले की, अपिलार्थी अर्जदार श्रीमती क्राती किरण पत्तार यांनी केलेले माहिती अधिकार अर्ज व अपील अर्ज हे पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामिण यांचे अधिकार क्षेत्रातील असल्याने सदरचा अपिलार्थी यांनी केलेला अपिल अर्ज पुढील कार्यवाहीसाठी पोलीस अधिक्षक ,पुणे ग्रामिण यांचेकडे दि. ०२/०४/११ रोजी पाठविण्यात आलेला असून सदर पत्राची प्रत अपिलकर्ता यांना पाठविण्यात आली आहे. त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल असे आयोगापुढे

सांगितले. याचा अर्थ अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**--- आदेश---**

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यानंतर दहा दिवसाचे आत पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामिण, पाषाण रोड ,
पुणे, यांनी अपिलकर्ता यांना सदर गुन्ह्यासंदर्भामध्ये मागितलेली माहिती विनामूल्य रजि. पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. सदरच्या निर्णयाची एक प्रत पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामिण, पाषाण रोड पुणे यांना पोस्टाने पाठविण्यात यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ११-०५-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१. पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामिण, पाषाण रोड,पुणे. , यांचेकडे माहिती तथा उचित कार्यावाहीसाठी अग्रेषित.**
२. **निवडस्ती.**
३. **स्वीय सहाय्यक.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांकःमुमाआ/नोंदणी क्र./९०६/अपील क्र. ६६५३/ ०२**

**श्री. एस.एम. दोषी द्वारा रश्मी यतिन दोषी**
**४०३, संगीता एनकलेव्हा . जे.एन रोड,**
**सर्वोदय नगर, मुलुंड (प), मुंबई ४०० ०८०.** **...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**विभागीय सहानिबंधक यांचे कार्यालय,**
**म्हाडा बिल्डींग,गडकरी चौक,**
**आयकर आयुक्त कार्यालयाच्या समोर,**
**नाशिक .४२२ ४०१**

**जन माहिती अधिकारी तथा**
**विभागीय सहानिबंधक यांचे कार्यालय,**
**म्हाडा बिल्डींग,गडकरी चौक,**
**आयकर आयुक्त कार्यालयाच्या समोर,**
**नाशिक ४२२ ४०१ .** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक - २७/ ५/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - ११/०५/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक २३/१२/२००९ रोजी जन माहिती अधिकारी उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक मुनी सुव्रत सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या संदर्भामध्ये एकूण ३८ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ०४/०२/२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक यांनी त्यांच्या कार्यालयात संस्थेच्या संदर्भात जी माहिती उपलब्ध आहे ती पुरविण्यात आलेली आहे. व मुद्दा क्र.३ ते ३८ ची माहिती संस्था स्तरावरील असल्याने अर्ज संस्थेचे प्रशासक यांचेकडे हस्तांतरित करण्यात आलेला आहे व मुद्दा क्र. ३ ते ३८ ची माहिती त्यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी. परंतु अपिलकर्ता यांना ३ ते ३८ ची माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक २७/०५/१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १८/०६/२०१० रोजी देण्यात आलेला दिसून येतो. परंतु अपिलकर्ता यांनी द्वितीय अपील सुध्दा दि. २७/०५/२०१० रोजीच दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे सांगितले की, मुनी सुव्रत गृहनिर्माण संस्थेच्या संदर्भामध्ये त्यांना प्रशासकांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. तसेच प्रशासकांनी संस्थेची बैठक बोलावली नाही. त्याचप्रमाणे विकासक जमिनमालक यांच्या विरुध्द कोणतीही कारवाई केलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची गृहनिर्माण संस्था ही खाजगी जमिनीवर असून खाजगी विकासकाकडे आहे. त्यामध्ये संस्थेच्या पदाधिकरी यांचेबाबत तक्रारी दिसून येतात. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी संस्थेची बांधकामे करुन सदनिका उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात मुख्यत्वेकरुन अपिलकर्ता यांची तक्रार आहे.

पूर्वीचे प्रशासक हे सेवानिवृत्त झाले आहेत. नवीन प्रशासक श्रीयुत पै. यांची नियुक्ती करण्यात आलेली असली तरी ते स्वतः हजर असल्यामुळे त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, संस्थंने कोणत्याही प्रकारची कागदपत्रे ठेवली नाहीत. तसेच संस्थेने त्यांना सुध्दा कोणतीही कागदपत्रे दिलेली नाही. संस्थेच्या सभासदांनी सदनिका खर्च भरलेला आहे. त्यांना सदनिकांचा ताबा हवा असल्यामुळे ते शासकीय अधिकाऱ्यांवर दबाव आणित आहेत. एकूण वस्तूस्थितीवरुन असे दिसून येते की, सभासद, जमिनमालक व विकासक यांचे मध्ये विकासकांनी केलेल्या कामांच्या संदर्भात वाद आहे. त्यामुळे माहिती ही उपलब्ध झालेली असली तरी अपिलकर्ता यांची मुळात संस्थेंच्या पदाधिकारी तसेच सहकार खात्याच्या अधिकाऱ्यांच्या संदर्भामध्ये कारवाई करावी,अशी अपेक्षा दिसून येते. अपिलकर्ता व उत्तरवादी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा सहकारी संस्था यांचे कार्यातील उपलब्ध असलेली माहिती प्राप्त झाल्यामुळे तसेच प्रशासकाकडून योग्य ती कारवाई करण्याची माहिती मिळाली असल्यामुळे सदरचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई.**
**दिनांक : ११/०५/२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती**
**२) स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./१६७/अपील क्र. ६६५०/ ०२**

**श्री प्रशांत शंकर कणगी,**
**बोर्ली-मांडला तालुका- मुरुड**
**जिल्हा- रायगड. ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**तहसिलदार (मुरूड) तहसिल कार्यालय,**
**मुरूड - जंजीरा जिल्हा. रायगड**

**जन माहिती अधिकारी तथा**
**तहसिलदार (मुरूड) तहसिल कार्यालय,**
**मुरूड - जंजीरा जिल्हा. रायगड. ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक - निरंक**
**सुनावणीचा दिनांक - ११/०५/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी -उशिरा उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उशिरा उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक १०/०६/२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार मुरूड यांचेकडे दिनांक १०/०६/१९७६ रोजी देण्यात आलेले प्रमाणपत्र O.B.C.Act १४६७ बोर्ली हेड मास्टर यांनी दिलेले स्कूल लिव्हींग मा. तहसिलदार श्री. भातखंडे यांनी प्रमाणित केलेले असून रामनाथ कणगी यांना निर्गमीत केलेले आहे किंवा नाही या संबधी माहिती मिळावी. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक २४/०८/२०१० रोजी तहसिलदार मुरूड - जंजिरा यांनी रामनाथ चाया कणगी दिनांक १०/०६/१९७६ रोजी देण्यात आलेला O.B.C.Act १४६७ प्रमाणपत्र मा. तहसिलदार यांनी प्रमाणित केले किंवा नाही याबाबत विचारणा केलेली होती. परंतु जातीच्या दाखल्या संबधी अभिलेख तपासले असता त्यांना कार्यालयातील रजिस्टर आढळून येत नाही, सदरचा अपिल अर्ज निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १२/०७/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेला दिसून येतो. प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता हजर आहेत, जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी उशिरा उपस्थित होऊन लेखी व तोंडी खुलासा करताना सांगितले की अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध नसल्यामुळे त्यांना देता येत नाही. अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती अभिलेख तपासता सदरचे रजिस्टर आढळ होत नाही असे कळविण्यात आले. परंतु समाधान झाले नाही म्हणून स्वत: तहसिलदार यांनी कार्यालयाचे संबधित अभिलेख लेखनिक यांना सूचना देऊन श्री. कणगी यांना त्यांचे समक्ष अभिलेख कक्षातील अभिलेख तपासण्यास सांगितले म्हणजेचे त्यांचे समोर अभिलेख तपासले त्यासंबधीचा अहवाल सादर केलेला आहे. जातीच्या प्रमाणपत्राच्या

संदर्भामध्ये अपिलकर्ता यांनी जात पडताळणी समितीकडे सुध्दा अर्ज केला होता. परंतु तो खारीज करण्यात आला होता. त्यांनी मा. उच्च न्यायालयात सुध्दा रीट पेटिशन दाखल केलेले होते, ते सुध्दा खारीज करण्यात आले होते.

उपरोक्त नमूद संदर्भातील पत्रांचे अवलोकन केले असता श्री. कणगी यांचे समाधान होत नाही आणि त्यांना आकलन होत नाही.आणि म्हणून प्रत्येक वेळी विविध कार्यालयाकडे साध्या नैमित्तिक अर्जाद्वारे विविध कारणे देऊन अनु. जमातीच्या दाखल्याची मागणी करीत आहे. तसेच श्री. कणगी यांना नक्की काय अपेक्षित आहे याचा बोध त्यांचे अर्जाचे अवलोकन करता होत नाही. त्यांनी वेळोवेळी साध्या नैमित्तिक अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती यापूर्वीच पुरविण्यात आली आहे. जणू काही सदर अर्ज हे माहितीच्या अधिकारातील आहेत, अशी त्यांची धारणा झाली आहे. अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे योग्य ते उत्तर दिलेले असल्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

**१) अपिल निकाली काढण्यात येते.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ११-०५-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती**
**२) स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५९४/अपील क्र. ६६५२/ ०२**

**श्री. शंकर गौरु धनावडे.**
**रा. खांब ता. रोहा.**
**जि. रायगड.** **...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**अप्पर पोलीस अधिक्षक रायगड-अलिबाग**
**पोलीस अधिक्षक कार्यालय रायगड,**
**अलिबाग, जिल्हा रायगड.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपविभागीय पोलीस अधिकारी रोहा.**
**विभाग रोहा जि. रायगड .** **...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक - ०५/ ०१/२०११.**
**सुनावणीचा दिनांक - ११/०५/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी रोहा यांचेकडे कै. विश्वास शंकर धनावडे यांच्या संशयास्पद मृत्यूबाबत केलेली चौकशी दि.०१/०२/१०
ते ३१/०८/१० सोबत जोडलेले प्रपत्र १ ते ५ व मूळ अर्ज तसेच वर्तमानपत्रातील तीन बातम्यांच्या छांयाकित प्रती व प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिकारी अधिक्षक रायगड यांचे पत्र क्रमांक १००/क.मा.अ/५३८/२०१०/ दि. ३०/०८/२०१० ची छायांकित प्रत स्वतः घेऊन जाणार असे कळविण्यात आलेले दिसून येते.अर्जाच्या अनुषंगाने विहीत मुदतीतील माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक ११/१०/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केला. आपण मागितलेली माहिती ही जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी रोहा यांनी आपणास पुरविली असल्याचे दिसून येते. तरीही आपले समाधान झालेले नसल्यास पुन्हा अर्ज करावा. सदरबाबत आम्ही स्वतः लक्ष घालून अर्जाची चौकशी करण्यासाठी आदेश निर्गमीत करुन अहवाल मागवून घेणार आहोत असे कळवून प्रथम अपिल निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते तरी सुध्दा अपिलकर्ता यांचे समाधान झालेले नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपिल दाखल केले.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना माहिती मिळाली परंतु तीन व्यक्तींचे जबाब घेल्याची माहिती मिळाली नाही. तसेच दूरभ्रमणध्वनी वरुन केलेल्या कॉल्सची माहिती मिळाली परंतु लोकेशनची माहिती मिळाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की त्यांना अपेक्षित असलेले

तीन सदस्यांचे जबाब घेतले असतील तर ते उपलब्ध करुन देण्यात येतील व लोकेशन संदर्भामध्ये ज्या परिसरातून फोन कॉल झाले आहेत त्या परिसरातील टॉवर्सच्या संदर्भात माहिती घेऊन लोकेशन उपलब्ध करुन देता येतील. परंतु ती माहिती तयार करुन द्यावी लागेल. मोबाईल कंपनीकडून कॉल्सचे तपशील येते परंतु लोकेशन येत नाही व ही सर्व माहिती अपिलकर्ता यांना वारंवार समजावून सांगितलेली आहे.

वास्ताविक अपिलकर्ता यांचा मुलगा व मित्र हे ताडी पिण्यासाठी गेले होते. त्यांनतर घरी आल्यावर जिन्यावरुन पडून त्यांचा मृत्यू झाला. त्यांचे पोस्टमार्टम सुध्दा करण्यात आलेले नाही. तरी ही अपिलकर्ता यांना खूनाचा संशय येत आहे. त्यामुळेच त्यांनी पोलीस तपासणीची माहिती मागितलेली आहे. पोलीस तपासणीत असलेली सर्व माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. उर्वरित माहिती ही पोलिसांकडे नसल्यामूळे ती देता येत नाही असे असले तरी जन माहिती अधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे लाकेशनची माहिती तसेच तीन व्यक्तींचे घेतलेले जबाब उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील हे अशंत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**--- आदेश---**

**१) अपिलकर्ता यांचे अपील हे अशंत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसाचे आत अपिलकर्ता यांना अपेक्षित असलेले तीन व्यक्तींचे जबाब घेतले असल्यास त्याची प्रत तसेच लोकेशन आढळून आल्यास तशी माहिती उपलब्ध करुन द्यावी**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १८-०५-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती**
**२) स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०७०४/अपील क्र.६७०१/०२**
**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०७०५/अपील क्र.६७०२/०२**

**श्रीमती. सुमन शिवाजी सानप,**
**३०२, वृषाली को.ऑ.हौ.सोसा,**
**देवनार म्यु. कॉलनी, मुंबई ४०००४३. ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी**
**सहायक पालिका आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगर पालिका,**
**एम /पश्चिम विभाग यांचे कार्यालय**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,**
**एम विभाग कार्यालय इमारत,**
**शरदभाऊ आचार्य मार्ग,**
**चेंबूर मुंबई ४०० ०७१ ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक २७/१०/२०१० व ३०/११/२०१०.**
**सुनावणीचा दिनांक - १८/०५/२०११**
**अपिलकर्ता प्रतिनिधी - प्रतिनिधी उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - प्रतिनिधी उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलक्रमांक ६७०१/०२ मध्ये दि. ०४/०५/२०१० रोजी अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी (शाळा) यांचेकडे अपिलकर्ता यांच्या सेवाविषयक पदोन्नती आणि निलंबनाशी , संस्थेच्या सभासदांच्या इतिवृत्ताशी संबधित माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक २१/०७/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यात अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २६/०७/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०१/०९/२०१० रोजी देण्यात आलेला असून अपिलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात आलेले असून संबधित शाळेच्या विभाग निरीक्षकांनी व्यवस्थापनाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांचे दप्तर निरिक्षण करावे व उपलब्ध असलेली माहिती अर्जदारास द्यावी. या दप्तर निरिक्षणाच्या वेळी अर्जदारास उपस्थित ठेवल्यास अधिक योग्य असेल. सध्या ही माहिती महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या नियत्रंणाखाली असल्यामुळे जे जे दस्तऐवज ठेवणे आवश्यक आहे ते ठेवलेले नसल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची किंवा त्यास्वरुपीची कार्यवाही करणे यथोचित ठरेल. या आदेशाची प्रत उपशिक्षणाधिकारी (परि ५) एम्/पश्चिम विभाग ३ मजला यांन देऊन त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या नस्तीचा पत्रव्यवहार अर्जदारास दाखवून आवश्यक त्या

कागदपत्रांच्या प्रती देण्याची व्यवस्था करण्यात यावी. असा आदेश देऊन अपील हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यानंतर सुध्दा ती माहिती उपलब्ध झाली त्या संदर्भात समाधान न

झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.व त्या मध्ये माहिती ही अपूर्ण दिलेले असल्याचे कारण दिलेले आहे.

२. अपिलकर्ता यांच्या वतीने प्रतिनीधी म्हणून त्यांचे पतीने अधिकारपत्र सादर करुन युक्तीवाद करताना असे सागितले की, पदोन्नतीच्या संदर्भात सुनावणी घेतली जाते. व त्या वेळेस उपस्थितांच्या सहया घेतल्या जातात. व त्यांनी त्या सहया घेतलेल्या कच्च्या इतिवृत्ताची माहिती मागितलेली होती. अपिलकर्ता यांच्या अर्जातील मुद्दे व प्रथम अपीलातील मुद्दे हे सुसंगत आहेत व तयार मिळालेल्या माहितीवरुन प्रथम अपिलामध्ये त्यांनी विश्लेषणत्मक मुद्दे उपस्थित केलेले आहेत. माहितीचा अर्ज कलम ६ (१) प्रमाणे माहिती मिळाली किंवा नाही यावर प्रथम अपिल किंवा द्वितीय अपिलाचा निर्णय अपेक्षित असतो. प्रथम अपील किंवा द्वितीय अपील मेमोमध्ये मिळालेल्या माहितीवरुन मुद्दे उपस्थित करुन निर्णय अपेक्षित नसतो. व त्यामुळे अपिलकर्ता यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती काय मिळाली हे विचारले असता त्यांनी फक्त बैठकीचे वेळेस उपस्थित असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची सही घेऊन तयार केलेले इतिवृत्तीची प्रत उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. त्यावर जन माहती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगापुढे सांगितले की जन माहिती अधिकारी आजारी असल्यामुळे ते उपस्थित होऊ शकले नाहीत. परंतु त्यासंदर्भात प्राधिकृत करणारे असे कोणतेही पत्र दिलेले नाही. तसेच उपस्थित असलेल्या प्रतिनिधींनी कोणतीही कागदपत्रे सुध्दा दाखल केलेली नाहीत. मात्र तोडी युक्तीवादामध्ये मागितलेली माहिती ही संस्था स्तरावरील माहिती असल्यामुळे व संस्था ती माहिती उपलब्ध करुन देत नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द कारवाई केलेली असताना सुध्दा संस्था ही माहिती उपलब्ध करुन देत नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी संस्थेच्या विरुध्द कारवाई करणे आवश्यक होते. ज्या संस्थेवर अधिकाऱ्याचे नियंत्रण असते त्यांनीच अशा प्रकारे एकमेकांना संरक्षण देण्याचे अपेक्षित नाही. तसेच ज्या इतिवृत्तावर उपस्थितांच्या सहया घेतलेल्या आहेत ते इतिवृत्त जरी कच्चे असले व त्यावरुनच अंतिम आदेश उपायुक्त काढत असतील तर त्या इतिवृत्ताची प्रत ही सार्वजनिक अभिलेखाचाच भाग होतो व ते सार्वजनिक क्षेत्रामध्ये येतात. त्यामुळे सदरची माहिती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक राहीलत्याकरिता अपिल अंशतः मुंजूर करण्यास पात्र आहे.

३. अपील क्रमांक ६७०२/०२ मध्ये दिनांक २६/०७/२०१० च्या अर्जाच्या संदर्भात प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल केलेला आहे. त्या अपीलाच्या संदर्भामध्ये वरील निर्णय लागू होत असल्यामुळे पुन्हा निर्णय देण्याची आवश्यकता नाही. मात्र त्या मधील प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये जो निर्णय दिलेला आहे त्या प्रमाणे अपिलकर्ता यांना माहीती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. जन माहिती अधिकारी स्वतः उपस्थित तर राहीले नाहीत तर प्रतिनिधीस सुध्दा प्राधिकृत केले नाही. तसेच कोणतीही कागदपत्रे सुध्दा दाखल केलेली नाहीत. व त्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक झाले आहे.

**--- आदेश---**

**१) अपिलकर्ता यांची दोनही अपीले, अपील क्र.६७०१ आणि अपील क्र.६७०२ ही मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसाचे आत अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती विशेषतः सहया केलेले (कच्चे) इतिवृत्ताची प्रत व प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे दिलेल्या आदेशांची कागदपत्रे विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.**

**२) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली व आयोगापुढे सुध्दा अनुपस्थित राहून त्या संदर्भात कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केलेली नाही तसेच संस्था स्तरावरील माहिती सुध्दा उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांच्या**

विरुध्द रुपये २५०००/-ची शास्ती का लादण्यात येऊ नये या बद्दलचा खुलासा समक्ष करावा व तसे न केल्यास त्यांच्या विरुध्द शास्ती कायम करुन ती त्यांच्या दरमहा वेतनामधून वसूल करण्याचे आदेश देण्यात येतील.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १८-०५-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

१) निवडनस्ती
२) स्वीय सहाय्यक

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०७०९/अपील क्र.६७०३/०२**

**श्री. कौस्तुभ दत्तात्रय गोखले,**
**सिध्दिविनायक प्रसाद,**
**डॉ. शोभा मुखर्जी रोड,**
**डोंबिवली (पूर्व),जिल्हा ठाणे ४२१ २०१. ...अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक सचिव,**
**कार्यासन नवि - १४ , व नवि २५,**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा,**
**अवर सचिव/ कक्ष अधिकारी,**
**कार्यासन नवि - १४ , व नवि २५,**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०००३. ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक २५/११/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १८/०५/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक २३/०८/२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी न.वि. १४ नगर विकास विभाग यांचे कडे महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन आदेश क्रमांक एमसीआ १२१०/प्र क्र. ८० नवि १४, मंत्रालय मुंबई दिनांक १३/०८/२०१० रोजीच्या आदेशाप्रमाणे श्री.आर. के.सोनावणे आयुक्त महानगरपालिका कल्याण डोबिवली यांच्या नियुक्ती संदर्भात एकूण सात मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नुसार २००० ते अर्जाच्या तारखेपर्यंत शीघ्र टपालाने घेणार असे नमूद करुन मागितलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ०७/०९/२०१० रोजी अपिलकर्ता यांनी मुद्देनिहाय माहितीवजा उत्तर दिलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांना मुद्दा क्रमांक ४ व ५ प्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही तसेच इतरही मुद्यांच्या संदर्भामध्ये दिलेल्या उत्तराने समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दिनांक २८/०९/१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता गैरहजर आहेत परंतु त्यांनी त्यांच्या अपील मेमो मध्ये व सोबत मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये मुद्देनिहाय युक्तीवाद दिलेला आहे. अपिलकर्ता यांनी द्वितीय अपिल मेमोमध्ये केलेल्या युक्तीवदाचे

अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध त्या माहितीवरुनच ते प्रथम अपील मेमो मध्ये किंवा द्वितीय अपील मध्ये विश्लेषणात्मक युक्तीवाद करतात. व त्यावरुनच माहिती त्यांना काय उपलब्ध करुन देणे अशा प्रकारे त्यांची मागणी दिसून येते. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे, त्यात श्री. आर.के सोनावणे यांच्या सेवाविषयक माहिती आहे. श्री. आर के. सोनावणे हे नगर पालिकेचे मुख्यअधिकारी तसेच महानगर पालिकेचे आयुक्त किंवा उपायुक्त अशा प्रकारे त्यांची ज्या ज्या महानगरपालिके मध्ये नियुक्ती झालेली आहे त्या त्या वेळेसच्या संदर्भातील माहिती मागितलेली दिसून येते. नगरविकास विभागामध्ये किंवा कोणत्याही विभागामध्ये आस्थपने करिता तसेच विषयाकरिता वेगवेगळी कार्यासने असतात व त्यामुळे श्री. आर. के सोनावणे यांची बदली किंवा नियुक्ती ज्या वेळेस वेगवेगळया सार्वजनिक प्रधिकरणामध्ये झाली त्या त्या वेळेसच्या त्यांच्या सेवाविषयीची किंवा नियुक्ती विषयीची माहिती त्या त्या कार्यासनाकडे उपलब्ध असते. नगरविकास विभाग हे जरी एकच सार्वजनिक प्राधिकरण असले तरी सर्वच संबधित कार्यासनाकडून माहिती उपलब्ध करुन देणे किंवा पुरविणे हे सर्वस्वी अशक्य आहे. तसेच त्या त्या कार्यासनांना अर्ज हस्तांतरित केलेले आहेत. व त्यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी तसेच अपिलकर्ता यांनी त्या कार्यासनाशी संपर्क साधावा असे कळविण्यात आलेले आहे. परंतु अपिलकर्ता हे संपर्क साधावा याचा अर्थ शब्दशः घेतात. व तसाच ते युक्तीवाद करताना अधिनियमात तशी तरतूद नाही असे ते सांगतात. संपर्क साधावा यांचा अर्थ पुढील पत्रव्यवहार जरी करावयाच असला तरी तो त्या कार्यासनालयाशी किंवा त्या कार्यासनालयाच्या संबधित असलेल्या प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या कडे सादर करावा असाही त्याचा अर्थ होतो. तसेच त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली तरी ते कपोलकल्पित अशी माहिती तयार करुन द्यायला पाहिजे अशी मागणी करतात. मुद्दा क्रमोक ४ च्या संदर्भामध्ये दहा पृष्ठ संख्या असलेलया प्रति २/- रुपये प्रमाणे रुपये २०/- इतके शुल्क भरावे असे कळविलेलक असले तरी सोबत खर्चाचा भरणा करण्यापूर्वीच त्यांनी दहा पृष्ठांची माहिती पुरविली आहे. असे असून सुध्दा अपिलकर्ता हे प्रथम अपील किंवा द्वितीय अपीलामध्ये खर्चाचा भरणा करुन सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही असे आरोप करतात. त्यानां मुद्दा क्रमांक ४ मधील नमूद दहा पृष्ठांची माहिती ही मिळालेली आहे हे त्यांच्या प्रथम अपील मेमो मधील मुद्दा क्रमाक ७ मध्ये स्पष्ट होते. त्यामुळे त्यांनी खर्चाचा भरणा केला तरी माहिती उपलब्ध करुन दिली नाही हे त्यांचे म्हणणे योग्य नाही. नवि २५ चे माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र. ५ च्या संदर्भामध्ये जी माहिती मागितलेली आहे ती कदाचित पूर्वी उल्हासनगर प्राधिकरणाच्या संदर्भात असावी व २००२ किंवा २००० मध्ये नवि २५ कडे तो विषय नव्हता. वरील माहिती त्या कार्यासनाशी संबधित असली तरी त्या वेळेसची माहिती नवि २५ शी संबधित नाही असे दिनांक १२/१०/२०१० रोजी अपिलकर्ता यांना कळविण्यात आलेली आहे. जी माहिती कागदपत्रपांच्या स्वरुपामध्ये नस्तीमध्ये उपलब्ध आहे त्या कगदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असल्यामुळे कपोलकल्पित अशी माहिती उपलब्ध करुन देणे जे अपिलकर्ता यांचे म्हणणे आहे, ते अधिनियमांच्या तरतूदींना धरुन नाही.

अपिलकर्ता यांनी केलेला लेखी व जन माहिती अधिकारी यांनी केलेला तोडी युक्तीवाद व दाखल केलेली कागदपत्रे यावरुन असे दिसून येते की, अपिलकर्ता यांना सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेली माहिती त्या कार्यासनाने उपलब्ध करुन दिलेली आहे. एखाद्याची नियुक्ती शिफारशी शिवाय करणे शक्य नाही असे जे विधान अपिलकर्ता यांनी केले आहे त्या करिता ते कपोलकल्पित माहिती मागतात असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे असे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २(ञ) प्रमाणे माहितीच्या अधिकाराच्या संज्ञेची व्याख्या केलेली आहे परंतु त्या व्याख्येमध्ये सार्वजनिक प्रधिकरणाचें नियंत्रण असेल किंवा या अधिनियमाअन्वये मिळावीता येण्याजोगी माहिती ( 'माहिती' या संज्ञेमध्ये समावेश असेलेली जी सार्वजनिक प्रधिकरणामध्ये साहित्याच्या स्वरुपामध्ये कागदपत्रे अभिलेख , दस्तऐवज ,परिपत्रके ,शासन निर्णय संविधान इ. स्वरुपात उपलब्ध असलेल्या माहितीचा समावेश होतो) त्यामध्ये एखादे काम कागदपत्रे, दस्तऐवज यांची तपासणी करणे व तपासणी अंती दस्तऐवज, कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे तसेच इलेक्ट्रानिक स्वरुपात असलेली माहिती उपलब्ध करुन घेणे असा त्याचा अर्थ होतो. त्या मध्ये जर तर प्रमाणे जन माहिती अधिकारी

यांचे मत अपेक्षित नाही व कपोलकल्पित तर अपेक्षितच नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

**१) अपिल निकाली काढण्यात येते.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०६८२/अपील क्र.६६९९/०२**

**श्रीमती.दक्षा एम शहा ( ॲडव्हो. हायकोर्ट)**
**००७ ब्ल्यू. मून चेंबर्स,**
**नगीनदास मास्टर रोड,**
**वेलकम हॉटेलसमोर,फोर्ट मुंबई ४०० ०३२. .अपिलकर्ता**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**वित्त नियंत्रक, (सु.लि.धवन),**
**झोपडपट्टी पुनवर्सन प्रधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे पूर्व मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा,**
**लेखा अधिकरी (सु.धो.घाटे),**
**झोपडपट्टी पुनवर्सन प्रधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे पूर्व मुंबई ४०० ०५१. ...उत्तरवादी**

**----निर्णय---**

**द्वितीय अपीलाचा दिनांक २२/११/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १८/०५/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक १९/०४/२०१० रोजी जन माहिती अधिकरी तथा वित्त अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्रधिकरण यांच्याकडे S.R.A. Scheme implementation and executed by M/s. Anil kaslay & Co. for Bhawani SRA Co-op. Housing Ltd. at F.P ५६९ (Pt) of TPS, VI of Mahim Division situated at Dadar (west), Mumbai च्या संदर्भामध्ये डेव्हलपमेंट मेसर्स अनिल कासले यांची एकूण १२ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने यांनी दिनांक ०६/०५/२०१० रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये उत्तर दिलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १६/०७/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २८/०७/२०१० रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध झाली म्हणून अपील निकाली काढण्यात आलेले आहे. व त्यानंतर पुन्हा त्यांना दिनांक ११/०८/२०१० रोजी विकासक मेसर्स अनिल कासले ॲन्ड कं. यांनी त्यांच्या सदरील कागदपत्रे सादर केली होती किंवा नाही हे अपिलकारास कळविण्यात यावे असे जन माहिती अधिकारी यास आदेश दिलेले होते, त्याप्रमाणे दिनांक ११/०८/२०१० रोजी अपिलकर्ता यांना कळविण्यात आले होते. अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता गैरहजर आहेत. अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे तीच माहिती तोच अर्ज फक्त नाव बदलून श्री. प्रदीप ठाकूर व सुमन ठाकूर यांनी मागिलेल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी निदर्शनास

आणून दिले की, एकच माहिती दोन व्यक्ती मागतात याचा अर्थ असा की सार्वजनिक प्राधिकरणास वेठीस धरण्याकरिता अशी माहिती मागितली जाते असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. तसे असले तरी संबधित माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे आदेश दिलले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील हे अंशतः मजूर करण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

ख

**१) अपिलकर्ता यांचे अपील हे अशंतः मजूंर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसाचे आत अपिलकर्ता यांनी विनामूल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन द्यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक १८/०५/२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती**
**२) स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :मुमाआ२०११/४१६३३/तक्रार क्र. ०४/०१**

**श्री. अशोक दिवाण,**
**३/३१५,पार्क व्ह्यू,यारी रोड,**
**अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०६१.** **... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता**
**(इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका ,**
**के/पूर्व विभाग कार्यालय, आझाद रोड, गुंदवली,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९.** **... गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - ०२/०५/२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

तक्रारदार यांनी दिनांक ०३/०६/२००९ रोजी अपिल क्रमांक ४०४९/०२ मध्ये दिनांक १८/०३/२००९ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे माहिती प्ररप्त झाली नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ (१) प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार हे जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता यांचे कडे माहिती घेण्यासाठी अनेकदा गेले परंतु कोणत्याही प्रकारची कारवाई त्यांनी केलेली नाही.गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, तक्रारदार यांनी त्यांच्या तक्राररीत नमूद केल्याप्रमाणे प्रॉपर्टी ॲट सि.टी.एस.नं. ४२८ व्हीलेज कोंडीवाडा, ता. अंधेरी च्या संदर्भामध्ये महानगरपालिकेच्या अधिकारी कर्मचारी यांनी तपासणी करुन सदरची मालमत्त ही अतिशय जुनी असून त्या संदर्भातील कोणतेही कागदपत्रे कार्यालयात उपलब्ध नाहीत व त्यामुळे त्यांना कागदपत्रे उपलब्ध करुन देता येत नाहीत असे त्यांनी आयांगापुढे सांगितले , तक्रारदार यांनी विनंती केल्याप्रमाणे कोणतीही कार्यवाही करता येत नाही व त्यामुळे सदरची तक्रार ही निकाली काढण्यास पात्र.

**---आदेश---**

**१) सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :मुमाआ२०११/४१६३३/तक्रार क्र. ०३/०१**

**श्री. अशोक दिवाण,**
**३/३१५,पार्क व्ह्यू,यारी रोड,**
**अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०६१. ... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता**
**(इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका ,**
**के/पूर्व विभाग कार्यालय, आझाद रोड, गुंदवली,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९. ... गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - ०२/०५/२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

तक्रारदार यांनी दिनांक ०३/०६/२००९ रोजी अपिल क्रमांक ४०४८/०२ मध्ये दिनांक १८/०३/२००९ रोजी दिलेल्या निर्णयाच्या संदर्भामध्ये माहिती प्राप्त झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची माहिती सहायक लॉ ऑफिसर यांचे कार्यालयात आहे. परंतु राज्य माहिती आयोगाचे आदेशातच सहायक लॉ ऑफिसर यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नसेल तर सहायक अभियंता यांनी स्वतः त्या कार्यालयात जाऊन संबधित नस्ती प्राप्त करुन घ्यावी व त्यातील कोर्टाच्या आदेशावर कार्यवाही करा ावी असा आदेश देएयात आलाञ व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी स्वतः माहिती उपलब्ध करुन घेऊन तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी अन्यथा जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती लादण्यात येईल याची नांद घ्यावी तसेही विधी खात्याकडून माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक दिसून येत नाही, त्याकरिता तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र.

**---आदेश---**

**१) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून हा आदेश मिळाल्यापासून १० दिवसाचे आत गैरतक्रारदार तथा जन माहिती अधिकारी यांनी विधी खात्याकडून तक्रारदार यांच्यावर वरीलप्रमाणे माहिती उपलब्ध करुन घेऊन पुढील कारवाई करुन माहीती उपलब्ध करुन द्यावी व तसे न केल्यास त्याच्यावर शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :मुमाआ२०११/तक्रार क्र. १२६७/०१**

**श्री. मनोहर सखाराम देसाई,**
**वरद लक्ष्मी, ४ था मजला,**
**खोली क्र. ४०६, गोखले मार्ग,**
**मुलूंड (पू), मुंबई ४०० ००८१.** **... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता**
**(इ.प्र.), बृहन्मुंबई महानगरपालिका , पूर्व उपनगरे यांचे कार्यालय,**
**पेपरमिल कंपाऊंड राज लिगसी जवळ,एल.बी. एस. मार्ग**
**विक्राळी (पू) मुंबई ४०० ०८३.** **... गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - ०९/०३/२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

तक्रारदार यांची तक्रार क्रमांक १२६७ ची सुनावणी व निर्णय ०९/०३/२०११ रोजी भास्कर पाटील प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे पुढे झालेली दिसून येते. परंतु त्या नंतर पुन्हा सदरची तक्रार गुन्हा सुनावणीस लावलेली दिसून येते. प्रथम अपिलीय अधिकरी तथा द.रा.दिक्षित, उप. प्रमुख अभियंता यांनी आयोगापुढे खुलासा करताना सदर विषयाबद्दल राज्य माहिती आयुक्त यांनी असे आदेश दिले होते की, वास्तुविशारद व विकासक हयांच्याकडून प्राप्त झालेल्या मूळ कार्यालयीन वेळेत श्री कुंभारे, दुय्यम अभियंता (इ.प्र.) यांचेकडे अर्जदार जाऊन त्यांचे निरिक्षण घेऊ शकतात.व अर्जदाराला त्यातून ज्या माहितीची आवश्यकता आहे त्याची झेरॉक्स घेऊ शकतात.परंतु अर्जदार श्री. मनोहर सखाराम देसाई सदर फाईल निरिक्षणकरण्यासाठील दिनांक ०९/०३/२०११ व १०/०३/२०१० रोजी हया कार्यालयात आलेले नाहीत. सदर मूळ फाईल ही १९९२ पासून विधी विभागाकडे आहे व ती परत या कार्यालयाकडे पाठविण्याबद्दल दिनांक १९/०३/२०११ कळविण्यात आलेले होते.श्री. नितीन कुंभारे दुय्यम अभियंता स्वतः जातीने विधीखात्याकडे जाऊन फाईल शोधण्यासाठी सतत पाठपुरावा करीत असताना विधी विभागाच्या आवक-जावक नोंदवही मध्ये असे आढळून आले की, दिनांक १७/०६/२००० ला सदर नस्ती हया कार्यालयात पाठविण्यात आलेली होती.सदर कार्यालयात संपूर्ण अभिलेखांच्या नस्तीचे स्कॅनिंग काम सुरु असून त्यामध्ये मिसळलेल्या काही जुन्या नस्ती सापडल्या, त्यामुळे सदरची नस्ती दिनांक ०६/०४/२०११ रांजी या कार्यालयात प्राप्त झाली.सदर नस्तीचा शोध लागल्यानंतर तक्रारदार यांना कळविण्यात आले.त्यामुळे तक्रारदार यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे संपर्क सांधून नस्तीचे निरीक्षण करुन त्यांना आवश्यक असतील त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्यात.

**---आदेश---**

**१) तक्रारदार प गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :मुमाआ२०११/४१६३३/तक्रार क्र. १३०२/०१**

**श्री. संजय गोविंदस्वामी दारा,**
**२०६ श्रीकृष्ण अपार्टमेंट,शास्त्रीनगर,**
**कोपर क्रॉस रोड, संतोषी माता मंदिरासमोर,**
**वरूणधाम बिल्डींग जवळ, डोबिवली (प.)**
**जिल्हा. ठाणे ४२१ २०२.** **... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकरी,**
**अनुसूचित जाती जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,**
**दुसरा मजला, आदिवासी विकास भवन,**
**गडकरी चौक, नाशिक- ४२२ ००२** **... गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - २५/०५/२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

सदर प्रकरणात अर्जदार व अपिलार्थी हजर आहेत उत्तरवादी गैरहजर आहेत. या आयोगाने दिनांक २९/०५/२०१० रोजी आदेश दिले होते ते खालीलप्रमाणे, A copy of the information submitted to the commission should be sent to the appellant free of cost within 15 days from the date of receipt of this order. सदर प्रकरणात प्रकरणात उत्त्तरवादी हे गैरहजर आहेत. त्यांनी या आयोगासमोर दाखल केलेल्या माहितीचे कागदपत्र अर्जदार अपिलार्थींना या आयोगासमोर देण्यात आले व तशी पोच घेतली. त्यामुळे अर्जदारांची तक्रार निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई**
**दिनांक : २५-०५-२०११.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :रामाआ२०११/तक्रार क्र. ९९८/०२**

**श्री. सुदेश गायकवाड,**
**ओंकार चाळ, इंदिरा नगर,**
**जुन्या कबरस्तानजवळ,**
**जोगेश्वरी (पू), मुंबई ४०० ०६०. ... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ**
**म्हाडा तिसरा मजला,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू)**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी**
**मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ**
**म्हाडा तिसरा मजला,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू)**
**मुंबई ४०० ०५१. ... गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - २५/०५/२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

सदर प्रकरणात अर्जदार व अपिलार्थी हजर आहेत, तक्रारदार यांच्या तर्फे श्री सूर्यवंशी हे हजर आहेत. त्यांनी पुढील तारखेला अर्जदराला द्यावयाची माहिती मूळ अभिलेखासह उपलब्ध करुन देण्याचे कबूल केलेले असल्यामुळे सदर प्रकरणात ३०/०५/२०११ रोजी दुपारी २.०० वाजता सूनावणी ठेवण्यात येते. पुढील सुनावणी ३०/०५/२०११ रोजी घेण्यात येईल.

**(भास्कर पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २५-०५-२०११**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :रामाआ२०११/तक्रार क्र. १३०३/०२**

**श्री. सुभाष सखाराम मांडगावकर,**
**रा.ब.- २०२, भगवा महल, बा. ज. मार्ग,**
**सातरस्ता, मुंबई ४०० ०११. ... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**जन माहिती अधिकारी तथा**
**शिरस्तेदार उपविभागीय कार्यालय,**
**रत्नागिरी , जिल्हा रत्नागिरी. ... गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - २५/०५/२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित**

तक्रारदार अपिलकर्ता हजर आहेत. उपविभागीय अधिकारी यांचे शिरस्तेदार श्री. डी.ए. बेर्डे हे हजर आहेत. त्यांनी दाखल केलेला खुलासा व त्या सोबत दाखल केलल्या पत्राची प्रत अर्जदार व अपिलार्थीला देण्यात आलेली आहे. अर्जदारांचे समाधान झाल्यामुळे तक्रार ही निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २५-०५-२०११**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :रामाआ२०११/तक्रार क्र. ८७१/०२**

**श्री. इकबाल अहमद खान,**
**२४/२०२ पार्क व्हयू, सी.एच.एस.लिमिटेड,**
**ओशिवारा म्हाडा,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३. ... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपमुख्य अधिकारी, (मि.का.२),**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू)**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मिळकत व्यवस्थापक(२)**
**उपमुख्य अधिकारी,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू)**
**मुंबई ४०० ०५१. ... गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - २५/०५/२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

अर्जदार अपिलार्थी हजर आहेत जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अधिकारी गृहनिर्माण विभाग बांद्रा मुंबई ४०० ०५१ यांच्या तर्फे त्यांचे प्रतिनिधी श्रीमती माने हजर आहेत. प्रथम अधिकारीयांच्या तर्फे उपमुख्य अधिकारी संदानंद लक्ष्मण पागधरेसदर प्रकरणात जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधींनी दिनांक ०४/०७/२०१० रोजी यांनी आयोगापुढे पत्राची छांयाकित प्रत अर्जदार अपिलार्थीला देण्यात आली. व त्याची एक प्रत सुध्दा दिनांक २५/०७/२०११ रोजी दाखल केलेली आहे. सदर प्रकरणात आयोगाने दिनांक २५/०५/२०१० रोजी असे आदेशित केले होते की, 'I have come to the conclusion that prima facie provisions of the RIT Act 2005 have been violated by not funrnishing the desired information in time. The PIO neeeds t explain why enal action should not be taken against him under section 20 of the RIT Act 2005. His reply to reach the commission within 4 weeks failling which it will be presumed that he has nothing to say and will be proceeded as per law' त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्या

प्रतिनिधिंनी जन माहिती अधिकारी हे सुट्टीवर असल्यामुळै पुढील तारखेची मागणी केली आहे. व सदर प्रकरणात सुनावणी दिनांक ०३/०६/२०११ रोजी दुपारी २ वाजता ठेवण्यात येत आहे. ˆया तारखेला अर्जदार अपिलकर्ता गैरहजर असले तरी चालेल कारण अर्जदार अपिलार्थीला ामहिती प्राप्त झालेली आहे. पुढील तारीख दिनांक ०३/०६/२०११ रोजी दुपारी २.०० वाजता.

**(भास्कर पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई**
**दिनांक : २५-०५-२०११**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :रामाआ२०११/तक्रार क्र. १३०१/०२**

**सौ. नंदा पां. रेडकर,**
**बी -२७६/१ सरकारी वसाहत,**
**बांद्रा, (पू) मुंबई ४०० ०५१.** **... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपमुख्य अभियंता (स्थापत्य),**
**गृहनिर्माण व क्षेत्र विकस मंडळ,**
**बांद्रा विभाग, दुसरा मजला,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू)**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता,**
**गृहनिर्माण व क्षेत्र विकस मंडळ,**
**बांद्रा विभाग, दुसरा मजला,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू)**
**मुंबई ४०० ०५१.** **... गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - २५/०५/२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

अर्जदार अपिलार्थींचे म्हणणे ऐकून घेण्यात आलेले आहे. अर्जदाराने या आयोगासमोर दाखल केलेल्या लिखित तक्रारीरवर जन माहिती अधिकारी यांनी मुद्देसूद उत्तर तसेच त्या संबधीची कागदपत्रे असल्यास त्यांच्या प्रती अर्जदाराला आजपासून ८ दिवसाच्या आत देण्याचे कबूल केलेले आहे. व ते लेखी उत्तर कागदपत्रांसह विनाशुल्क पंजीबध्द राखीने अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर पाठविण्याचे कबूल केल्यावरुन सदरची तक्रार निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई**
**दिनांक : २५-०५-२०११**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :रामाआ२०११/तक्रार क्र. १२९७/०२**

**श्री. अविनाश दत्तात्रय ठाकूर,**
**८/२४९, आकांक्षा, म्हाडा,**
**निर्मल नगर बांद्रा, (पू.),**
**मुंबई ४०० ०५१.** **... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालय,**
**सहकारी संस्था, म्हाडा,**
**रुम नं ३६१, २ रा मजला**
**मुंबई गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू)**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहकरी अधिकारी (श्रेणी- १),**
**सहकारी संस्था, म्हाडा,**
**रुम नं ३६१, २ रा मजला,**
**मुंबई गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू)**
**मुंबई ४०० ०५१.** **... गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - २५/०५/२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

सदर प्रकरणात या आयोगाने दिनांक २५/१०/२०१० च्या द्वितीय अपील मागणीवरुन जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला ३० दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश निर्गमित केलेले होते. त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी माहिती देणे अपेक्षित होते. परंतु ती न मिळाल्यामुळे अर्जदार अपिलार्थीला या आयेगासमोर दिनांक २८/०१/२०११ रोजी तक्रार करावी लागली. त्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर प्रकरणात दिनांक ०८/०४/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. दिनांक ०८/०४/२०११ रोजी सुनावणी घेतली व त्यांनंतर दिनांक २७/०४/२०११ रोजी सुनावणी झाली दरम्यान अर्जदार अपिलकर्ता हजर होते. जन माहिती अधिकारी बी. एम. काकड , सहकारी तसेच अपिलीय अधिकारी डॉ. किशोर मांडे उपनिबंधक हजर होत. अर्जदार अपिलार्थींच्या म्हणण्यानुसार या आयोगाने आदेशित केल्यानंतर दिनांक २५/१०/२०१० रोजी च्या आदेशानंतर सुध्दा माहिती दिलेली नाही. व

त्यामुळे संबधीतांवर दंडात्मक कारवाई करावी. या आयोगाने दिलेल्या निर्णयानुसार शेवटचा परिच्छेद खालीलप्रमाणे:

After going throug the case papers and considering the arguments advanced by parties I have come to the conclusion that while it is true that most of the information sought was available at the societ's level' a copy of registration Certificate could have been given. The DDR is the custodian of this document. It is also well known that two societies cannot have the same name. Since the appellent has given society's name, a copy of the registration Certifdicate must be furnished to him. The RTI Act is a citizen friendly Act and everone is expected to have a helping attitude.

त्या नुसार ३० दिवसाच्या आत माहिती देणे अपेक्षित होते.जन माहिती अधिकारी श्री. बी. एम. काकड यांनी त्यांचा खुलासा दाखल केला. त्यात त्यांनी दिनांक ०९/०२/२०१० च्या अर्जानुसार माहिती खालील प्रमाणे मागितलेली होती.

१. संस्थेच्या नोंदणी दाखल्याची प्रत.
२. सदर संस्थेच्या झालेल्या सभा व त्यांचे वृत्तांच्या प्रती.
३. कार्यालयातून पाठविलेल्या नोटीसा.
४. परत आल्यानंतर केलेली कार्यवाही.
५. सुनावणी वेळी संस्थेच्या तर्फे उपस्थितांची नावे हुद्दे.
६. तसेच संस्थने मागील ६ महिन्यात घेतलेल्या सभेच्या इतिवृत्तांच्या प्रतीची मागणी केली होती.

या आयागाने दिनांक २५/१०/२०१० रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने ही बाब मान्य केलेली होती की, बरीचशी माहिती ही संस्थेसंदर्भात असल्यामुळे, त्यांच्याकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. 'A copy of registration Certificate could have been given' तसेच . The DDR is the custodian of this document. It is also well known that two societies cannot have the same name. Since the appellent has given society's name, a copy of the registration Certifdicate must be furnished to him. असे आदेशात म्हटले आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७/०४/२०११ रोजी लेखी निवेदन दाखल केले. दिनांक २१/०४/२०११ च्या निवेदनानुसार दिनांक ०८/०४/२०११ रोजी सुनावणी वेळी दिलेल्या आदेशानुसार संस्थेकडून नोदणी दाखल्याची प्रत व नोंदणीक्रम पोस्टाद्वारे उपलब्ध करुन दाखविलेला आहे , असे म्हटले आहे तरी या उत्तरानुसार जवळ जवळ सहा महिन्याचा अवधी माहिती पुरविण्याकरिता लागलेला आहे. ही बाब समाधानकारक नाही. तरी अपिलीय अधिकारी यांनी संबधित जन माहिती अधिकारी यांच्यावर लादलेल्या विलंबावर जबाबदारी निश्चित करावी. या आयोगाने अधिनियमाचे कलम २० (२) प्रमाणे शिफारस केल्याचे गृहित धरुन संबधित जन माहिती अधिकारी यांच्या विरुध्द नियमानुसार योग्य ती कारवाई करावी आणि तसा अहवाल ३० दिवसाच्या आत पुरवावा. सदर तक्रार ही निकाली काढण्यात येते

**--- आदेश---**

**१. अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालय, सहकारी संस्था, म्हाडा, यांना असे आदेश देण्यात येत आहेत की वरील शिफारशीनुसार संबधित जन माहिती अधिकारी यांच्यावर करुन ३ महिन्याच्या आत तसा अहवाल आयोगापुढे सदर करावा.**

**२. तसेच जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे अर्जदाराच्या तक्रारीच्या अनुषंगाने जे प्रकरण चालू आहे. त्यात २१/०६/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली आहे , तरी**

**आणखी विलंब न करता सदर प्रकरणात लवकरात लवकर निर्णय देण्यात यावा.**

**(भास्कर पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई**
**दिनांक : २५-०५-२०११**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :रामाआ२०११/तक्रार क्र. १२६६/०२**

**श्री. नरिदंर सिंग चढ्ढा,**
**१२- अे. एव्हरग्रीन बिल्डींग,**
**गुरू गोविंद सिंग मार्ग,**
**खार (प), मुंबई ४०० ०५२.** **... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहा. अभियंता (इ. व का.),**
**गृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालिका आयुक्त, एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय**
**सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा (प.) मुंबई ४०० ०५०.** **. गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - ३०/०५/२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - अनुपस्थित**

अर्जदार अपिलार्थीच्या म्हणण्यानुसार या आयोगाने आदेश पारित करुन जवळपास आठ महिन्याचा कालावधी लोटला तरी सुध्दा कुठल्याही प्रकारची माहिती पुरविण्यात आलेली नाही. उत्तरवादी यांच्या म्हणण्यानुसार सदर प्रकरणात कारवाई करण्यात आलेली आहे, त्याबाबतची लेखी माहिती परवा पर्यंत म्हणजेच दिनांक ०१/०६/२०११ या आयोगासमारे लेखी स्वरुपात दाखल करण्यात येईल. म्हणून शेवटची संधी म्हणून सदर प्रकरणात दिनांक ०१/०६/२०११ ही तारीख ठेवण्यात आलेली आहे.

**(भास्कर पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई**
**दिनांक : ३०-०५-२०११**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९५०१/अपील क्रमांक ६६०९/२०१०**

**श्री. मुनाफ बारमारे,**
**३०१, रोमलुई अपार्टममेंट, ३रा मजला,**
**पितांबर लेन, माहिम, मुंबई-४०००१६. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मुंबइ(१) शहर मुंबई,**
**६वा मजला, मल्होत्रा हाऊस, जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक(जी/एन विभाग),**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मुंबइ(१) शहर मुंबई,**
**६वा मजला, मल्होत्रा हाऊस, जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २१.०८.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ३.५.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

**आदेश**

अपिलकर्ता यांनी दि.२८.९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे एकूण १५ मुद्यांमध्ये त्यांनी वेळोवेळी केलेल्या अर्जांच्या संदर्भात कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.७.६.२०१० रोजी अपिलकर्ता यांना मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि.२४.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, अपिलकर्ता यांच्याविरुध्द अनुदान थकबाकी काढण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांना योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे पुढीलप्रमाणे लेखी खुलासा दाखल केलेला आहेः-

अपीलाच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या वतीने श्री.मुनाफ बरमारे यांचा माहितीची मागणी करणारा मुळ अर्ज दि.२८.५.२०१० व त्या अर्जातील प्रत्येक मुद्यास(एकूण मुद्दे १६) या कार्यालयाने दिलेले उत्तर दि.७.६.२०१० व त्या अनुषंगाने सादर केलेले म्हणणे/उत्तर यांच्या प्रती सोबत जोडून

सादर करीत आहे. कृपया यातील सर्व म्हणण्याचा/उत्तराचा विचार या द्वितीय अपीलातील जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून व्हावा ही नम्र विनंती.

याशिवाय खालीलप्रमाणे म्हणणे आपणासमोर सादर करीत आहे-

१) या कार्यालयाने श्री.बरमारे व त्यांची संस्था यांच्या संदर्भातील कार्यवाहीच्या संदर्भात या कार्यालयाचा प्रत्येक कागद श्री.बरमारे यांना संबंधित तक्रारदार म्हणून वेळोवेळी दिलेलाच आहे पण तरीसुध्दा त्यांना अभिलेखाचे स्वतः निरिक्षण करुन आणखी काही न मिळालेली कागदपत्रे हवी असल्यास ती न्यावीत म्हणून दि.२१.९.२०१० रोजीच्या पत्राने कळवूनसुध्दा ऑक्टोबर महिन्यातील दि.१६.१०.२०१०, ३०.१०.२०१० व नोव्हेंबर महिन्यातील दि.२०.११.२०१० या तीनपैकी कोणत्याही तारखेस या कार्यालयात श्री.बरमारे उपस्थित राहिलेले नाहीत हे नम्रपणे निदर्शनास आणून देत आहे.

२) आपणासमोरील दि.१३.१०.२०१० रोजीच्या श्री.बरमारेंच्या दुस-या एका अर्जाच्या द्वितीय अपीलातील सुनावणीचे वेळी आपण श्री.बरमारे यांना दि.२०.११.२०१० प्रस्तुत अधिका-यांच्या कार्यालयात श्री.बरमारे यांनी उपस्थित राहून कागदपत्रांचे निरिक्षण करुन प्रती न्याव्यात असे सुचित केलेले आहे. मात्र दि.२०.११.२०१० रोजी श्री.बरमारे प्रस्तुत अधिका-यांच्या कार्यालयात हजर राहिलेले नाहीत. तसा अहवाल या कार्यालयाने माहिती आयोगास स्वतंत्र पत्राने सादर केलेला आहे. त्या दि.२९.११.२०११ रोजीच्या पत्राची प्रतसधुदा सोबत जोडून सादर करीत आहे.

३) श्री.बरमारे यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने या कार्यालयाने खालीलप्रमाणे सहकार कायद्याअंतर्गत कारवाई केलेली आहे ती आपल्या निदर्शनास आणून देत आहे.

* दि.१४.१०.२०१० रोजीच्या पत्राने संस्थेची सुमारे २९९ एवढी कागदपत्रे जा.क्र.उपनि/११५६ व ११५७ अन्वये पोस्टाने त्यांना पाठविलेली आहेत.

* कलम ८३ अन्वये त्यांच्या सर्व तक्रारींची चौकशी करुन चौकशी अहवाल दि.१६.१०.२०१० रोजी चौकशी अधिका-यांनी सादर केलेला आहे. श्री.मुनाफ बरमारे यांना या अहवालाची प्रत घेवुन जाणे विषयी कळविलेले असूनही (दि.२८.१०.२०१०) त्यांनी ती नेलेली नाही.

यावरुन प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सहकार कायद्यानुसार कारवाईस ते सहकार्य देत नाहीत हे स्पष्ट होते. माहितीच्या कायद्यानुसार कागदपत्रे मिळतील हे कळवूनही ते त्या मुद्यांकडे सोईस्करपणे दुर्लक्ष करतात.

वरील पार्श्वभूमी विचारात घेता असे स्पष्ट होते की, श्री.बरमारे यांना एक तर या कार्यालयाच्या अभिलेखातून सर्व माहिती/कागदपत्रे मिळाली आहेत किंवा ती माहिती कागदपत्रे मिळवण्यातच त्यांना रस नाही. म्हणून श्री.बरमारे यांचा द्वितीय अपीलाचा हेतू केवळ त्यांचेकडून संस्थेस येणे असलेल्या थकबाकीचा मुद्दा पुढे येऊ नये,दुर्लक्षित रहावा हाच आहे असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. हे कार्यालय सतत त्यांच्या अर्जांना उत्तरे देण्यात, प्रथम व द्वितीय अपीलांना उत्तरे देण्यास, सुनावणीस हजर राहण्यास व्यग्र रहावे व त्यातून प्रस्तुत कार्यालयाने पुन्हा संस्थेविरुध्दच कारवाई करावी जेणेकरुन संस्थेने सुध्दा श्री.बरमारे यांचेकडून थकीत रकमेच्या वसुलीसाठी कारवाई करु नये. परिणामी श्री.बरमारे हे थकबाकी न भरता विना मोबदला संस्थेच्या सर्व सुविधांचा लाभ आज घेत आहेत. एक प्रकारे माहितीच्या अधिकाराच्या कायद्याचा ते वैयक्तिक लाभासाठी दुरुपयोगच करीत आहेत.

म्हणून श्री.बरमारे यांचे द्वितीय अपील नामंजूर करावे.

यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे परंतु जन माहिती अधिकारी यांनी म्हटल्याप्रमाणे संस्थेस येणे असलेली थकबाकीचा मुद्दा पुढे येऊ नये तो दुर्लक्षित रहावा असा उद्देश असल्यामुळे अपिलकर्ता माहितीच्या अधिकारात अर्ज करुन माहिती मागवत असतात व माहिती मिळाली नाही तर आयोगापुढे द्वितीय अपील दाखल करत असतात असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. जन माहिती अधिकारी यांनी जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था यांच्याकडे दि.१३.७.२०१० रोजी प्रथम अपीलाच्या संदर्भात दाखल केलेले निवेदनसुध्दा स्वयंस्पष्ट आहे व अपिलकर्ता हे विनाकारण उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयास वेठीस धरुन अनेक प्रकारे अर्ज करुन माहिती मागविण्याचा प्रयत्न करीत आहेत असे दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ३.४.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ार्णियाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९५०२/अपील क्रमांक ६६१०/२०१०**

**श्री. रमेश के.जे. चौहान,**
**दिपक-ज्योती को.ऑप.हो.सो.लि.,**
**फ्लॅट नं.१०४, विंग बी, जी.डी.ए. मार्ग,**
**परेल, मुंबई-४०००३२. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मुंबइ(१) शहर मुंबई,**
**६वा मजला, मल्होत्रा हाऊस, जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक(एफ/एस विभाग),**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मुंबइ(१) शहर मुंबई,**
**६वा मजला, मल्होत्रा हाऊस, जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २१.०८.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ३.५.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

**आदेश**

अपिलकर्ता यांनी दि.३.४.२०१० रोजी माहिती मिळण्यासाठी अर्ज केलेला दिसतो. सदर अर्जाच्या अनुषंगाने दि.१५.४.२०१० रोजी अपिलकर्ता यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०च्या कलम ८९(ए)नुसार या कार्यालयाकडील आदेश क्रमांक मुंबई/सनि/एफ-एस तपासणी/कलम ८९(अे)/४७७८/२०१० दि.२९.३.२०१० अन्वये तपासणी लावण्यात आलेली आहे. तपासणी कामकाज पूर्ण होताच आपण पत्रात नमूद केलेल्या मुद्यांबाबतची/तपासणीच्या अहवालाची प्रत आपणास देण्यात येईल असे सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था एफ-एस विभाग,मुंबई यांनी कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि.२६.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२६.५.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता

यांच्या दि.३.४.२०१० रोजी दाखल केलेल्या मुद्दा क्र.१ ते ९ नुसार मागणी केलेल्या माहितीपैकी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती त्यांना विहित शुल्क आकारुन ३ आठवडयात देण्यात यावी असा निर्णय कळविलेला दिसून येतो. परंतु त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, दि.३.४.२०१० रोजीच्या अर्जामध्ये जी माहिती मागीतलेली आहे ती त्यांना उपलब्ध झालेली नाही व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणेसुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यांनी पुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्याविरुध्द थकबाकी काढण्यात आलेली आहे व त्याबद्दल तक्रारकरतांना कोणत्याही प्रकारे योग्य ती कारवाई केलेली नाही असे आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.२२.३.२०१०च्या पत्राप्रमाणे दि.१२.४.२०१० रोजी संपूर्ण मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तरीसुध्दा पुन्हा त्यांनी दि.३.४.२०१० रोजी तीच माहिती मागणारा अर्ज कार्यालयाकडे केलेला आहे. कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे ती त्यांना तपासणी अंती उपलब्ध करुन देता येईल असे दि.१२.४.२०१० रोजी कळविले आहे. परंतु तरीही प्रथम अपीलात त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून तक्रार केलेली आहे. वास्तविक अपिलकर्ता हे तीच माहिती अनेक प्रकारे अर्ज करुन मागत आहेत. दि.१९.५.२०१० रोजीसुध्दा अपिलकर्ता यांच्या तक्रारीच्या संदर्भात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०च्या कलम ७८(१) अन्वये आदेश करण्यात आलेले आहेत. दि.२२.७.२०१० रोजी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे खुलासा दाखल करतांना त्यांनी श्री.रमेशकुमार चव्हाण यांनी दि.२५.६.२०१० च्या पत्रान्वये त्यांच्या तक्रारीचे निराकरण केले असून त्यांचे समाधान झाले आहे व त्यांना माहिती मिळाली आहे असे पत्र सादर केलेले आहे असा खुलासा आयोगापुढे सादर केलेला आहे. त्यावरुन अपिलकर्ता यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. मात्र तपासणी अंती माहिती उपलब्ध करुन देता येईल असे जे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले त्याप्रमाणे माहिती उपलब्ध झाल्यास ती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी. अपिलकर्ता यांच्यातर्फे जे प्रतिनिधी उपस्थित होते त्यांनी युक्तीवाद करतांना त्यांच्याविरुध्द अन्याय झालेला आहे व थकबाकी काढलेली आहे वगैरे तक्रार केलेली आहे. यावरुन अपिलकर्ता यांनी संस्थेचे देणे देण्यासंबंधात ज्या तक्रारी केलेल्या आहेत त्या संदर्भात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम २००५ प्रमाणे कारवाई केलेली असेल तर त्याप्रमाणे त्यांना माहिती पुरवण्यात यावी. पुन्हा आयोगापुढे खुलासा करतांना अपिलकर्ता यांना त्यांच्या वेगवेगळया अर्जांप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. असे असले तरी

अपिलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे कार्यालयात त्यांच्या संदर्भात जी नस्ती उपलब्ध आहे त्या नस्तीतील कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अर्जाच्या संदर्भात कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती व्यक्तीशः उपलब्ध करुन द्याव्यात. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे संपर्क साधून त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती, त्याबाबतचा खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन घ्याव्यात .**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ३.४.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाािर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९४८८/अपील क्रमांक ६६०७/२०१०**

**श्री. जीतेंद्र धनजानी,**
**१६, श्री.गोपाळ नगर, महेश नगर पोलीस स्टेशनसमोर,**
**जयपूर-३०२०१५. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा औरंगाबाद म्युनिसिपल कॉर्पोरेशन,**
**औरंगाबाद, महाराष्ट्र.**

**जन माहिती अधिकारी तथा औरंगाबाद म्युनिसिपल कॉर्पोरेशन,**
**औरंगाबाद, महाराष्ट्र. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १९.०८.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ३.५.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

**आदेश**

अपिलकर्ता यांनी दि.११.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी महानगरपालिका,औरंगाबाद यांच्याकडे Work Contract File with note sheet of solid waste management of Ramky Enviro Engineers Ltd. बाबत माहिती मागीतलेली दिसून येते. सदर माहिती अर्जासोबत त्यांनी रु.१०/-चा डी.डी.सुध्दा पाठविलेला दिसून येतो. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१६.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहेत परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेला नाही. परुतु अपिलकर्ता यांनी प्रथम अपीलासोबत त्यांचा अर्ज त्यांच्या कार्यालयात स्विकारलेला नाही याबद्दलचा पुरावा सादर केलेला आहे. सदर अर्जावरील स्पीडपोस्ट व पत्ता बरोबर असूनसुध्दा ते परत पाठविण्यात आलेले आहे व ही बाब त्यांनी प्रथम अपीलातही नमूद केलेली होती. परंतु प्रथम अपीलही प्राप्त झालेले नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. परंतु अपिलकर्ता यांनी पाठविलेले स्पीडपोस्टाचे पाकीट व त्यावरील पत्ता हा योग्य असूनसुध्दा महानगरपालिकेच्या

कार्यालयाकडून जर स्पीडपोस्ट दि.१५.५.२०१० रोजी परत पाठविले असेल तर त्याबाबत योग्य ती चौकशी करणे आवश्यक आहे व ज्या कर्मचा-याने स्पीडपोस्ट परत पाठविले असेल त्याच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे. अन्यथा अशाचप्रकारे माहितीच्या अधिकारातील पोस्टाने आलेले अर्ज जर आवक लिपिक नाकारत असतील तर नागरिकांना त्यांचे अर्ज सादर करणे अशक्य होईल.त्यामुळे आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्याबाबत योग्य ती कारवाई करणे संयुक्तिक राहील.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा दाखल केलेला आहे व त्यात मागीतलेल्या माहितीच्या संदर्भातील गुणवत्तेच्याबाबत विश्लेषण केलेले आहे व माहिती पोस्टाने आयोगाकडे पाठविली आहे असे नंतरच्या खुलाशात म्हटलेले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी हे अभियंता असूनसुध्दा त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींची काही माहिती आहे असे दिसून येत नाही. राज्य माहिती आयोग कोणतीही माहिती मागवत नसते याबद्दलची जाणीवही अभियंता यांना नाही यावरुन महानगरपालिकेमध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या संदर्भात कोणतेही प्रशिक्षण झालेले आहे असे दिसून येत नाही. आयोगाने अर्जाची प्रत पाठविल्यानंतर माहिती ही ज्या अर्जदाराने मागीतली आहे त्यांना ती पाठविणे अपेक्षित असते व हे सर्वसामान्य ज्ञान आहे. याबाबत संबंधित जन माहिती अधिकारी यांना समज देणे आवश्यक आहे. असे असले तरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना त्यांनी दिलेल्या पत्त्यावर विनामुल्य माहिती रजिस्टर पोस्टाने पाठविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या त्यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये मागीतलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने त्यांनी दिलेल्या पत्त्यावर पाठविण्यात यावी. तसे न केल्यास व तक्रार आल्यास ते शास्तीस पात्र राहतील याची त्यांनी नोंद घ्यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**३) आदेशाची १ प्रत आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांच्याकडे स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ३.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०६९५/अपील क्रमांक ६६११/२०१०**

**श्री. प्रमोद लक्ष्मण कदम,**
**१६/डी , वर्सोवा अंधेरी श्री साई सहकारी गृहनिर्माण संस्था म.,**
**एस.व्ही.पी.नगर, म्हाडा, अंधेरी(प.),**
**मुंबई-४०००५३. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा मा.मुख्याधिकारी,म्हाडा,**
**मुंबई मंडळ, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,**
**मुंबई गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मा.मुख्याधिकारी,म्हाडा,**
**मुंबई मंडळ, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,**
**मुंबई गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),मुंबई-४०००५१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २१.०२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ३.५.२०११**
**जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१८.८.२०१० रोजी मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांच्याकडे माहितीचा अर्ज करुन त्यांच्या कार्यालयाच्या वेळेची सविस्तर माहिती व टपाल स्विकारण्यासाठी असलेली निर्धारित वेळ याबाबतची माहिती मागीतलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.७.१०.२०१० रोजी पुन्हा अपीलीय अधिकारी म्हणून मुख्य अधिकारी,मुंबई मंडळ यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२९.१०.२०१० रोजी देण्यात आला असून ७ दिवसाच्या आत माहिती देण्याबाबत आदेश देण्यात आले. त्याप्रमाणे दि.८.११.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली असूनही अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहेत. द्वितीय अपीलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी ज्याप्रमाणे मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांच्याकडे माहितीचा अर्ज सादर केला होता त्याचप्रमाणे त्यांनी २०.८.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडेसुध्दा माहितीचा अर्ज दाखल केला होता व दोन्ही अर्जात एकच माहिती मागीतलेली असल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे अनवधानाने राहून गेले. परंतु त्याच माहितीकरीता अपिलकर्ता यांनी पुन्हा २ प्रथम अपीले दाखल केली. त्यानंतर मात्र त्यांना दि.१८.११.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलकर्ता

यांनी मागीतलेल्या माहितीचे स्वरुप पहाता त्यांनी कार्यालयाच्या कामकाजाची वेळ व सार्वजनिक सुट्टया व टपाल स्विकारणा-या कर्मचा-याच्या संदर्भातील माहिती मागीतलेली दिसून येते. याचा अर्थ कार्यालयीन वेळेत त्यांना अधिकारी/कर्मचारी यापैकी कोणीही आढळून येत नसल्यामुळे त्यांनी ती माहिती मागीतली असावी असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही व याबद्दल मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांनी दखल घेतलेली आहे किंवा नाही याबद्दल खुलासा देण्यात आलेला नाही. मात्र माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**३) सदरच्या निर्णयाची १ प्रत मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्याकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ३.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ािर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९५७६/अपील क्रमांक ६६०८/२०१०**

**कु.अफताब ए. सिद्दिकी,**
**४, सदानंद क्लासीक, प्लॉट नं.५२८,३३वा रस्ता,**
**खार(प.), मुंबई-४०००५२. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, मुंबई,**
**धर्मादाय आयुक्त भवन, २रा माळा, ८३,डॉ.ॲनी बेझंट रोड,**
**वरळी, मुंबई-४०००१८.**

**जन माहिती अधिकारी तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, मुंबई,**
**धर्मादाय आयुक्त भवन, २रा माळा, ८३,डॉ.ॲनी बेझंट रोड,**
**वरळी, मुंबई-४०००१८. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.०८.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ३.५.२०११**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२१.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सहारा वेलफेअर सोसायटीच्या संदर्भात एकूण ४ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.८.५.२०१० रोजी अपिलकर्ता यांना आपल्या अर्जात मागीतलेली माहिती या कार्यालयातील अभिलेखा शाखा,लेखा शाखा या शाखांच्या अधिकाराखाली येत असल्याने त्यांच्याकडून मागणी केली आहे ती प्राप्त होताच आपणास विनाविलंब पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते.परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२२.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१६.७.२०१० रोजी देण्यात आला असून सहारा वेलफेअर सोसायटीच्या संदर्भात कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दि.२५.११.२०१० रोजी अनुसुची- १ ची प्रत पृष्ठ १ ते ४, ज्ञापन नियम व नियमावलीची प्रत पृ. १ ते ११

त्यांना उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी दि.२१.५.२०१० रोजीच्या अर्जाच्या संदर्भात आयोगाच्या कार्यालयात २ वेळा द्वितीय अपील दाखल केलेले असल्यामुळे व अशारीतीने राज्य माहिती आयोगाची दिशाभूल करुन राज्य माहिती आयोगाचा वेळ वाया घालविला असल्यामुळे इतर अतिशय आवश्यक असणा-या अपिलांच्या संदर्भात अपीले प्रलंबित रहातात असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपिलार्थींच्या अर्जाच्या संदर्भात दि.९.३.२०११ रोजी श्री.भास्कर पाटील प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी निर्णय दिलेला आहे. परंतु अपिलकर्ता यांच्याकडे पत्र असूनसुध्दा तेच पत्र अपीलाच्या निर्णयात दिलेले आहे याची माहिती नाही असे सांगून विनाकारण आयोगापुढे येऊन माहिती न करुन घेता आयोगाचा वेळ घेत आहेत त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ३.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाािर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती**

# मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

**क्रमांक-मुमाआ/२०११/१०९/तक्रार क्र. १३०/का.१**

**श्री. अब्दुलकरीम अब्दुल्ला,**
**६१३, अमीर बाग, ६ लतीफा चाळ,**
**हेमूकलानी मार्ग, चेंबूर, मुंबई-४०००७१. .... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**उप जिल्हाधिकारी(अति.निष्का.), वेल्फेअर सेंटर बिल्डिंग,**
**थोरात मार्ग, चेंबूर(प.), मुंबई-४०००८९. .... उत्तरवादी**

**निर्णय**

**तक्रारीचा दिनांक : ६.०१.२०१०**
**तक्रारदार,जन माहिती अधिकारी उपस्थित.**

तक्रारदार यांनी दि.६.१.२०१० रोजी त्यांच्या दिनांक १०.१२.२००९च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून आयोगाकडे तक्रार केलेली आहे. तसेच तक्रारदार यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी दि.१०.१२.०९ रोजी हस्ताक्षरात अर्ज दाखल केला परंतु तो अर्ज स्विकारला नाही व त्यानंतर त्यांनी टंकलिखित अर्ज दाखल केल्यावर मात्र तो स्विकारला. परंतु त्यानंतर त्याही अर्जाच्या संदर्भात माहिती दिलेली नाही. तसेच दि.१८.३.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी(अतिक्रमण निष्कासन-चेंबूर) यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले होते परंतु त्यानुसारसुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. गैरतक्रारदार तहसिलदार या सुनावणीस हजर झाल्या होत्या परंतु त्या नवीन आहेत असे त्यांनी सांगितले व या प्रकरणी त्यांना आजही काही माहिती नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यामुळे तक्रारदाराचा हस्तलिखित अर्ज ज्या लिपिकाने स्विकारण्यास नकार दिला किंवा नायब तहसिलदार यांनी तो स्विकारला नसेल तर त्यांच्या विरुध्द योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे. तक्रारदार यांना त्यांच्या दि.१०.१२.०९च्या अर्जाप्रमाणे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील त्याकरीता सदरची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दि.१०.१२.०९च्या अर्जाच्या अनुषंगाने तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या दि.१८.३.२०१० च्या आदेशाप्रमाणे मागीतलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत विनाशुल्क रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) तक्रारदार यांचा हस्तलिखित अर्ज दि.१०.१२.०९ रोजी ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी स्विकारला नसेल त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

३) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना सदर आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई — (विलास पाटील)

दिनांक ६.५.२०११ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाािर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

# मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

**क्रमांक-मुमाआ/२०११/३२६/तक्रार क्र. १२८/का.१**

**श्री. ज.ना.संदानशिव,**
**१/१ झाकीर मंझील, आनंद नगर, साज सिनेमा जवळ,**
**एस.पी.एस.मार्ग, भांडूप(प.), मुंबई-४०००७८. .... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**विभागीय समाज कल्याण अधिकारी, मुंबई विभाग,**
**कोकण भवन,६वा माळा, सी.बी.डी.बेलापूर,**
**नवी मुंबई-४००६१४.**

**जन माहिती अधिकारी,**
**विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, मुंबई उपनगर,**
**प्रशासकीय इमारत,४था माळा, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग,**
**चेंबूर(पूर्व), मुंबई-४०००७१. .... उत्तरवादी**

**निर्णय**

**तक्रारीचा दिनांक : १६.०२.२०१०**
**तक्रारदार,जन माहिती अधिकारी उपस्थित.**

तक्रारदार यांनी दि.१६.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) प्रमाणे त्यांच्या दि.७.१०.०९रोजी जन माहिती अधिकारी,सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग यांच्याकडे मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने तक्रारार यांनी दि.३.२.२०१० रोजी अवर सचिव,महाराष्ट्र शासन यांना असे कळविले की, त्यांचा दि.७.१२.०९चा अर्ज विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेला आहे व पत्राची प्रत सोबत जोडली आहे व त्यांच्याशी संपर्क साधावा असे कळविण्यात आलेले दिसून येते.ही बाब सुध्दा दि.६.१.२०१० रोजी त्यांना कळविण्यात आली होती. त्या अर्जाच्या संदर्भात दि.२५.१.२००९ रोजी विभागीय समाज कल्याण अधिकारी, मुंबई विभाग, मुंबई यांनी विमोचित समाज सहकारी गृहनिर्माण संस्था म.,कुर्ला(पूर्व), मुंबई-२४ या संस्थेची सन १९६०ची मूळ प्रवर्तक ३६ सभासदांची नस्ती गहाळ झाल्याची खबर देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, मुंबई उपनगर यांनी त्यांचे पत्र क्र.९३३ दि.२०.४.२००७ मध्ये नमूद केले आहे की, त्यांचे कार्यालयाची निर्मिती सन २०००मध्ये झाली असून दोन तीन

वेळा कार्यालयाच्या जागा बदलण्यात आल्याने सदर संस्थेच्या नस्तीचा शोध घेऊनही ती प्राप्त झालेली नाही. जी माहिती उपलब्ध होती ती देण्यात आलेली आहे. याचा अर्थ सदर नस्ती गहाळ केलेली आहे असा होत नाही.शोध घेऊनही एखादी नस्ती विहित वेळेत उपलब्ध होत नसेल व तद्‌नंतर उपलब्ध झाली तर ती कायमस्वरुपी गहाळ झाली आहे असे म्हणता येणार नाही त्यामुळे या कार्यालयामार्फत सदर खबरीची कार्यालयीन प्रमाणित प्रतीचा प्रश्न उद्‌भवत नाही. विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, मुंबई उपनगर यांनी आपल्या दि.३०.१२.०९ अन्वये पाठविलेल्या पत्रात नस्ती गहाळ केल्याचे नमूद केलेले नाही. त्यामुळे या कार्यालयाकडून खबर विभागीय कार्यालयास देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे सदर पत्रावरुन दिसून येते. प्रथम खबर देण्याचा पत्ता दि.३०.१२.०९रोजी आपणास पाठविलेल्या पत्रात नमूद केलेला आहे. तरी पुनश्च पोलीस ठाण्याचा पत्ता देण्यात येत आहे. चेंबूर पोलीस ठाणे,आर.सी.मार्ग, चेंबूर(पूर्व), मुंबई-४०००७१ या पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात येते. तसेच संबंधित सक्षम अधिका-यांचे नांव संबंधित पोलीस ठाण्याशी संपर्क साधून प्राप्त करुन घ्यावे असे कळविलेले दिसून येते. परंतु तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, नस्ती सुध्दा उपलब्ध होत नसेल तर त्याकरीता पोलीसांकडे एफआयआर दाखल करणे आवश्यक होते. विभागीय समाजकल्याण अधिकारी मुंबई विभाग हे सुनावणीस दुपारी उशीरा उपस्थित झाले व त्यांनी आयागापुढे मुद्देनिहाय खुलासा दाखल केलेला आहे व त्यामध्ये तक्रारदाराला सर्व वस्तुस्थिती निदर्शनास आणून देण्यात आलली आहे असा खुलासा करुन पुन्हा मुद्देनिहाय खुलासा केलेला आहे तो खालीलप्रमाणे आहे-

अर्जदार श्री.ज.ना.संदानशिव यांनी जन माहिती अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेकडे त्यांचे दि.७.१०.२००९ चे अर्जान्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहितीची मागणी केली होती. सदरचा अर्ज या कार्यालयास दि.६.१.२०१० रोजी प्राप्त झालेला आहे(जोडपत्र-१). त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र.मुंवि/विसकअ/मावक/गृ.नि./मा.अधि./०९.१०/१२२ दि.२५.१.२००९ अन्वये माहिती दिलेली आहे(जोडपत्र-२)सदरची माहिती स्पीड पोस्टद्वारे पाठवली आहे(जोडपत्र-३)

अर्जदारास माहितीचा अधिनियम २००५ कलम(७) मध्ये विहित केलेल्या मुदतीत माहिती दिलेली असल्याने कृपया कलम २० प्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेवर शास्ती लादण्यात येवू नये ही विनंती.

तक्रारदार श्री.ज.ना.संदानशिव १/१ झाकिरमंझील, आनंदनगर, भांडूप(प.), मुंबई-७८ यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लागू असलेल्या मुद्दानुसार खालीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

मुद्दा क्र.१ - वस्तुस्थिती आहे.

मुद्दा क्र.२ - जन माहिती अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, मुंबई यांचेशी संबंधित नाही.

मुद्दा क्र.३ - तक्रारदार यांचा दि.७.१०.२००९ च्या माहिती अर्जातील मुद्दा क्र.१ची माहिती "शोध घेऊनही उपलब्ध होत नाही असे कळविले आहे तसेच विमोचीत समाज सहकारी गृहनिर्माण संस्था(म.) कुर्ला(पूर्व) या संस्थेची १९६० ची मूळ प्रवर्तक ३६ सभासदांची नस्ती गहाळ केल्यानंतर सदरची नस्ती गहाळ केल्याची खबर मा.विभागीय समाज कल्याण अधिकारी मुंबइ विभाग,मुंबई यांना दिलेली आहे का? "

सदर योजना ही विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, मुंबई उपनगर यांचे मार्फत राबविण्यात येत असल्याने संबंधित कार्यालयाकडे विचारणा केली असता त्यांचे कार्यालयाी निर्मिती सन २००० मध्ये झालेली असून तीन वेळा कार्यालयाच्या जागा बदल झाल्याने संस्थेची नस्ती शोध घेऊनही प्राप्त झालेली नसल्याने ती गहाळ केलेली आहे असा होत नाही. तसे संबंधितांनी दि.२०.४.२००७ चे पत्रान्वये कळविलेले आहे, त्यामुळे विभागीय कार्यालयास त्यांनी नस्ती गहाळ झाल्याची खबर दिलेली नसेल असा अर्थ अभिप्रेत असल्याची या कार्यालयाची पक्की धारणा आहे.

मुद्दा क्र.४ - तक्रारदाराने मा.विभागीय समाज कल्याण अधिकारी, मुंबई विभाग, मुंबई यांचेमार्फत गृह कर्ज व सबसिडी रक्कमेचे आर्थिक सहाय्याबाबतची माहिती मागितली आहे.

तक्रारदाराने अर्जात नमूद केलेली विमोचित समाज सहकारी गृहनिर्माण संस्था(म.)कर्ला(पू.) ही संस्था १९६० ची पंजीबध्द असून त्या वर्षापासून सदर संस्थेवर नियंत्रण हे सहकार खात्याचे होते व तद्नंतर सन १९८१ पासून जिल्हा समाज कल्याण अधिकारी वर्ग-१ ही कार्यालये शासनाने सुरु केली. तद्नंतर सहकार खात्याकडून मागासवर्गीय गृहनिर्माण योजनेचे अभिलेख वर्ग(जिल्हा कार्यालयास) करण्यात आले. त्यामुळे विभागीय कार्यालयाकडे गृहकर्ज व सबसिडी रक्कमेचे आर्थिक सहाय्य बाबतची माहिती उपलब्ध नाही. ती जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालयाकडे नोंदणी रजिस्टर करुन उपलब्ध होऊ शकते.

मुद्दा क्र.५ :- शासनाने सदर संस्थेस दिलेला आर्थिक सहाय्य रकमेचा लाभ अपात्र सभासदांना दिलेला आहे.

सदर संस्थेस १९६० साली शासनाने जमिन उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावेळी संस्थेवर नियंत्रण सहकार खात्याचे होते. त्या दरम्यान संबंधित संस्थेने काही सभासद बदल परस्पर केले असल्यास समाज कल्याण खात्यास जबाबदार धरता येणार नाही. समाजकल्याण खात्याकडे योजना वर्ग केल्यानंतर कोणत्याही प्रकारचे सभासद बदल झ ाालेले नाहीत. त्यामुळे आर्थ्कि लाभासाठी अपात्र सभासदांना मान्यता देवून संगनमत करुन शासनाची फसवणूक केली असे म्हणता येणार नाही.

मुद्दा क्र.६ - तक्रारदाराने दि.७.१०.२००९च्या माहिती अर्जातील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती तक्रारदारास न देण्याकरीता अयोग्य व गैरकायदेशीर कारण दाखवून तक्रारदाराने मागणी केलेली माहिती तक्रारदारास देण्यास अडथळा निर्माण केलेला आहे.

दि.७.१०.२००९ रोजीचा अर्ज या कार्यालयास प्रत्यक्षात दि.६.१.२०१० रोजी प्राप्त झ ालेला आहे. याबाबत श्री.संदानशीव तक्रारदार यांनी दि.२० जानेवारी,२०१० रोजी या कार्यालयास सादर केलेल्या अर्जामध्ये स्वतःच्या हस्ताक्षरात ७.१०.२००९ ऐवजी ७.१२.२००९ असे वाचावे असे नमूद केलेले आहे(प्रत सोबत जोडली आहे.).

दि.६ जानेवारी,२०१० रोजी प्राप्त झालेल्या अर्जानुसार आवश्यक माहिती विभागीय कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.मुंवि/विसकअ/मावक/गृ.नि./मा.अधि./०९१०/१२२ दिनांक २५.१.२०१० रोजीच्या स्पीड पोस्टद्वारे पाठविलेल्या पत्रान्वये दिलेली आहे(सोबत पत्र प्रत)त्यानुसार सद पत्राद्वारे सन १९६० ची मूळ प्रवर्तक सभासदांची नस्ती गहाळ झ ाल्याची खबर देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. ही वस्तुस्थिती तक्रारदाराचे निदर्शनास आणून दिलेली आहे. त्यामुळे दिलेली माहिती गैरकायदेशीर आहे असे म्हणता येणार नाही.

मुद्दा क्र.७(अ)(२)- दि.७.१०.२००९ चे जोडपत्र "अ" मधील मुद्दा क्र.१ व २ ची तक्रारदाराने मागीतलेली माहिती त्रारदारास मोफत देण्यासाठी जन माहिती अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, मुंबई विभाग, मुंबई यांना आदेश द्यावा.

तक्रारदाराचा दि.७.१०.२००९ चा अर्ज विभागीय कार्यालयास दि.६.१.२०१० रोजी प्राप्त झाला असून मागणी केलेली आवश्यक माहिती पत्र क्र.जा.क्र.मुंवि/विसकअ/ मावक/ गृ.नि./ मा.अधि./०९.१०/१२ दि.२५.१.२०१० अन्वये दिलेली आहे. (त्याची प्रत पुनश्च या खुलाशासह जोडली आहे.)

मुद्दा क्र.७(ब)(२)- कलम २०(१) अन्वये असलेल्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, मुंबई विभाग, मुंबई यांचेवर रु.२५,०००/- अधिकतम शास्ती लावण्याचे आदेश द्यावेत.

तक्रारदारास माहिती १ महिन्याचे आत उपलब्ध करुन मागणीनुसार दिलेली आहे. त्यानंतर सदर माहिती मान्य नसल्यास त्यांनी नियमानुसार प्रथम अपीलीय अधिकारी यंचंकडे विहित मुदतीत अपील करणे आवश्यक असल्याने तक्रारदाराने त्याकडे दुर्लक्ष करुन मा.राज्य माहिती आयुक्त यांचेकडे अपील केले आहे.

वरील खुलासा पहाता सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई**
**दिनांक ६.५.२०११**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

# मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

**क्रमांक-मुमाआ/२०११/३६/तक्रार क्र. १२७/का.१**

**श्री. ज.ना.संदानशिव,**
**१/१ झाकीर मंझील, आनंद नगर, साज सिनेमा जवळ,**
**एस.पी.एस.मार्ग, भांडूप(प.), मुंबई-४०००७८. .... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४०० ००१. .... उत्तरवादी**

## निर्णय

**तक्रारीचा दिनांक : २१.१२.२००९**
**तक्रारदार उपस्थित,जन माहिती अधिकारी अनुपस्थित.**

तक्रारदार यांनी दि.१०.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी,उच्च शिक्षण,शिक्षण संचालनालय यांच्याकडे तसेच दि.२५.९.०९ रोजी जन माहिती अधिकारी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे १० वर्षांच्या संलग्न सेवेनंतर राजीनामा दिलेल्या कर्मचा-यांना स्वेच्छा निवृत्ती वेतनाचे फायदे देण्याकरीता असलेली माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनषंगाने दि.१६.९.०९ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय यांनी मागीतलेली माहिती मुद्दा क्र.१ व मुद्दा क्र.२ व ३ या संचालनालयाशी संबंधित नाही असे कळविले होते. मात्र जन माहिती अधिकारी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय यांनीसुध्दा माहिती दिलेली नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे.

जन माहिती अधिकारी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय हे सुनावणीस हजर नाहीत त्यामुळे त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे ते दोषी आढळून येतात व ते शास्तीस पात्र आहेत. परंतु शास्ती लादण्यापूर्वी त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे व सदर प्रकरणी माहिती उपलब्ध करुन दिलली नसल्यामुळे सदरची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) सदरची तक्रार मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी,माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय यांनी तक्रारदार यांच्या दि.२५.९.०९ च्याअर्जाच्या अनुषंगाने माहिती विनाशुल्क रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) तक्रारदार यांच्या दि.२५.९.०९ च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये रु.१०,०००/- ची शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत आयोगापुढे समक्ष सादर करावा. तसे न केल्यास शास्ती कायम करण्यात येईल व ती त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्याचे आदेश देण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक ६.५.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ार्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

# मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

**क्रमांक-मुमाआ/२०११/३६/तक्रार क्र. १२६/का.१**

**श्री. रमेशचंद्र खुशालचंद परदेशी,**
**कमलदीप अंगण, बी/१५, मोहन नगर,**
**धनकवडी, पुणे-४११०४३. .... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी,**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र राज्य,**
**जुने जकात घर, विकास विभाग इमारत, दुसरा मजला,**
**शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई-४०००३३. .... उत्तरवादी**

**निर्णय**

**तक्रारीचा दिनांक : २८.१०.२००९**
**तक्रारदार,संचालक(सां.कार्य) उपस्थित,जन माहिती अधिकारी अनुपस्थित.**

तक्रारदार यांनी दिनांक १०.५.२०१० रोजी त्यांच्या दि.३.६.०९ च्या अर्जाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य ॲकॅडमी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केलेली आहे. महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य ॲकॅडमीच्या कार्यालयात जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी हे नियुक्त झालेले नसल्यामुळे कार्याध्यक्ष श्री.नंदकिशोर नौटियाल यांनी दि.२१.७.२००९ रोजी अपिलकर्ता यांना ३ मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली होती परंतु अपिलकर्ता यांचे समाधान झाले नसल्यामुळे त्यांनी सचिव कार्याध्यक्ष,महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य ॲकॅडमी यांच्याकडे पुन्हा निवेदन दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती मिळाली नाही म्हणून तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केलेली आहे. त्याबाबत आयोगापुढे खुलासा करतांना संचालक,सांस्कृतिक कार्य यांनी तक्रारदार यांनी मागविलेली माहिती मा.कार्याध्यक्ष, हिंदि साहित्य ॲकॅडमी यांनी संचालक सांस्कृतिक कार्य यांच्या निदर्शनास न आणता परस्पर दिलेली आहे. परंतु श्री.परदेशी यांनी मागितलेली माहिती आता जन माहाती अधिका-यांमार्फत विहित मुदतीत देण्यात येईल असे म्हटलेले आहे. त्यांनी पुढे असेही सांगितले की, राज्य हिंदी साहित्य ॲकॅडमी या कार्यालयात कर्मचारी/अधिकारी वर्ग नियुक्त नाही त्यामुळे संचालक,सांस्कृतिक कार्य किंवा मंत्रालयातील अधिकारी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नियुकती करतील

व त्यानंतर त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यामुळे सदरची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१) सदरची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांनी मागीतलेली माहिती त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन देण्यात यावी.**
**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ६.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

# मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

**क्रमांक-मुमाआ/२०११/८९/तक्रार क्र. १२५/का.१**

**श्री. फरीद-उल-हसन इकबाल हूसेन,**
**एफ सेक्टर, आय-लाईन, खोली क्र.९/१०,**
**शहाजीनगर, चिताकँप, ट्राँबे, मुंबई-४०००८८.** .... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी,**
**एम-पूर्व विभाग, शरदभाऊ आचार्य मार्ग,**
**चेंबूर, मुंबई-४०००७१.** .... **उत्तरवादी**

**निर्णय**

**तक्रारीचा दिनांक : ५.०१.२०१०**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, तक्रारदार अनुपस्थित.**

तक्रारदार यांनी दि.५.१.२०१० रोजी त्यांच्या दि.१०.१०.२००९ च्या अर्जाच्या अनुषंगाने निरिक्षण करुन माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही या संदर्भात राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केलेली आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना त्यांच्या दि.१६.१०.०९ च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे दि.१३.११.०९ रोजी उत्तर दिलेले आहे. त्यामध्ये जनता कॉलनी(अणुशक्ती नगर) येथील झोपडपट्टी धारकांचे स्थलांतर/पुर्नवसन शहाजी नगर(चिता कँप) मध्ये करण्यात आले होते. या घटनेस ३० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. सबब या संदर्भातील सर्व कागदपत्रांच्या नस्ती(फाईल्स) या कार्यालयाच्या दप्तरी कसून शोध घेऊनही सध्या उपलब्ध झालेल्या नाहीत. यास्तव चिता कँप या वसाहतीचे स्थलांतर व पुनर्वसन याबाबतची कागदपत्रे आपणास पहाण्यासाठी देता येत नाहीत. सदर कागदपत्र उपलब्ध झाल्यास त्वरित कळविण्यात येईल असे कळविले होते. त्यानंतर पुन्हा दि.२४.१२.०९ रोजी शहाजी नगर,चिता कँप या वसाहतीच्या पुनर्वसनाबाबतची काही कागदपत्र या कार्यालयात उपलब्ध झाली आहेत. सदर कागदपत्रांची पहाणी करुन आपणास अभिप्रेत असलेल्या माहितीच्या प्रती आवश्यक शुल्क स्विकारुन देण्यात येतील. संदर्भिय अभिलेख तपासणीसाठी पहिल्या तासाची फी नसून तद्नंतरच्या प्रत्येक १५ मिनिटांसाठी रु.५/- अदा करावे लागतील. तपासणीसाठी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत उपरोक्त पत्त्यावर संपर्क साधावा असे कळविले असल्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन

दिलेली नाही असे म्हणता येणार नाही. त्याप्रमाणे तक्रारदार यांना दि.२८.१.२०१० रोजी संपूर्ण कागदपत्र दाखविण्यात आलेली आहेत व ती विनाशुल्क दाखविलेली आहेत असे तक्रारदार यांनीच लेखी दिलेले निवेदन आयोगाच्या निदर्शनास आणल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**
**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ६.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ार्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

# मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

**क्रमांक-मुमाआ/२०११/३०१०/तक्रार क्र. १६१/का.१**

**श्री. एस.के. नानगिया,**
**७०४, गोल्डन चॅरिएट सह.गृह. नि.संस्था(म.),**
**१३३/सेक्टर ९, चारकोप, कांदिवली(प.),**
**मुंबई-४०००६७.** .... **तक्रारदार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कुलसचिव,**
**मुंबई विद्यापीठ, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव,**
**मुंबई विद्यापीठ, मुंबई.** .... **उत्तरवादी**

**निर्णय**

**तक्रारीचा दिनांक : २३.११.२०१०**
**तक्रारदार,रजिस्ट्रार मुंबई विद्यापीठ उपस्थित.**

तक्रारदार यांनी दि.२५.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी तक्रार क्र.७१८/०१ मधील दि.३.५.२०१० च्या निर्णयाप्रमाणे चौकशीच्या संपूर्ण अहवालाची प्रत उपलब्ध झालेली नाही म्हणून तक्रार केलेली आहे. तक्रारदार यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, प्राध्यापक(प्रिन्सीपॉल) राजाध्यक्ष यांनी सदरच्या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करुन संपूर्ण अहवाल तत्कालीन उप कुलगुरु यांच्याकडे दाखल केला होता परंतु त्यांनी माहितीच्या अधिकारात माहिती मागीतल्यावर मात्र त्यांना फक्त त्या अहवालाचा ऑपरेटीव्ह पार्ट देण्यात आला आहे व त्या अहवालाचा पूर्वार्ध भाग मात्र देण्यात आलेला नाही व सदर अहवालाचा भाग लपविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे व सर्व माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा करतांना असे सांगितले की. जन माहिती अधिकारी यांच्याकडे तसेच आस्थापना विभागाकडे व परीक्षा विभागात तपास केला परंतु राजाध्यक्ष समितीचा संपूर्ण अहवाल कोणत्याही कार्यालयात उपलब्ध नाही. मा.कुलगुरुंच्या कार्यालयातसुध्दा विचारणा करण्यात आली परंतु कुलगुरुंच्या कार्यालयातून संपूर्ण अहवाल उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. तसेच श्री.राजाध्यक्ष, यांना अहवालाची पूर्ण प्रत उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात आली असता श्री.राजाध्यक्ष यांनी पत्राद्वारे कळविले की, पूर्ण अहवाल माजी कुलगुरु यांच्या नावे सिलबंद लिफाफ्यात त्यांनी स्वतः कुलगुरु कार्यालयात दिलेला आहे. श्री.राजाध्यक्ष यांनी पत्रात नमूद केल्यानुसार पूर्ण अहवाल परीक्षा मंडळापुढेही ठेवण्यात आला नव्हता. श्री.राजाध्यक्ष यांना पाठविलेल्या पत्राच्या अनुषंगाने परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग यांना पत्राद्वारे अहवालाबाबत विचारणा करण्यात आली असता त्यांनीसुध्दा परीक्षा विभागाकडे पूर्ण अहवाल उपलब्ध नसल्याचे पत्राद्वारे कळविले आहे.

एम.एस.राजाध्यक्ष समितीने विद्यापीठाकडे सादर केलेल्या अहवालातील फक्त कार्यक्षम(ऑपरेटीव्ह) भाग उपलब्ध असून त्याची छायांकित प्रत अपिलकर्ता अर्जदार यांना देण्यात आलेली आहे. तसेच सदर अहवालातील जबाबदार असणा-या दोषी व्यक्तींची वेतनवाढ बंद करण्यात आलेली होती. त्यामुळे त्यांना असत्य किंवा चुकीची माहिती देण्यात आलेली नाही. असे असले तरी तक्रारदार यांनी आयोगापुढे पुन्हा युक्तीवाद करतांना असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे तो अहवाल उपलब्ध नसेल तर कुलगुरु यांना पाचारण करुन त्यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. परंतु श्री.राजाध्यक्ष यांनी खुलाशात असे सांगितले आहे की, सदरचा अहवाल त्यांनी माजी कुलगुरु यांच्याकडे सादर केला होता व कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक श्री.गोपाल एस. यांनी दि.१९.४.२०११ रोजी प्रबंधकांना जे पत्र दिलेले आहे त्यामध्ये त्यांच्या सर्व सहकार्यांकडे त्यांनी चौकशी केली परंतु उपकुलगुरु यांच्या कार्यालयामध्ये सदरचा अहवाल आढळून येत नाही असे कळविलेले आहे. त्यामुळे उपकुलगुरु यांना पाचारण करणे योग्य नाही. तसेच अध्यक्ष श्री.एम.एन.राजाध्यक्ष समिती यांनी प्रबंधक यांना दिलेल्या पत्राची प्रत सुध्दा सादर केलेली आहे व त्यामुळे प्रबंधकांना पाचारण करण्यासाठी अंतरिम आदेश आयोगाने पारित केले होते. त्याप्रमाणे आज मुंबई विद्यापीठाचे प्रबंधक आयोगापुढे सुनावणीस हजर झाले आहेत. त्यांनी सुध्दा सदरचा संपूर्ण अहवाल हा विद्यापीठाच्या कोणत्याही कार्यालयात उपलब्ध नाही असे आयोगास सांगितले. परंतु त्या अहवालातील जो कार्यक्षम भाग आहे(ऑपरेटीव्ह पार्ट) त्यामध्ये दोषी अधिका-यांवर कारवाई करण्यास सुचविलेले आहे त्याप्रमाणे सर्व दोषी अधिका-यांच्या विरुध्द त्यांची वेतनवाढ थांबवण्याची कारवाई करण्यात आली होती. असे असल्यास सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**

**दिनांक ६.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ािर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

## मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

**क्रमांक-मुमाआ/२०११/तक्रार क्र. १०४/का.१**

**श्री. गोपीनाथ सखाराम अवसरे,**
**१/४९, ठोकरशी जिवराज बिल्डिंग,**
**टी.जे. रोड, शिवडी, मुंबई-४०००१५. .... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार,**
**तहसिलदार कार्यालय,हवेली,**
**ता.हवेली, जि. पुणे. .... उत्तरवादी**

**निर्णय**

**तक्रारीचा दिनांक : २६.०४.२०१०**
**तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित.**

तक्रारदार यांनी दि.२६.४.२०१० रोजी त्यांच्या अपील क्र.४०८९/०२ मधील दि.२५.१.२०१० च्या आदेशाप्रमाणे १५ दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही या कारणास्तव तक्रार केलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या खुलाशात तक्रारदार यांना१)क्र.माअ/एसआर/६३/० पुणे-२ दि.६.२.२००९, २)अभिलेखे/मा.अ./एसआर/१२४/२००९, दि.१८.३.२००९,३)क्र.अभिलेख/मा.अ./ एसआर/२००९, दि.१५.५.२००९ व ४)क्र.माअ/कावि/ /२०१० दि.१.६.२०१० रोजी माहिती पुरविलेली दिसून यते. तसेच वर नमूद केलेल्या पत्रांच्या सोबत गट नं.३०८ चे ७/१२ उता-यावर शाळेची नोंद कोणत्या कागदपत्रांच्या आधारे घेण्यात आली याबाबतचा कोणताही फेरफार झालेला नसल्याचे दिसून येत असून त्यासाठी गट नं.३०८ चे सन १९८६-८७ पासूनचे ७/१२ चे उतारे तसेच विवादग्रस्त प्रकरणाची नोंदवहीची प्रत आणि नमुना १४ ची प्रत अर्जदारास उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्याकरीता उपरोक्त पत्रांच्या छायांकित प्रती, पोस्ट दाखल्याच्या छायांकित प्रती सोबत दाखल केलेल्या आहत. आवक नोंदवहीची छायांकित प्रत सुध्दा दाखल केलेली आहे. त्यावरुन तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. तक्रारदार यांनीही माहिती उपलब्ध झाली हे मान्य केले परंतु तक्रारदार यांची तक्रार ही फेरफाराच्या संदर्भात दिसून येत असल्यामुळे अर्जदार यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या तरतुदींप्रमाणे संबंधित उपविभागीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केल्यास त्यांना त्या फेरफाराच्या संदर्भात न्याय मिळवून देता येईल. त्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक ६.५.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाि्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

# मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

**क्रमांक-मुमाआ/२०१०/तक्रार क्र. ३६०/का.१**

**डॉ.एस.एस.प्रभू,**
**बी-२३, उद्यानप्रभा, तेजपाल स्कीम रोड नं.२,**
**विलेपार्ले(पूर्व), मुंबई-४०००५१.** .... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी,**
**सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.** .... **उत्तरवादी**

## निर्णय

**तक्रारीचा दिनांक : १.१.२००९ व ४.०६.२०१०**
**तक्रारदार अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.**

तक्रारदार यांनी दि.३०.३.०९ रोजी त्यांच्या अपील क्र.२००८/३१०५/०२ मधील दि.१०.१२.२००८च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून आयोगाकडे तक्रार केलेली दिसून येते. सदरच्या तक्रारीच्या संदर्भात दि.२८.५.२००९ रोजी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी,श्रेणी-I यांनी श्री.एस.एस.प्रभू यांचे माहिती मिळणेसाठीचे वेगवेगळे अर्ज विचारात घेता त्यांना कार्यालयात समक्ष बोलावून दि.२९.८.२००८ रोजी त्यांच्याशी चर्चा करण्यात आली व चर्चेअंती सर्व मुद्यांचा विचार करुन कार्यालयात उपलब्ध असलेल्या धारीकेतील सर्व कागदपत्र त्यांना दि.१२.१.०९ रोजी देण्यात आलेली आहेत. त्याशिवाय इतर माहिती/माहितीची धारिका कार्यालयात उपलब्ध नाही असे त्यांना १२.१.२००९ च्या पत्राने कळविलेले आहे. संस्था पातळीवर असणारी माहिती देण्यासाठी कार्यालयाने दि.१२.१.०९ रोजी संस्थेचे प्रशासक यांना पत्र देवून सुचित केले आहे. श्री. प्रभू यांच्या तक्रारीबाबत सहकार खात्याकाडून आवश्यक ती कारवाई करुन प्रशासक नेमलेला आहे व संस्थेची वैधानिक चौकशी सुरु आहे. कार्यालयात उपलब्ध असलेली सर्व माहिती तक्रारदार यांना माहिती अधिकारी या नात्याने देण्यात आलेली आहे. आज पुन्हा तक्रारीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी खुलासा करतांना मा.मुख्य माहिती आयुक्त यांच्याकडे केलेल्या खुलाशानुसार त्यांनी दि.१३.५.२०१० रोजी तक्रार निकाली काढली असून आदेशाची प्रत सोबत जोडलेली आहे असे आयोगाच्या निदर्शनास आणले. जन माहिती अधिकारी,श्रेणी-I यांनी त्यांच्या खुलाशात तक्रारदार यांना त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली सर्व माहिती वेळोवेळी दिलेली आहे तरीही त्यांचे समाधान होत नाही असे म्हटलेले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालयात किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेल्या कागदपत्रांच्या/अभिलेख्यांच्या/दस्तऐवजांच्या स्वरुपात असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. कोणत्याही प्रकरणात कारवाई करुन माहिती मिळवून देणे अपेक्षित नाही त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली कागदपत्रांच्या स्वरुपातील सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामुळे व पूर्वी मुख्य माहिती आयुक्त यांनी तक्रार खारीज केलेली असल्यामुळे पुन्हा त्याच विषयाच्या संदर्भातील माहितीच्या संदर्भात तक्रार करणे योग्य नाही. यास्तव सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

**१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ६.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ार्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

# मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

**क्रमांक-मुमाआ/२०११/४६६-अे/तक्रार क्र. १५१/का.१**

**श्री.अरुण गणपत भोवर,**
**अे/६०३, साई आशिष, स्टेशन रोड,**
**विक्रोळी(पूर्व), मुंबई-४०००८३. .... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी(श्रेणी-II),**
**उप निबंधक सहकारी संस्था कार्यालय, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१. .... उत्तरवादी**

**निर्णय**

**तक्रारीचा दिनांक : ५.३.२०११**
**तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित.**

तक्रारदार यांनी दि.२३.३.२०१० रोजी त्यांच्या अपील क्र.५४७३/०२च्या निर्णयाप्रमाणे तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना वेळोवेळी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. कार्यालयामध्ये जी माहिती उपलब्ध आहे त्याबाबत सर्व नस्त्याही त्यांना दाखविलेल्या आहेत. तक्रारदार यांच्या तक्रारीप्रमाणे आत्तापर्यंत ३ प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली होती. तक्रारदार यांनी तक्रारीसोबत दाखल केलेल्या माहितीच्या दि.२.६.२००९च्या अर्जात मागीतलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील असे आदेश पारीत झाले होते. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी,उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई यांनी तक्रारदार यांना दि.२.६.२००९ च्या अर्जात मागीतलेली माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मान्य करण्यात येत असून तक्रारदार यांच्या दि.२.६.२००९च्या दाखल केलेल्या माहितीच्या अर्जामध्ये त्यांनी नमूद केलेल्या पत्रांच्या संदर्भात झालेल्या निर्णयाच्या छायांकित प्रती हे आदेश मिळाल्यापासून १० दिवसात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या.**
**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना या आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ६.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाणिर्याची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

# मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

**क्रमांक-मुमाआ/२०११/४६६/तक्रार क्र. १५०/का.१**

**श्री.अरुण गणपत भोवर,**
**अे/६०३, साई आशिष, स्टेशन रोड,**
**विक्रोळी(पूर्व), मुंबई-४०००८३. .... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**उप निबंधक सहकारी संस्था मुंबई मंडळ कार्यालय,**
**गृहनिर्माण भवन, कलानगर,वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१. .... उत्तरवादी**

**निर्णय**

**तक्रारीचा दिनांक : ५.३.२०११**
**तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित.**

तक्रारदार यांनी तक्रार क्र.९०/०२,८७५/०२ तसेच अपील क्र.५४०९/०२ च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे दि.५.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.५४०९ मधील निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही अशी तक्रार केलेली आहे. तक्रारदार यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी अनेकवेळा उपनिबंधक सहकारी संस्थेस सादर झालेला अहवाल मागीतला परंतु त्या अहवालाच्या प्रती अद्यापपर्यंत त्यांना मिळालेल्या नाहीत. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-II यांनी तक्रारदार यांना दि.३१.७.२००९ रोजी श्री.बी.पी.महाजन,प्राधिकृत अधिकारी यांची नेमणूक करुन त्यांनी २ वेळा उपनिबंधक सहकारी संस्थेला आपला अहवाल सादर केला त्या अहवालाच्या प्रती कार्यालयीन वेळेत संपर्क साधून उपलब्ध करुन घेऊ शेतात असे कळविले होते. तसेच संबंधित संस्थेच्या संदर्भातील सर्व कागदपत्र जी उपनिबंधक यांच्या कार्यालयात उपलब्ध आहेत ती तक्रारदार यांना वेळोवेळी दाखविण्यात आलेली आहेत व त्यातूनच त्यांनी त्या अहवालाच्या प्रती उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते. त्यावर पुन्हा तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्या अहवालाच्या प्रती अद्यापपर्यंत मिळालेल्या नाहीत व त्या कारणास्तव वारंवार तक्रार करणे भाग पडत आहे. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत तक्रारदार यांना श्री.बी.पी.महाजन,हिशोब तपासासाठी नियुक्ती केलेले प्राधिकृत अधिकारी यांनी २ वेळा सहकारी संस्थेला सादर केलेल्या अहवालाच्या छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्याव्यात. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहातील याची त्यांनी नोद घ्यावी.
२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना या आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक ६.५.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाािर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

# मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

**क्रमांक-मुमाआ/२०११/२६२/तक्रार क्र. १०७/का.१**

**श्री.रविंद्र मुरलीधर कालेकर,**
**अे/१०३, अमित दर्शन सोसायटी, दादाभाई रोड नं.३,**
**विलेपार्ले(पश्चिम), मुंबई-४०००५६. .... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,**
**विस्तारीत इमारत, ५वा मजला, महापालिका मार्ग, फोर्ट,**
**मुंबई-४०० ००१. .... उत्तरवादी**

## <u>निर्णय</u>

**तक्रारीचा दिनांक : १५.१२.२०१०**
**तक्रारदार, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.**

तक्रारदार यांनी अपील क्र.५२९०/०२ मधील दि.३०.१.२०१० च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीमध्ये माहिती पुरविण्यात आली आहे तसेच निरिक्षण केलेल्या नस्तीतील कागदपत्रांच्या छायांकित प्रतीदेखील मागणीनुसार पुरविण्यात आलेलया आहेत म्हणूनच पूर्वीचे दोन्हीही तक्रार अर्ज निकाली काढण्यात आलेले आहेत असे आयोगाकडून त्यांना कळविण्यात आले आहे. परंतु अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झालेली नसूनसुध्दा तक्रारी खारीज करण्यात आल्या आहेत याबद्दल आश्चर्य वाटते अशी तक्रारदार यांची तक्रार आहे. तसेच अपील सुनावणीच्या वेळेस मुख्य राज्य माहिती आयुक्तांनी जन माहिती अधिका-यांना अर्जदाराची विनंती का नाकरली हे तपासले गेलेले नाही तसेच कलम ७(१) अन्वये जन माहिती अधिका-यांनी विनिर्दिष्ट वेळेत माहिती सादर केली आहे की नाही हा मुद्दा उपस्थित करुनही त्याची दखल घेतली नाही अशाप्रकारची तक्रार आयोगापुढे केलेली आहे व माहिती उपलब्ध झालेली नाही त्यामुळेदोषी अधिका-यांवर दंडात्मक कारवाई करावी अशी विनंती केली आहे. परंतु सदरच्या तक्रारीच्या अनुषंगाने दोन वेळा सुनावणीची तारीख देऊनही तक्रारकर्ता हजर झ ाालेले नाहीत व माहिती अधिकारीसुध्दा उपस्थित झाले नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या नोटीसचा अवमान केला आहे असा निष्कर्ष काढावा लागतो.

तक्रारदार यांची तक्रार जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शास्ती का लादण्यात येऊ नये याकरीता असल्यामुळे ती मान्य करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) तक्रारदार यांची तक्रार मान्य करण्यात येत असून तक्रारदार यांना अपील क्र.५२९०/०२ च्या दि.३०.१.२०१० च्या निर्णयाप्रमाणे माहिती का उपलब्ध करुन देण्यात आली नाही व त्या संदर्भात त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत आयोगापुढे करावा. तसे न केल्यास त्यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी.**

**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ६.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाර्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्रमांक-मुमाआ/२०११/३०७/तक्रार क्र. १४९/का.१**

**श्री.रणछोडभाई चित्ताभाई सोळंकी,**
**मुक्काम खेरडा,पोस्ट अनास्तु, ता.करजन,**
**जि.वडोदरा, -३९१२४०. .... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी,**
**व्ही.एन.देसाई म्युनिसिपल जनरल हॉस्पीटल,**
**सांताक्रुझ(पूर्व), मुंबई-४०००५५. .... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**तक्रारीचा दिनांक : ११.०२.२०१०**
**तक्रारदार उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.**

तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार क्र.२००९/४४५/०२, तक्रार क्र.४७९०/०२ चा निर्णय अनुक्रमे दि.२८.१०.०९ व ३०.११.०९ रोजी झालेला असून तक्रारी खारीज करण्यात आलेल्या आहेत. तरीसुध्दा तक्रारदार यांनी आयोगाकडे पुन्हा दि.११.२.२०१० रोजी तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार आज सुनावणीस हजर आहेत. तक्रारदार यांनी त्यांना सेवानिवृत्तीवेतन लवकरात लवकर मंजूर व्हावे याबद्दल आयोगाकडे विनंती केलेली आहे.परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणी गुणवत्तेच्याबाबत निर्णय होण्यासाठी राज्य माहिती आयोगास आदेश देता येत नाहीत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेल्या कागदपत्रांच्या स्वरुपातील माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देता येतात. त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार मान्य करता येत नाही व ती निकाली काढण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**
**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ६.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०३७७/अपील क्रमांक ६६३७/२०१०**

**श्री. सुदिन रमेश प्रधान,**
**नालंदा को.ऑप.हौ.सो. बिल्डिंग नं.३४/१२३६,**
**सुभाषनगर, चेंबूर,मुंबई-४०००७१. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता(इ.प्र.),**
**इमारत प्रस्ताव पूर्व उपनगरे, राज लेगसी जवळ, पेपर मिल कंपाऊंड,**
**लाल बहादूर शास्त्री मार्ग, विक्रोळी, मुंबई-८३.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इ.प्र.),**
**इमारत प्रस्ताव पूर्व उपनगरे, राज लेगसी जवळ, पेपर मिल कंपाऊंड,**
**लाल बहादूर शास्त्री मार्ग, विक्रोळी, मुंबई-८३. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ९.५.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.७.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(बी.पी.ई.एस.) यांच्याकडे सुभाष नगर येथील इमारत क्र.८,९,१०,११,१२ यांच्या जागेवर बांधण्यात आलेल्या संक्रमण शिबीरा(ट्रांझीट कँप)च्या संदर्भात युनियनचे पदाधिकारी व बी.पी.ई.एस. यांच्यामध्ये जो करार झाला व इतर बाबी या सर्वांच्या प्रती मिळाव्यात, २)सुभाष नगर सी.टी.एस.नं.८३३ समोर आरएनए बिल्डर्सने फूटपाथ कव्हर करुन शेड ठोकली आहे व अतिक्रमण केले आहे. तिस-यांदा वारंवार असे अतिक्रमण करणा-या या बिल्डर विरुध्द आपण काय कायदेशीर कारवाई केली? ३)ट्रांझीट कँप जेव्हा युनियनच्या नावावर केला तेव्हा संबंधित इमारतीचे जी ना हरकत प्रमाणपत्र घेतली त्याची प्रत, माहितीचा कालावधी सन २००० ते २०१० अशी माहिती मागीतलेली दिसते.अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२२.७.२०१० रोजी उत्तर दिलले आहे. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि.२५.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले.प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, सुभाषनगर भागात आरएनए बिल्डर्सने फूटपाथवर जे अतिक्रमण केले तसेच ट्रॅन्झीट कँपच्या संदर्भात जी कारवाई इ

ालेली आहे त्याबाबत त्यांनी आत्तापर्यंत अनेक तक्रारी केल्या परंतु सदरच्या तक्रारींच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची चौकशी करण्यात येत नाही व त्यांना उत्तर पण देण्यात येत नाही. सदर ट्रांझीट कँप तोडण्याचे आदेश मिळावेत अशी माहिती मागीतली परंतु ते आदेश सुध्दा देण्यात येत नाहीत. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना दि.२२.७.२०१० रोजी उत्तर पाठवण्यात आले आहे. त्या अनुषंगाने अर्जदाराने संबंधित धारिणीचे निरिक्षण दि.१०.८.२०१० रोजी करुन त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांचे पृष्ठ क्रमांक नमूद करुन त्यासंबंधीची फी रु.८८/- मात्र भरणेविषयी कळविले. त्याप्रमाणे अर्जदाराने दि.११.८.२०१० रोजी फी चा भरणा म.न.पा.मध्ये करुन दि.१३.८.२०१० रोजी कागदपत्रांच्या प्रती प्राप्त झाल्याची पोच दिली आहे. अर्जदाराने अ.क्र.३ अन्वये विचारणा केलेली माहिती कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध नसल्यामुळे देता येणे शक्य नाही. यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. परंतु अपिलकर्ता यांनी आयोगापुढे जो युक्तिवाद केलेला आहे त्यावरुन त्यांची मूळ तक्रार ही कारवाई करण्यासंदर्भात आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणात कारवाई करण्याचे आदेश देण्याची तरतूद नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांच्या अपेक्षेप्रमाणे आयोग कोणत्याही प्रकारणात कारवाई करा असे आदेश देऊ शकत नाही. मात्र माहिती ही कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध होते व तशी ती अपिलकर्ता यांना उपलब्ध झालेली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार सुभाषनगर ही वसाहत म्हाडाची वसाहत असल्यामुळे त्याबाबतची माहिती म्हाडाकडून उपलब्ध होऊ शकेल. त्यामुळे अपिलकर्ता यांना म.न.पा.कडील माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**

**दिनांक ९.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९९५९/अपील क्रमांक ६६३८/२०१०**

**श्री. सैफी एफ.सरीया,**
**११२/१२४, अब्दुल्ला बिल्डिंग,जे.जे. हॉस्पीटल,**
**गेट नं.६च्या समोर, जेल रोड(नॉर्थ), मुंबई-४०००09. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक पालिका आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभाग, ७६,श्रीकांत पालकर मार्ग,**
**चंदनवाडी, मुंबई-४०० ००२.**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभाग, ७६,श्रीकांत पालकर मार्ग,**
**चंदनवाडी, मुंबई-४०० ००२. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ४.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ९.५.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१२.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि.१.१.२०१० व १७.२.२०१० च्या तक्रारीच्या अनुषंगाने महानगरपालिका,सी विभागाच्या कार्यक्षेत्रातील विनापरवाना कॅटरींग व्यवसाय करणा-यांविरुध्द काय कारवाइ केली याबद्दलची माहिती स्वत: घेणार असे नमूद करुन माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२०.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१९.७.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे असलेल्या अभिलेखांप्रमाणे माहिती पुरविलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात संबंधित अधिका-यांनी कोणत्याही प्रकारे प्रामाणिक चौकशी केलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या तक्रारीची चौकशी केलेली आहे व काही कॅटरर्सच्या विरुध्द कारवाईसुध्दा केलेली आहे. मात्र काही कॅटरर्स जेथे कोणत्याही प्रकारे कार्यवाही होत नसेल त्याबाबत कारवाई करणे शक्य नसल्यामुळे त्याबाबत कळविण्यात आलले नाही. जन माहिती अधिकारी डॉ.रविंद्र नारकर यांनी आयोगापुढे खुलासा दाखल केलेला असला तरी अपिलकर्ता यांना कोणत्या प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिली याबद्दल काहीही खुलासा केलेला नाही. यावरुन जन माहिती अधिकारी हे आयोगाच्या

कामकाजाबाबत गंभीर आहेत असे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांनी त्यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे जे आयोगापुढे सांगितले त्यावरुन जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती अपिलकर्ता यांना दिलेली नाही अशी आयोगाचीही खात्री झालेली आहे. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे जो तोंडी युक्तीवाद करण्यात आला तो समाधानकारक नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व ते शास्तीस पात्र आहेत. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.१.१.२०१०,१७.२.२०१० च्या तक्रारीच्या संदर्भात संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) जन माहिती अधिकारी हे आयोगाच्या कामकाजाबाबत गंभीर नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात यावी.**

**३) सदरच्या आदेशाची प्रत आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.**

**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**

**दिनांक ९.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ािर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**
**क्रमांक-मुमाआ/५०८२८/अपील क्रमांक ६६३९/२०१०**

**श्री. शेख महेबूब हुसेन,**
**मु.पो.बालमटाकळी, ता.शेवगाव,**
**जि.अहमदनगर. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप सचिव,**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,**
**मंत्रालय विस्तार भवन, मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,**
**मंत्रालय विस्तार भवन, मंत्रालय, मुंबई-४०००३२. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १०.०३.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ९.५.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

सदर प्रकरणी अपिलकर्ता यांनी अवर सचिव,प्राथमिक शिक्षण-१,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांच्याकडे १)अहमदनगर जिल्हापरिषद शिक्षण विभाग(प्राथमिक) जा.क्र.कार्या.-१/शिसेभ/२००८ अहमदनगर दि.२६.११.२००८ या पत्राबाबत २)मा.शिक्षण मंत्री यांचेकडील जा.क्र.१८३,दि.२५.११.२००९ या अर्जाबाबत ३)शालेय शिक्षण विभागाचे दि.१२ जुलै,२००१ चे परिपत्रकातील मुद्दा क्र.२१(२) च्या धोरणाबाबत, तसेच या मुद्यास अनुसरुन राज्यात शिक्षण सेवक योजनतून दिलेल्या सुटीबाबत-माहितीचा कालावधी १० मार्च २००० ते ३१ डिसेंबर,२००९, अशी एकूण ३ मुद्यांच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन द्यावी असे म्हटले आहे. सदरची माहिती ही नोंदणीकृत पोस्टाने मिळावी असेही नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१५.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी विषय क्र.१ नुसार शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची प्रत सोबत जोडली आहे. विषय क्र.२नुसार

आपण मा.मंत्री(शालेय शिक्षण) यांना लिहिलेले पत्र या कार्यासनास अद्याप प्राप्त झालेले नाही. विषय क्र.२ नुसार आपण नमुद केलेल्या शासन निर्णय दि.१२ जुलै,२००१ मधील मुद्दा क्र.२१(२) वेतनश्रेणी देण्याबाबत कोणताही आदेश नमुद केलेला नाही. तसेच आपण रु.५०/- ची मनीऑर्डर पाठविलेली आहे. ही बाब माहितीच्या अधिकारात अपेक्षित नाही. एका प्रतीची झेरॉक्स रु.२/- + शिघ्र टपाल खर्च रु.२५/- असे एकूण रु.२७/- एवढा खर्च आपणास आलेला आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.२५.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.निरंक मार्च,२०१० रोजी देण्यात आला असून अपिलार्थी यांना मूळ अर्जातील मुद्दा क्र.२च्या संदर्भात मा.मंत्री(शालेय शिक्षण)महोदयांकडे प्राप्त झालेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती १५ दिवसात उपलब्ध करुन द्यावी, शासन निर्णय दि.१२ जुलै,२००१ मधील क्र.२१(२) च्या संदर्भात स्पष्टीकरण द्यावे, मुद्दा क्र.३, दि.१२ जुलै,२००१ मध्ये नमूद केल्यानुसार बीड जिल्हा सोडून राज्यातील इतर जिल्हयांची माहिती अर्जदारास परस्पर उपलब्ध करुन द्यावी असेही त्यांना कळविण्यात यावे. तसेच बीड जिल्हा सोडून इतर जिल्हयातील सर्व शिक्षणाधिका-यांना अर्जदारास वरील माहिती तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात यावे असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु सदरच्या आदेशाप्रमाणे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता सुनावणीस हजर असून त्यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली ती अपूर्ण आहे व प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जे आदेश दिलेले आहेत त्या आदेशाप्रमाणे अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी सुनावणीस गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा कोणतेही कागदपत्र आयोगापुढे दाखल केलेली नाहीत व ते हजरही झ ालेले नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यानंतर कोणत्या प्रकारची कार्यवाही केली याबद्दल आयोगापुढे कोणतेही कागदपत्र नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये शास्ती लादण्यापूर्वी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या**

आदेशाप्रमाणे तीनही मुद्यांची माहिती रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१)अन्वये रु.५,०००/- ची शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी आयोगापुढे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत समक्ष करावा. तसेच आयोगापुढे सुनावणीस ते का उपस्थित राहिले नाहीत याबद्दलही खुलासा करण्यात यावा. तसे न केल्यास त्यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात येईल व ती त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसूल करण्याचे आदेश देण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक ९.५.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाि र्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०४४१/अपील क्रमांक ६६३६/२०१०**

**श्रीमती उन्नती त्रिपाठी,**
**२०२, लोकसागर, सेक्टर १४,**
**वाशी, नवी मुंबई-४००७०३. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा पालीस उप आयुक्त,**
**परिमंडळ-९, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त,**
**पश्चिम प्रादेशिक विभाग व पश्चिम नियंत्रण कक्ष,**
**वांद्रे(प.), मुंबई-४०००५०. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १९.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ९.५.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२५.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,बांद्रा(प.) यांच्याकडे २००८च्या कालावधीतील २ मृत्यू प्रकरणी सहार पोलीस्ट स्टेशन यांनी हाताळलेल्या केसबद्दल माहिती १)मिनाक्षी चिन्नु २) फातिमा शेख मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती स्पीडपोस्टाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२७.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२७.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे या कारणास्तव सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्या संबंधीत मृत्युच्या प्रकरणी त्यांच्या क्षेत्रामध्ये काम करतात व त्यावेळेस त्या संपूर्ण केसच्या संदर्भात हजर होत्या. त्या दोन्ही मृत्यूंच्या संदर्भात त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक झाले असते परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम ८(१)(ज) व कलम ८(१)(एच) अन्वये अपमृत्यू नोंद क्र.६७/०८ ची माहिती सहार पोलीस ठाणेकडून नाकारण्यात येत आहे तसेच अपमृत्यू नोंद क्र.४८०८ ची नोंद करण्यात आली आहे. नमूद अपमृत्यूवरुन गु.र.क्र.३८२/०८ कलम ३०६,३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा

नोंद करण्यात आला असून नमूद गुन्हयात दोन आरोपी व एक बाल अपचारी यांना अटक करण्यात आली असून दोन आरोपी यांचे विरोधात दोषारोपपत्र C.C. No.६५/PW/०९ दि.७.१.०९ अन्वये महानगर दंडाधिकारी, २२ वे न्यायालय, मुंबई यांचे न्यायालयात सादर करण्यात आले आहे. तसेच बाल अपचारी यांचे विरोधात दोषारोपपत्र CC No.२९/JW/०९ दि.२.११.०९ अन्वये बाल न्यायालय, डोंगरी, मुंबई येथे सादर करण्यात आले आहे. तरी आपणास आवश्यक कागदपत्र मा. न्यायालयाकडून प्राप्त करुन घेण्यात यावी असे त्यांना कळविण्यात आले आहे. त्यावर जन माहिती अधिका-यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ज्यावेळेस अपिलकर्ता यांनी माहिती मागीतली त्यावेळेस चौकशी सुरु होती/तपास सुरु होता व त्यामुळे तपासावर कोणत्याही प्रकारचा विपरित परिणाम होऊ नये म्हणून माहिती नाकारण्यात आली होती. मात्र त्यानंतर अपमृत्यू झालेल्या मिनाक्षी चिन्नु यांच्याबाबत यांचे वडील श्री.रामास्वामी मुतल्ला यांनी माहिती उपलब्ध करुन देऊ नये अशी हरकत घेतली असल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही. दुस-या अपमृत्यूबाबत मा.न्यायालयातील प्रकरण संपलेले आहे त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देता येईल. त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की. त्या संपूर्ण प्रकरणात सुरुवातीपासून उपस्थित असल्यामुळे श्री.रामास्वामी मुतल्ला यांनी हरकत घेतली असली तरी ती माहिती उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही. परंतु त्याबाबत पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्रयस्थ पक्षाने हरकत घेतल्यानंतर जर माहिती उपलब्ध करुन दिली तर त्या संदर्भात त्रयस्थ पक्ष पुन्हा हरकत घेऊ शकतो किंवा न्यायालयातही जाऊ शकतो. तसेच अर्जदाराचा नमूद गुन्हयाशी किंवा अपमृत्यूशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. तसेच गु.र.क्र.३८२/०८ मधील कागदपत्र मा. महानगर दंडाधिकारी न्यायालयात सादर असल्यामुळे अर्जदार यांनी मा.महानगर दंडाधिकारी न्यायालय, मुंबई येथे विनंती अर्ज करुन सदर कागदपत्र प्राप्त करुन घ्यावीत असे जन माहिती अधिका-यांनी सांगितले.

अधिनियमाच्या कलम ११(१) अन्वये त्रयस्थ पक्षाने म्हणजे मिनाक्षी चिन्नु यांचे वडिल रामास्वामी मुतल्ला यांनी तिच्या मृत्यूच्या संदर्भात कागदपत्र उपलब्ध करुन देण्यास हरकत घेतलेली असल्यामुळे सदरची कागदपत्र उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होणार नाही. परंतु गु.र.क.३८२/०८ च्या संदर्भात मा.महानगर दंडाधिकारी न्यायालयातील कार्यवाही संपलेली असल्यामुळे पोलीस कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. अधिनियमाच्या कलम ८(१)(ख)अन्वये न्यायालय किंवा न्यायाधिकरणाने जी माहिती प्रकाशित करण्यात स्पष्टपणे मनाई केलेली आहे किंवा जी प्रकट केल्यामुळे न्यायालयाचा अवमान होऊ शकेल अशी माहिती प्रकट करण्यास अपवाद करण्यात आला आहे. सदर प्रकरणी मागीतलेली माहिती जरी न्याय प्रविष्ठ असेल व न्यायालयाच्या अधिनियमाच्या कलम ८(१)(ख) अन्वये प्रकट करण्यास मनाई केलेली नसेल तर माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. त्याप्रमाणे पोलीस कार्यालयातील गु.र.क्र.३८२(०८) मधील माहिती ही अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना ग.र.क्र.३८२/०९ मधील त्यांच्या**

**दि.२५.६.२०१० च्या अर्जात मागीतलेली माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**
२) **अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ९.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाािर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४०७/अपील क्रमांक ६६०५/२०१०**
**क्रमांक-मुमाआ/४०८/अपील क्रमांक ६६०६/२०१०**
**क्रमांक-मुमाआ/अपील क्रमांक ६६१७ ते ६६२४/२०१०**

**श्री.पांडुरंग वासुदेव ढोके,**
**श्री.पांडुरंग वासुदेव ढोके,**
**श्री.विजय लक्ष्मण तळेकर,**
**श्री.राजेश कृष्णा गोसावी,**
**श्री.अशोक प्रभाकर नाचणकर,**
**श्री.रोनाल्ड फ्रान्सीस अल्बुकर्क,**
**श्रीमती पुजा प्रभाकर साटम,**
**श्री.जानराव दत्ताजीराव जाधव,**
**श्री.अनंत राजाभाऊ गांगुर्डे,**
**श्री.संजय गोविंद साळवी ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रमुख कर्मचारी अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,प्रमुख कर्मचारी अधिकारी यांचे कार्यालय,**
**सामान्य प्रशासन विभाग, जुनी इमारत, दुसरा मजला,महापालीका मुख्यालय,**
**महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहप्रमुख कर्मचारी अधिकारी(आस्था.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,प्रमुख कर्मचारी अधिकारी यांचे कार्यालय,**
**सामान्य प्रशासन विभाग, जुनी इमारत, दुसरा मजला,महापालीका मुख्यालय,**
**महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ०७.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १९.०४.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता श्री.पांडुरंग वासुदेव ढोके,श्री.जानराव दत्ताजीराव जाधव,श्रीमती पूजा प्रभाकर साटम, श्री.रोनाल्ड फ्रान्सीस अल्बुकर्क, श्री.अशोक प्रभाकर नाचणकर, श्री.राजेश कृष्णा गोसावी,श्री.विजय लक्ष्मण तळेकर,श्री.अनंत राजाभाऊ गांगुर्डे,श्री.संजय गोविंद साळवी यांनी दि.१०.९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सह प्रमुख कर्मचारी(आस्थापना),सा.प्र.वि.(परीक्षा विभाग),बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे १)दुकाने व आस्थापना खात्याच्या दि.२३.७.२०१०

रोजी झालेल्या पेपर-१ च्या आदर्श उत्तरपत्रिकेची प्रमाणित प्रत व बैठक क्र.१४ च्या उत्तरपत्रिकेची प्रमाणित प्रत मिळणेबाबत, माहितीचा कालावधी १ जुलै,२०१० ते ३१ जुलै,२०१० तसेच २)पेपर क्र.१ मध्ये उत्तीर्ण झालेल्या परिक्षार्थी कर्मचा-यांच्या तपासलेल्या उत्तरपत्रिकेच्या प्रमाणित प्रती मिळणेबाबत, माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद करुन माहिती मागीतलेली दिसून येते. तोच अर्ज त्यांनी पुन्हा दि.१६.८.२०१० रोजी दिलेला आहे. इतर अपिलार्थी यांनी दि.१५.१.२०११ रोजी वरीलप्रमाणे संबंधित माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागणेबाबत अर्ज केलेले आहेत. सदरच्या अर्जांच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सह प्रमुख कर्मचारी अधिकारी(आस्थापना) यांनी दि.१६.८.२०१० रोजी व २९.१.२०११ रोजी सर्व अर्जदारांनी केलेली उत्तरपत्रिकांच्या प्रमाणित प्रती देण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१)(च) मधील तरतुदीनुसार तसेच प्रचलित धोरणानुसार मान्य करता येत नाही असे कळविलेले दिसून येते.

२. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे सर्व अपिलकर्ता हयांनी दि.२४.८.२०१० व १०.२.२०११ रोजी प्रथम अपीले दाखल केलेली दिसून येतात. सर्व प्रथम अपीलांच्या संदर्भात दि.२३.९.२०१० रोजी दि.५.३.२०११ रोजी अपिलकर्त्यांनी मागीतलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नसल्यामुळे तसेच महानगरपालिकेच्या नियमानुसार देता येत नाही व उत्तरपत्रिकेची प्रमाणित प्रत अद्यापपर्यंत कोणत्याही सक्षम अधिका-यांकडून मान्यता प्राप्त झाली नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तरास सहमती दर्शवून अपीलीय अधिकारी यांनी सर्व अपीले निकाली काढलेली दिसून येतात.

३. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे सर्व अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपील क्र.६६०५,६६०६(पूर्वीचा अपील क्र.६४५६ व ६४५७) यांची सुनावणी दि.२३.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या समोर झाली होती. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती नाकारतांना श्रीमती त्रिसा ईरीश विरुध्द केंद्रीय जन माहिती अधिकारी, केरळ,पो.त्रिवेंद्रम यांच्या दि.६.२.२००६ रोजी अपील क्र.PCPB/A-2/CIC/2006 च्या निकालाचा संदर्भ दिला आहे. मात्र त्या निकालाच्या संदर्भात मा.उच्च न्यायालय, केरळ यांच्या दि.३०.८.२०१० रोजी दिलेला निर्णय अपिलकर्ता यांना सादर केला होता. सदर न्यायालयाचा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांना माहिती उपलब्ध नसल्याने त्या निर्णयाची प्रत त्यांना देण्यात यावी असे आदेश देऊन सुनावणी पुढील तारखेपर्यंत पुढे ढकलण्यात येत आहे असे मा.राज्य माहिती आयुक्त यांनी जाहीर केले. त्यानंतर अपिलकर्ता श्री.ढोके व इतर अपिलकर्ता यांची सर्व अपीले एकाच विषयाची माहिती मागीतलेली असल्याने दि.१९.४.२०११ रोजी घेण्यात आली.

४. अपिलकर्ता यांनी लेखी युक्तीवाद साद केला आहे. तसेच तोंडी युक्तीवाद करतांनासुध्दा त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, उत्तरपत्रिका उपलब्ध करुन देऊ नये अशाप्रकारची कोणतीही तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींमध्ये नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम २(त्र)(४)अन्वये जी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात/हस्ताक्षरात लिहून साठविलेली माहिती याबाबत दि.७.१.२०१० रोजी अपिल क्र.CIC/WB/A/२००९/०००६१५(श्री.विनोद कुमार विरुध्द न्यू पोलीस लाईन, किंग्जले कँप) अन्वये ‘‘आदर्श उत्तरपत्रिका’’ही माहितीच्या व्याख्येत येत असून ती अपिलकर्त्याला उपलब्ध करुन देण्यात यावी. आदर्श उत्तरपत्रिकेवरुन प्रशासनाला आदर्श उत्तरे कशाप्रकारे अभिप्रेत आहेत/होती

याचा उमेदवाराला बोध घेता येईल. परीक्षार्थी आणि प्रशासन(परीक्षा मंडळ/विभाग) यांमधील विश्वासाधित संबंध हे तपासलेल्या उत्तरपत्रिका या सार्वजनिक माहिती म्हणून संबोधण्यात येऊन प्रत्ये परीक्षार्थिला किंवा अन्य कोणत्याही त्रयस्थ व्यक्तिला अवलोकनार्थ खुल्या केल्या जातील तेव्हा अधिक दृढ,स्पष्ट व निशःक होतील.

"An answer sheet is not a private parchment supplied by a third party. It is a public paper in the custody of a public authority i.e.M.C.G.M. The answer sheets or the marks obtained by candidated are not their private possessions, but sacrosanct record impacting public life and also the fate and future of the competitors. Nothing in the administrative reals is personal or private those who choose to enter public affairs, must learn to live by public scrutiny."

कलम ८(१)(च)चे संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात चर्चा केली असता एखाद्या कोणत्याही बढतीच्या/पदोन्नतीच्या खात्यांतर्गत परीक्षेच्या पेपर तपासणीतील भ्रष्टाचारासंदर्भात किंवा चुकीच्या/अन्यायकारक पेपरतपासणी संदर्भात संसदेत किंवा राज्य विधानमंडळात प्रश्न उपस्थित केला गेल्यास, संबंधित प्राधिकरण त्यास उत्तरपत्रिका देण्याचे नाकारु शकत नाही अशा स्थितीत परीक्षार्थीने अथवा कोणत्याही व्यक्तीने उत्तरपत्रिका मागीतल्यास संबंधित प्राधिकरण म्हणजेच बृहन्मुंबई म.न.पा. उत्तरपत्रिका देण्याचे नाकारु शकत नाही.

There is no provision in the Act to deny information on the ground that the supply of the information would disproportionately divert the resources of the public authority.

The difficulties a public authority may encounter in the matter of supply of information are no grounds to deny the information, if that information is available and not exempted from disclosure. Whatever be the difficulties, unless the information is exempt from disclosure, the public authority is bound to disclose the same. The information is voluminous, if all candidated apply for the information with the available infrastructure it may not be possible to cope up with the request, the cuthority will have to depute additional manpower to collect and supply the information etc. are not reasons available to the public authority to deny information to a citizen who applies for the same. The public Authority can only insist on reasonable fees for supply of the information as per rules prescribed for the same. Even otherwise it is idle for a public authority to assume that only these candidates dissatisfied with the results would apply for copies of the answer sheets, which would be a small fraction of the total number, if the evaluation is fair and proper and if the valuation is largely unfair and improper, then it is in public interest that the truth come out, whatever be the difficulties. Therefore unless the public authority has something to hide, they should not worry about those difficulties,which in any event are not likely to occur in the normal course.

उत्तरपत्रिका तपासण्यात अन्याय झाला आहे किंवा नाही हे उत्तरपत्रिका हातात मिळाल्यानंतरच समजू शकते. अनुत्तिर्ण् होणा-या प्रत्येक कर्मचा-याला आपल्यावर अन्याय झाला आहे असे वाटते पण

हातात उत्तरपत्रिका मिळाल्याशिवाय तो त्याच्यावर झालेला अन्याय वरिष्ठांसमोर सिध्द करु शकत नाही.

मुंबई महानगरपालिकेने(प्राधिकरणाने) कोरी उत्तरपत्रिका आणि प्रश्नपत्रिका पुरविली. परीक्षार्थींनी कोरी उत्तरपत्रिका त्यांच्या घरुन आणली नव्हती म्हणजेच ती उत्तरपत्रिका सार्वजनिक मालमत्ता होती हे मान्य करावे लागेल.परीक्षार्थींनी त्यावर उत्तरे लिहिली त्यानतर प्राधिकरणाने त्या लिहिलेल्या उत्तरपत्रिका तपासून निर्णय लावण्यासाठी ताब्यात घेतल्या. तपासून निर्णय जाहीर होईपर्यंत त्या पेपरवर लिहिलेला सारा मजकूर “गुपित”या व्याख्येत येत होता. संबंधित परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर त्रयस्थ परीक्षार्थींचे गुपित सुध्दा जनतेसमोर खुले झाले होते म्हणजेच माझ्या उत्तरपत्रिकेसह माझ्या सर्व सहका-यांच्या उत्तरपत्रिका या सार्वजनिक दस्तऐवज म्हणून विश्वस्त या नात्याने प्राधिकरणाच्या परीक्षा विभागाच्या ताब्यात देण्यात आल्या. मला माझ्या उत्तरपत्रिकेत लिहिलेल्या उत्तरांनी उत्तीर्ण होण्याची खात्री असतांना जेव्हा अनुत्तीर्ण असा निर्णय हाती येतो तेव्हा माझ्यावर अन्याय झाल्याची भावना जागृत होते आणि अशावेळी मी मागणी केलेली माझी व इतर सहका-यांच्या उत्तरपत्रिका देण्यासाठी प्राधिकरण नकार देते तेव्हा विश्वासाश्रित संबंधांना तडा जातो.

इतर सहका-यांनी लिहिलेली उत्तरे अचूक व आदर्श असतील तसेच सर्वांना झालेले गुणदान न्याय्य असेल तर माझ्या इतर सहका-याच्या (त्रयस्थ व्यक्ती) तपासलेल्या उत्तरपत्रिका माझ्या माहितीसाठी, प्रबोधनासाठी, मार्गदशक ठरतील त्यामुळे इतर सहका-यांच्या उत्तरपत्रिका मला माहिती म्हणून देण्यास प्रशासनाची कोणतीही हरकत नसावी कारण यातूनच प्रशासनाची,परीक्षा मंडळाचा पारदर्शिपणा,प्रामाणिकपणार, योग्य न्यायदान व्यापक सार्वजनिक हित साधणारे असेल. Once the result has been declaired, fairness of the competitive process itself makes it imperative to lift the veil of secrecy and confidentiality. Openness is the essence of fairness an answersheets is not a private property supplied by the public authority(M.C.G.M.)It is a public document in the custody of a public authority conducting an examination for a public service.

संदर्भ-१) दिल्ली उच्च न्यायालयाचा दि.३०.४.२००९ चा याचिका क्र.WP(c) ८५२९/२००९ (ICAI v/s CIC)

२) पटना उच्च न्यायालयाचा दि.११.१२.२००८ चा याचिका क्र.CWJC No.१६०६६५/२००८(BPSC v/s SIC & Ors)

३)केरळ उच्च न्यायालयाचा दि.२९.२.२००८ चा याचिका क्र.WP-No.३०९६३/ २००६(J) आणि दि.३०.८.२०१० चा याचिका क्र. WP(c)No.-६५३२/२००६(c) (Trisa Irish v/s CPIO Dept. of Post,Govt. of India & others) तसेच केंद्रीय महिती आयोगाच्या खंडपीठाचा दि.२३.४.२००७ चा कंप्लेंट केस नं.CIC/WB/C२०००६/००२२३, Appeal Nos.CIC/WB/A/२००६/००४६९ & ००३९४, Appeal Nos.CIC/OK/A/२००६/ OC२६६/०००५८/०००६६/००३१५.

वरील सर्व बाबी विचारात घेऊन माझ्या माहितीप्रमाणे माझ्यावर झालेल्या अन्यायाला दूर करण्यासाठी व माझ्यासारख्या इतर सहका-यांवर होणा-या/झालेल्या अन्यायाला दूर करण्यासाठी व्यापक लोकहिताच्या दृष्टीने भविष्यात प्रत्येकाला त्यांची उत्तरपत्रिका मिळावी यादृष्टीने मी

मागीतलेली माहिती मला देण्यासाठी आपण संबंधित प्राधिकरणास आदेश द्वावेत अशी मी विनंती करतो.

मुद्दा क्र.३ - पेपर क्र.१मध्ये उत्तीर्ण झालेल्या परीक्षार्थी कर्मचा-यांच्या तपासलेल्या उत्तरपत्रिकेच्या प्रमाणित प्रती मिळण्याबाबत.

वरिष्ठ निरीक्षक, दुकाने व आस्थापना या पदाच्या परीक्षेकरीता दि.२३ जुलै,२०१० रोजी पेपर क्र.१ करीता एकूण ३१ परीक्षार्थी कर्मचारी बसले होत व त्यापैकी एकूण १५ परीक्षार्थी उत्तीर्ण झाले आहेत. पुर्नमोजणीनंतर ४२ ऐवजी ५० गुण मिळवून ०१

मागीतलेली माहिती अतिशय मोजकी असून ती माहिती या स्वरुपात सहज उपलब्ध आहे. प्रश्न क्र.२ मध्ये युक्तीवाद केल्याप्रमाणे, सदर माहिती ही त्रयस्थ खाजगी नसून सार्वजनिक स्वरुपाची आहे. वैयक्तिक हिताची नसून ती व्यापक सार्वजनिक हिताची आहे. तसेच ती प्राधिकरणावर अतिरिक्त कामाचा बोजा टाकणारी नसून मोजक्या/माफक स्वरुपाची आहे. उत्तीर्ण झालेल्या परीक्षार्थींची आदर्श उत्तरे ही व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आदर्श उत्तरपत्रिका म्हणून भविष्यात सर्वांना मार्गदर्शक ठरणारी माहिती म्हणून उपयुक्त पडणारी आहे. परिक्षकाला आदर्श उत्तरे म्हणून कशी लिहावीत याचा नमुना सर्वांच्याकरीता उपलब्ध असेल. भविष्यात उत्तरे लिहितांना मागितलेल्या उत्तरपत्रिकांचा मार्गदर्शक म्हणून उपयोग होऊन स्वत:मध्ये योग्य तो बदल करता येईल. अधिनियमाद्वारे विहित केलेले शुल्क भरण्यास मी तयार असून आपण प्राधिकरणास तशा स्वरुपाचे आदेश द्यावेत ही विनंती.

मागीतलेली संदर्भाधीन माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२१.८.२०१० च्या क्र.साप्रवि/४४२/मप, व दि.१६.८.२०१० च्या क्र.साप्रवि/४१६/मप अन्वये तसेच अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.२७.९.२०१० च्या अपिल क्र.साप्रवि/४६५/मप अन्वये "महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार व नियमानुसार देता येत नाही" असे दिशाभूल करणारे व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये,तरतूद असल्याप्रमाणे कोणतेही संयुक्तिक कारण किंवा कलमाचा उल्लेख करुन न देता उक्त अधिनियमाच्या कलम-२०(१) आणि २०(२) चा भंग केला आहे.

संदर्भ म्हणून अपीलीय अधिका-यांनी दिलेल्या दि.६.२.२००६ चे अर्पिल क्र.पीसीपीवी/अे-२१ सीआयसी/२००६ च्या विरोधातील केरळ उच्च न्यायालयाचा दि.३०.८.२०१० चा निकाल आपण विचारात घ्यावा तसेच अन्य राज्यातील मा.उच्च न्यायालयांचे, केंद्रीय मुख्य माहिती आयोगाचे खंडपीठांचे,मुख्य राज्य माहिती आयुक्तांचे संदर्भ सोबत म्हणून जोडलेले सन २००७ पासून सप्टेंबर,२०१० पर्यंतचे सर्व निकाल एकूण १७, विचारात घेऊन एक सर्वसमावेशक व महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील ग्रामपंचायतीपासून वरिष्ठ पातळीवर होणा-या विविध प्रकारच्या कर्मचारी, अधिकारी यांची नियुक्ती किंवा बढती संबंधातील परीक्षांना व्यापक लोकहिताच्यादृष्टीने, भविष्यात कोणत्याही कर्मचा-याला अपिलात न जाता योग्य न्याय मिळेल असा निर्णय देऊन मी मुद्दा क्र.१ ते ५ मध्ये मागीतलेली माहिती देण्याचे आदेश संबंधितांना द्यावेत अशी महोदयांस विनंती आहे.

जन माहिती अधिकारी यांनी दि.२१.८.२०१० रोजी व अपिलीय अधिकारी यांनी दि.२७.९.२०१० रोजी दिलेला निर्णय, "आपण मागीतलेली माहिती महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार व नियमानुसार देता येत नाही" याला अनुसरुन मी दि.७.१०.२०१० च्या अर्जान्वये,

परीक्षेसंदर्भात महानगरपालिकेच्या धोरणाची किंवा नियमपुस्तिकेची प्रत माहिती म्हणून मागीतली असता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.१४.१०.२०१० च्या क्र.सा.प्र.वि./६२०/मप अन्वये, ''परीक्षा आयोजित करण्यापासून ते निकाल घोषित करण्यापर्यंतच्या कार्यवाहीबाबत महानगरपालिकेने कोणतीही नियमपुस्तिका तयार केलेली नाही.'' असे उत्तर दिले याचाच अर्थ यापूर्वी मला अपिलात जाण्यासाठी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देऊन उक्त अधिनियमाच्या अंमलबजावणीची एकप्रकारे चेष्टा करुन कलम-२०(१) व (२) चा अवमानच केला आहे.

५. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दि.२३.१२.०८ रोजी अतिरिक्त आयुक्त(पूर्व उपनगरे) यांच्या अध्यक्षतेखाली झ ालेल्या परीक्षा मंडळाच्या बैठकीमध्ये विभागीय परीक्षेच्या संदर्भात निर्णय घेतलेला असून त्यामध्ये विषय क्रमांक ३ मधील(क्र.२ मध्ये) मुख्य लिपिक, ले.प. व ले.स.(प्रमुख लेखापाल),वरिष्ठ निरिक्षक(अनुज्ञापन) परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या कमचा-यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत उत्तरपत्रिकेची मागणी केल्याबाबत अध्यक्ष,परीक्षा मंडळ यांनी प्रचलित धोरणानुसार कोणत्याही कर्मचा-यास त्यांच्या उत्तरपत्रिकेची प्रत देण्यात येऊ नये अशा स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. मात्र उत्तरपत्रिकेची पुर्नमोजणी करण्याबाबत मुख्यालयातील प्रशासकीय अधिका-यांची नेमणूक करण्यात यावी असाही निर्णय घे्ण्यात आलेला आहे व या निर्णयाप्रमाणेच सर्व अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी उत्तरपत्रिकांची छायांकित प्रत प्रचलित धोरणानुसार उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविले होते. उत्तरपत्रिका तपासतांना परिक्षक व परिक्षा मंडळ यांच्यामध्ये एक विश्वासार्ह नाते तयार झाले असते व त्या विश्वासानेच प्रामाणिकपणे उत्तरपत्रिका तपासण्यात आलेल्या असतात व त्यामुळे जर उत्तरपत्रिका उपलब्ध करुन दिल्यास परिक्षकांच्या संदर्भात विनाकारण गैरसमज निर्माण होतील व पुढे उत्तरपत्रिका तपासण्यासाठी परिक्षक उपलब्ध होऊ शकणार नाहीत. त्यामुळे अधिनियमाच्या कलम ८(१)(ञ) अन्वये कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक हित नसल्यामुळे सदरच्या उत्तरपत्रिका उपलब्ध करुन देण्यात येऊ नये अशी आयोगास विनंती आहे.

६. सार्वजनिक प्राधिकरणात पदोन्नतीच्या संदर्भात ज्या विभागीय परीक्षा घेतल्या जातात त्या अर्थातच सार्वजनिक सेवेमध्ये कुशलता/कार्यक्षमता यावी यादृष्टीने घेतल्या जातात व त्यामुळे उमेदवारांच्या म्हणजेच पर्यायाने अधिका-यांच्या उच्च पदावरील जबाबदारीसुध्दा वाढते. अशा वेळेस सदरच्या उमेदवाराबाबत कार्यक्षमता असण्याच्या संदर्भात निवडपध्दतीमध्ये पारदर्शकता असणे आवश्यक आहे. अन्यथा प्रशासनामध्ये ज्या कार्यक्षमतेची आवश्यकता असते त्या कार्यक्षमतेलाच बाधा येण्याची शक्यता निर्माण होऊ शकते व त्याकरीता विभागीय परीक्षांमध्येही नि:पक्षपातीपणा व समतोलपणा ठेवणे आवश्यक आहे. परिक्षांमध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता झालेली नाही याबद्दलची खात्री होण्याकरीता पारदर्शकता आवश्यक आहे. विभागीय परीक्षांना बसलेले उमेदवार मर्यादित असल्यामुळे त्या परीक्षांच्या संदर्भातील उत्तरपत्रिका त्या परिक्षार्थीस उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास सार्वजनिक प्राधिकरणाच्या यंत्रणेवर कोणत्याही प्रकारचा भार पडण्याची शक्यता नाही.

७. काही अपिलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी उत्तर देतांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कोणत्याही कलमाचा आधार घेऊन माहिती नाकारलेली नाही तर म.न.पा.च्या प्रचलित धोरणानुसार माहिती देता येणार नाही असे उत्तर दिलेले आहे. माहितीचा

अधिकार अधिनियम २००५ अंमलात आल्यानंतर अधिनियमाच्या कलम २२ प्रमाणे त्या अधिनियमाच्या सर्व तरतुदींना अधिभावी परिणाम दिलेला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींशी कोणत्याही अधिनियम/नियम, आदेश किंवा धोरणाशी विसंगत असणा-या सर्व तरतुदी या निष्प्रभ ठरतात आणि माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी या प्रभावी ठरतात. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा 'संसदेचा' अधिनियम असल्यामुळे तो संपूर्ण देशात अंमलात आलेला आहे व त्यामुळे त्या अधिनियमाच्या तरतुदी या म.न.पा.ला तितक्याच प्रभावीपणे लागू आहेत. त्यामुळे म.न.पा.ने कोणतेही धोरण ठरविले असल्यास ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींशी जर विसंगत असेल तर म्हणजे सार्वजनिक प्राधिकरणातील माहिती प्रकट करणे हा नियम आहे व प्रकट न करणे हा अपवाद आहे व त्यामुळे अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींशी संबंधित नसलेले धोरण किंवा नियम हा प्रभावी ठरणार नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना म.न.पा.च्या प्रचलित धोरणाप्रमाणे माहिती देता येणार नाही असे म्हणता येणार नाही. काही अर्जातील माहितीच्या संदर्भात माहिती प्रकट करावयाची नसल्यास कलम ८(१) प्रमाणे दिलेल्या निकषांच्या आधारावरच ती अपवाद म्हणून कारणमिमांसा देऊन नाकारणे  हे अपेक्षित असते. काही अपिलार्थी यांच्या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ८(१)(ञ)प्रमाणे माहिती देता येणार नाही असे कळविलेले आहे. परंतु कलम ८(१)(ञ)च्या तरतुदी काय आहेत व त्या तरतुदीप्रमाणे मागीतलेली माहिती का देता येणार नाही याबद्दलची कोणतीही कारणमिमांसा त्यांनी दिलेली नाही. अधिनियमाच्या कलम ८(१)(ञ) प्रमाणे जी माहिती प्रकट करणे हे व्यापक लोकहिताच्यादृष्टीने आवश्यक आहे अशी, राज्य जन माहिती अधिका-यांची किंवा अपिल प्राधिका-यांची खात्री पटली असेल ती खेरीज करुन,जी प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधांशी काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्तीच्या खाजगी बाबतीत आगंतुक हस्तक्षेप करेल, अशी वैयक्तिक तपशीलासंबंधातील माहिती अशी तरतूद आहे.

८. वरील तरतुदीमध्ये व्यापक सार्वजनिक हिताच्यादृष्टीने जी संकल्पना घेतलेली आहे त्याबाबत विचार केल्यास कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणातील सार्वजनिक सेवांच्या संदर्भातील कोणतीही बाब ही व्यापक सार्वजनिक हिताचीच असते व त्यामुळे सदरच्या उत्तरपत्रिकांबाबत पारदर्शकतेच्यादृष्टीने व कार्यक्षमतेच्यादृष्टीने कोणतीही अनियमितता झालेली नाही व ते पडताळणी करण्याकरीता प्रकट करणे याचाच अर्थ सार्वजनिक व्यापक हिताकरीता प्रकट करणे होय.सार्वजनिक सेवेतील कार्यक्षमता व पदोन्नती याकरीता सार्वजनिक सेवांमध्ये विभागीय परीक्षा घेण्यात येत असल्याने सार्वजनिक सेवांचा दर्जा सुधारणे असा उद्देश असल्याने विभागीय परीक्षांच्या उत्तरपत्रिका या अधिनियमाचे कलम २(च) मधील 'माहिती' या संज्ञेच्या व्याख्येत समावेश होतो व पर्यायाने सार्वजनिक अभिलेख्यांचाच भाग होतो. उत्तरपत्रिका ही कोणत्याही परीक्षार्थीची वैयक्तीक/खाजगी बाब राहत नाही. Evidence Act,१८७२ च्या कलम ७४ प्रमाणे 'सावजनिक दस्तऐवजाची'(Public Document)ची व्याख्या केलेली आहे ती येणेप्रमाणे - ७४.Public Documents - The following documents are public documents - १)Documents forming the acts, records of public documents - i) of the sovereign authority

ii) of official bodies and tribunals, and

iii) of public officers, legislative,judicial and executive, of any part of Indi or of the common wealth, or of a foreign country

२) Public records kept in any state of private documents

कलम २(च)(अ)मधील ‘माहिती’ व ‘अभिलेख’ व वरील Evidence Act प्रमाणेची व्याख्या एकत्रित वाचल्यास उत्तरपत्रिका हया सार्वजनिक अभिलेख्याचा भाग होतात.त्यामुळे उत्तरपत्रिका उपलब्ध करुन दिल्यास विभागीय परिक्षा पध्दतीमध्ये पारदर्शकता,कार्यशीलता,उत्तरदायित्व व निःपक्षपातीपणा येऊन सार्वजनिक सेवांचा दर्जा सुधारण्यास वाव राहील. त्यामुळे सार्वजनिक अभिलेख्याचा भाग उत्तरपत्रिका होत असल्यामुळे त्या नियमानुसार प्रकट करणे आवश्यक राहील. महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानसार प्रकट करता येणार नाही असे म्हटले असले तरी प्रचलित धोरणानुसार त्या प्रकट करण्यात येऊ नये याबद्दल कारणमिमांसा दिलेली नाही. त्यामुळे विभागीय परिक्षांचे उत्तरपत्रिका गोपनीय अभिलेखे नाहीत व प्रकट करणे अधिनियमाचे तरतुदींशी संबंधित आहे. परंतु उत्तरपत्रिका उपलब्ध करुन देतांना त्याबरोबर जर परिक्षकांची नावे उपलब्ध करुन दिली तर त्याबाबत सार्वजनिक प्राधिकरणात अंतर्गत वाद वाढण्याची शक्यता असल्यामुळे उत्तरपत्रिका उपलब्ध करुन देतांना परिक्षकांची नावे प्रकट होणार नाहीत अशाप्रकारे तरतूद करुन (बार कोड देऊन) सदरची उत्तरपत्रिका उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व अपिलकर्त्यांच्या माहितीच्या अर्जामधील मागणीप्रमाणे त्यांच्या स्वतःच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. मात्र इतर परिक्षार्थी कर्मचा-यांच्या उत्तरपत्रिका मात्र कोणत्याही दुस-या कर्मचा-यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होणार नाही. तसेच अर्जामध्ये ‘आदर्श उत्तरपत्रिका’सुध्दा अपिलकर्ता यांनी मागीतलेली आहे. ‘आदर्श उत्तरपत्रिका’ ही कोणत्याही परिस्थितीत गोपनीय उत्तरपत्रिका असू शकत नाही. त्याकरीता अपिलकर्ता यांनी जो युक्ती वाद केलेला आहे तो योग्य आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांना आदर्श उत्तरपत्रिकासुध्दा उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. हा निर्णय या अर्जात मागीतलेल्या विभागीय परीक्षांचे मर्यादेपर्यंतच लागू राहील. त्याकरीता सर्व अपीले मंजूर करण्यास पात्र आहेत.

## आदेश

**१) अपिलकता यांची सर्व अपीले मंजूर करण्यात येत असून प्रत्येक अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जात मागीतल्याप्रमाणे आदर्श उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत तसेच त्यांच्या स्वतःच्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. अर्जदार अपिलार्थी यांना इतर कोणत्याही परिक्षार्थींची उत्तरपत्रिका देता येणार नाही.**

**२) आदेशाची प्रत अपिलार्थी व उत्तरवादी यांना पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**

**दिनांक १९.४.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ र्िणयाची प्रमाणित प्रत**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०६७७/अपील क्रमांक ६६९५/२०१०**
**क्रमांक-मुमाआ/५०६७९/अपील क्रमांक ६६९७/२०१०**

**कु.अफ्ताब ए. सिद्दिकी,**
**४, सदानंद क्लासिक, प्लॉट नं.५२८,**
**३३वा रस्ता, खार(प.), मुंबई-४०००५२. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**परिमंडळ-९,हिल रोड,**
**बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त(पश्चिम नियंत्रण कक्ष),**
**परिमंडळ-९,हिल रोड,**
**बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २२.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १८.५.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांच्या दि.२१.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,नॉर्थ वेस्ट रिजन, कार्टर रोड, बांद्रा(प.), मुंबइ-४०००५० यांच्याकडे सन १९९० पासून अदखलपात्र दाखल झालेल्या गुन्हयांच्या संदर्भात पोलीस स्टेशन डायरीत श्री.तबरेज ए.शेख आणि श्री.अलीजान सुलेमान शेख यांच्याविरुध्द निर्मल नगर पोलीस स्टेशनमध्ये दाखल झालेल्या केसेसच्या संदर्भात लोकल क्राईम रजिस्टरचे निरिक्षण मागीतलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.६.९.२०१० रोजी तबरेज शेख व अलीजान शेख यांच्याविरुध्द कोणत्याही गुन्हयाच्या नोंदी आढळून आलेल्या नाहीत याकरीता निरंक अहवाल, अर्जदार यांनी अभिलेख पडताळणीसाठी सोमवार ते शनिवार कार्यालयीन वेळेत निर्मल नगर पोलीस ठाणे, पोलीस निरिक्षक(तपास) यांच्याशी संपर्क साधावा. येण्यापूर्वी सदरबाबत आगाऊ माहिती द्यावी तसेच अर्जदार दाखवतील त्या संबंधित अभिलेखाच्या प्रती त्यांना देण्यात येतील असे कळविण्यात आले होते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.२५.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल

केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात दि.२७.१०.२०१० रोजी अपिलार्थी गैरहजर असल्यामुळे व श्री.तबरेज शेख व अलीजान शेख यांच्याविरुध्द निर्मल नगर पालीस ठाणे, मुंबई येथे सन १९९० ते २१.८.२०१० या कालावधीत नोंदविलेल्या गुन्हयांच्या अनुषंगाने अदखलपात्र व दखलपात्र गुन्हयांची स्टेशन डायरी आणि एल.ए.सी. रजिस्टर या अभिलेखाची पडताळणी करणेबाबत नमूद केले आहे. त्याबद्दल अपिलार्थी यांना समाधानकारक उत्तर दिलले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून यते. त्यामुळे समाधान न झ ााल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्याकडे श्री.तबरेज शेख व श्री.अलिजान शेख यांच्याविरुध्द गुन्हे दाखल झाल्याची माहिती आहे परंतु जन माहिती अधिकारी हे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करीत आहेत. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, श्री. तबरेज शेख यांनी अधिनियमाच्या कलम ११(१)(२) अन्वये मागीतलेली माहिती ही त्यांच्या स्वतःच्या व त्यांच्या वडिलांच्या संदर्भात असल्यामुळे ती त्रयस्थ पक्षाची माहिती आहे व अर्जदार हे त्यांच्या विरोधात सूड भावनेने तक्रार अर्ज करत असून त्यांच्याबाबत व त्यांच्या वडिलांच्याबाबत माहिती मिळवून त्या माहितीचा ते दुरुपयोग करु शकतात व त्यामुळे त्यांच्यापासून त्रास होऊ शकतो असा जबाब दिलेला असल्यामुळे त्यांना ती माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. परंतु पोलीस स्टेशन डायरी व एल.ए.सी. रेकॉर्ड हे सार्वजनिक अभिलेख असल्यामुळे व ती कोणत्याही त्रयस्थ पक्षाची माहिती होत नाही. त्यामुळे त्यांनी कळविलेल्या दिनांक ६.९.०९ च्या उत्तराप्रमाणे व घेतलेल्या जबाबामध्ये निर्मलनगर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केलेला आहे असे दिसून येत असून तफावत दिसून येते व तसे असल्यास अपिलकर्ता यांचे म्हणणे पडताळून घेणे आवश्यक आहे. त्याकरीता अपिलकर्ता यांनाी त्यांच्या दि.२१.८.२०१० च्या अर्जाप्रमाणे मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात पोलीस स्टेशन डायरी व एल.ए.सी.(लोकल क्राईम रजिस्टर) च्या संदर्भात (उपलब्ध असल्यास निरिक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे कामकाजाच्या दिवसाची तारीख व वेळ लेखी कळवून त्या दिवशी उपस्थित राहून त्यांच्या दि.२१.८.२०१० च्या अर्जात मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात स्टेशन डायरी व एल.ए.सी.चे निरिक्षण करुन आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन घ्यावी. जन माहिती अधिकारी यांनी अर्जदार यांनी लेखी कळविल्यानुसार त्यावेळेस पोलीस स्टेशन डायरी व एल.ए.सी.रेकॉर्ड निरिक्षणासाठी विनामुल्य उपलब्ध करुन द्यावे.**

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक १९.५.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाािर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०६७७/अपील क्रमांक ६६९६/२०१०**

**कु.अफ्ताब ए. सिद्दिकी,**
**४, सदानंद क्लासिक, प्लॉट नं.५२८,**
**३३वा रस्ता, खार(प.), मुंबई-४०००५२. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रमुख अग्निशमन अधिकारी,**
**मुंबई अग्निशामक केंद्र, ई वार्ड म्युनिसिपल बिल्डिंग,**
**२रा मजला, शेख हफिजुद्दिन मार्ग, भायखळा, मुंबई-०८.**

**जन माहिती अधिकारी तथा उप-प्रमख अग्निशमन अधिकारी,**
**मुंबई महानगरपालिका, मुंबई अग्निशमन दल,**
**प्रमख अग्निशमन अधिकारी यांचे कार्यालय, मरोळ फायर स्टेशन,**
**अग्निशमन दल मार्ग, मरोळ नाका,**
**अंधेरी(पूर्व), मुंबइ-४०००५९. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २२.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १८.५.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२१.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्य अग्निशमन अधिकारी यांच्या कार्यालयात Misuse of condonation file No.२४६८, २४५८,२४३२,२७३८ & २२०७ च्या संदर्भात एनओसी दिली असेल तर त्या संदर्भात एकूण ३ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२७.७.२०१० रोजी अर्जदाराचा अर्ज पूर्ण नसून त्यामध्ये सीटीएस,प्लॉट नंबर, एरीया,आर्किटेक्टचे नाव वगैरे कोणतीही माहिती नाही व त्यामुळे कोणत्या प्रकारची माहिती द्यावी ते कळून येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.३०.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागीतली आहे ती माहिती देण्याची टाळाटाळ जन माहिती अधिकारी अग्निशमन विभाग करत आहेत. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, अपिलकर्ता यांच्या दि.२१.७.२०१० च्या अर्जामध्ये त्यांनी नस्ती क्रमांक दिलेले आहेत व प्रत्यक्ष जागेवरील लोकेशन दिलेले आहे. परंतु त्यांच्या कार्यालयात सीटीएस नंबरप्रमाणे अभिलेखे ठेवले जातात व त्यामुळे त्यांना तसे कळविण्यात आले होते. परंतु त्यांनी जे सीटीएस नंबर कळविलेले आहेत ते मागीतलेल्या माहितीशी जुळुन येत नाहीत व त्याबाबत त्यांना दि.१६.११.२०१० रोजी कळविण्यात आले होते. त्यामुळे प्रथम अपीलाचा

निर्णय दिलेला दिसून येत नाही. यावरुन अर्जदार अपिलकर्ता यांना ज्या सीटीएसच्या संदर्भात माहिती अपेक्षित आहे त्याकरीता त्यांनी प्रत्यक्ष निरिक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, त्यांच्याकडे बांधकाम व प्रस्ताव या विभागाकडून किंवा वास्तुशास्त्रज्ञ या विभागाकडून नस्त्या पाठवल्या जातात व त्यांचे अभिप्राय घेतले जातात किंवा एनओसी मागीतली जाते. तरी या संदर्भात त्यांनी निरिक्षण घेतल्यास त्यांना अपेक्षित माहिती मिळू शकेल. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांच्याकडे कामकाजाच्या दिवसाची तारीख व वेळ लेखी कळवून त्याप्रमाणे उपस्थित राहून त्यांना अपेक्षित असलेल्या बांधकामाच्या संदर्भात अभिलेखे उपलब्ध असतील त्यांचे निरिक्षण करुन आवश्यक ती माहिती(एनओसी संदर्भात) उपलब्ध करुन घ्यावी. जन माति अधिकारी यांनी अपिलकर्ता अर्जदार हजर झाल्यावर त्यांना त्यांच्या दि.२१.६.२०१० च्या अर्जात मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात तसेच त्यांनी दि.८.११.२०१० रोजी कळविलेल्या सीटीउस क्रमांकाच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १९.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ार्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०६८०/अपील क्रमांक ६६९८/२०१०**

**कु.अफ्ताब ए. सिद्दिकी,**
**४, सदानंद क्लासिक, प्लॉट नं.५२८,**
**३३वा रस्ता, खार(प.), मुंबई-४०००५२. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा विधी अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका लिगल डिपार्टमेंट,२रा मजला,**
**हॉल नं.२००, न्यू ॲनेक्स बिल्डिंग,**
**म्युनिसिपल हेड ऑफीस, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपविधी अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका लिगल डिपार्टमेंट,२रा मजला,**
**हॉल नं.२००, न्यू ॲनेक्स बिल्डिंग,**
**म्युनिसिपल हेड ऑफीस, महापालिका मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-४००००१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २२.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १८.५.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

सदर प्रकरणी माहिती मिळाली आहे असे अपिलकर्ता यांनी लेखी लिहून दिले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १९.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०६७६/अपील क्रमांक ६६९४/२०१०**

**कु.अफ्ताब ए. सिद्दिकी,**
**४, सदानंद क्लासिक, प्लॉट नं.५२८,**
**३३वा रस्ता, खार(प.), मुंबई-४०००५२. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा वार्ड ऑफीसर बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालीका आयुक्त, एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,**
**सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी तथा लॉ ऑफीसर बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालीका आयुक्त, एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,**
**सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २२.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १८.५.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२१.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी विधी विभाग,एच/डब्ल्यू वार्ड, बांद्रा(प.) यांच्याकडे अर्ज करुन List of legal cases in City Civil Court & Bombay High Court from the year २००० till date, तसेच Please specify Suit Nos.MCGM v/s(name of the party))Address of the structure with CTS Nos., Plot Nos. and proper address of the party अशी माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२३.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर दि.१४.९.२०१० रोजी व पुन्हा दि.२३.९.२०१० रोजी सुनावणी ठेवण्यात आली असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर सुनावणी १.१०.२०१० पर्यंत पुढे ढकलण्यात आलेली दिसून येते. त्या संदर्भात मात्र कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येत नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, अद्यापपर्यंत त्यांना कोणतीही माहिती मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी सुनावणीस गैरहजर असून त्यांनी कोणतीही कागदपत्र दाखल केलेली नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगाच्या

नोटीसचा अवमान केलेला आहे यास्तव ते शास्तीस पात्र आहेत अशी आयोगाची खात्री झाली आहे. त्यामुळे त्यांनी  आयोगापुढे हजर रहाण्यासाठी सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी १० दिवसाच्या आत आयोगापुढे समक्ष हजर राहून ते सुनावणीस का हजर राहिले नाहीत याचा खुलासा करावा अन्यथा त्यांच्याविरुध्द माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे असा निष्कर्ष काढून शास्ती लादण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**

**दिनांक १९.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाि र्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**

**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**निवड नस्ती.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :मुमाआ२०११/४१६३३/तक्रार क्र. ०४/०१**

**श्री. अशोक दिवाण,**
**३/३१५,पार्क व्ह्यू,यारी रोड,**
**अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०६१. ... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता**
**(इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका ,**
**के/पूर्व विभाग कार्यालय, आझाद रोड, गुंदवली,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९. ... गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - ०२/०५/२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

तक्रारदार यांनी दिनांक ०३/०६/२००९ रोजी अपिल क्रमांक ४०४९/०२ मध्ये दिनांक १८/०३/२००९ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे माहिती प्ररप्त झाली नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ (१) प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार हे जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता यांचे कडे माहिती घेण्यासाठी अनेकदा गेले परंतु कोणत्याही प्रकारची कारवाई त्यांनी केलेली नाही.गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, तक्रारदार यांनी त्यांच्या तक्राररीत नमूद केल्याप्रमाणे प्रॉपर्टी ॲट सि.टी.एस.नं. ४२८ व्हीलेज कोंडीवाडा, ता. अंधेरी च्या संदर्भामध्ये महानगरपालिकेच्या अधिकारी कर्मचारी यांनी तपासणी करुन सदरची मालमत्त ही अतिशय जुनी असून त्या संदर्भातील कोणतेही कागदपत्रे कार्यालयात उपलब्ध नाहीत व त्यामुळे त्यांना कागदपत्रे उपलब्ध करुन देता येत नाहीत असे त्यांनी आयांगापुढे सांगितले , तक्रारदार यांनी विनंती केल्याप्रमाणे कोणतीही कार्यवाही करता येत नाही व त्यामुळे सदरची तक्रार ही निकाली काढण्यास पात्र.

**---आदेश---**

**१) सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र.**

**(भास्कर पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :मुमाआ२०११/४१६३३/तक्रार क्र. ०३/०१**

**श्री. अशोक दिवाण,**
**३/३१५,पार्क व्ह्यू,यारी रोड,**
**अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०६१. ... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता**
**(इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका ,**
**के/पूर्व विभाग कार्यालय, आझाद रोड, गुंदवली,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९. ... गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

| | |
|---|---|
| **सुनावणीचा दिनांक** | **- ०२/०५/२०११** |
| **तक्रारदार** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- उपस्थित.** |

तक्रारदार यांनी दिनांक ०३/०६/२००९ रोजी अपिल क्रमांक ४०४८/०२ मध्ये दिनांक १८/०३/२००९ रोजी दिलेल्या निर्णयाच्या संदर्भामध्ये माहिती प्राप्त झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची माहिती सहायक लॉ ऑफिसर यांचे कार्यालयात आहे. परंतु राज्य माहिती आयोगाचे आदेशातच सहायक लॉ ऑफिसर यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नसेल तर सहायक अभियंता यांनी स्वतः त्या कार्यालयात जाऊन संबधित नस्ती प्राप्त करुन घ्यावी व त्यातील कोर्टाच्या आदेशावर कार्यवाही करा ावी असा आदेश देएयात आलाञ व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी स्वतः माहिती उपलब्ध करुन घेऊन तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी अन्यथा जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती लादण्यात येईल याची नांद घ्यावी तसेही विधी खात्याकडून माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक दिसून येत नाही, त्याकरिता तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र.

**---आदेश---**

**२) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून हा आदेश मिळाल्यापासून १० दिवसाचे आत गैरतक्रारदार तथा जन माहिती अधिकारी यांनी विधी खात्याकडून तक्रारदार यांच्यावर वरीलप्रमाणे माहिती उपलब्ध करुन घेऊन पुढील कारवाई करुन माहीती उपलब्ध करुन द्यावी व तसे न केल्यास त्याच्यावर शास्ती लादण्यात**

येईल याची नोंद घ्यावी.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :मुमाआ२०११/तक्रार क्र. १२६७/०१**

**श्री. मनोहर सखाराम देसाई,**
**वरद लक्ष्मी, ४ था मजला,**
**खोली क्र. ४०६, गोखले मार्ग,**
**मुलूंड (पू), मुंबई ४०० ००८१.** **... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता**
**(इ.प्र.), बृहन्मुंबई महानगरपालिका ,**
**पूर्व उपनगरे यांचे कार्यालय,**
**पेपरमिल कंपाऊंड राज लिगसी जवळ,**
**एल.बी. एस. मार्ग विक्राळी (पू)**
**मुंबई ४०० ०८३.** **... गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - ०९/०३/२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

तक्रारदार यांची तक्रार क्रमांक १२६७ ची सुनावणी व निर्णय ०९/०३/२०११ रोजी भास्कर पाटील
प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे पुढे झालेली दिसून येते. परंतु त्या नंतर पुन्हा सदरची तक्रार गुन्हा सुनावणीस लावलेली दिसून येते. प्रथम अपिलीय अधिकरी तथा द.रा.दिक्षित, उप. प्रमुख अभियंता यांनी आयोगापुढे खुलासा करताना सदर विषयाबद्दल राज्य माहिती आयुक्त यांनी असे आदेश दिले होते की, वास्तुविशारद व विकासक हयांच्याकडून प्राप्त झालेल्या मूळ कार्यालयीन वेळेत श्री कुंभारे, दुय्यम अभियंता (इ.प्र.) यांचेकडे अर्जदार जाऊन त्यांचे निरिक्षण घेऊ शकतात.व अर्जदाराला त्यातून ज्या माहितीची आवश्यकता आहे त्याची झेरॉक्स घेऊ शकतात.परंतु अर्जदार श्री. मनोहर सखाराम देसाई सदर फाईल निरिक्षणकरण्यासाठील दिनांक ०९/०३/२०११ व १०/०३/२०१० रोजी हया कार्यालयात आलेले नाहीत. सदर मूळ फाईल ही १९९२ पासून विधी विभागाकडे आहे व ती

परत या कार्यालयाकडे पाठविण्याबद्दल दिनांक १९/०३/२०११ कळविण्यात आलेले होते.श्री. नितीन कुंभारे दुय्यम अभियंता स्वतः जातीने विधीखात्याकडे जाऊन फाईल शोधण्यासाठी सतत पाठपुरावा करीत असताना विधी विभागाच्या आवक-जावक नोंदवही मध्ये असे आढळून आले की, दिनांक १७/०६/२००० ला सदर नस्ती हया कार्यालयात पाठविण्यात आलेली होती.सदर कार्यालयात संपूर्ण अभिलेखांच्या नस्तीचे स्कॅनिंग काम सुरु असून त्यामध्ये मिसळलेल्या काही जुन्या नस्ती सापडल्या, त्यामुळे सदरची नस्ती दिनांक ०६/०४/२०११ रांजी या कार्यालयात प्राप्त झाली.सदर नस्तीचा शोध लागल्यानंतर तक्रारदार यांना कळविण्यात आले.त्यामुळे तक्रारदार यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे संपर्क सांधून नस्तीचे निरीक्षण करून त्यांना आवश्यक असतील त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्यात.

**---आदेश---**

**१) तक्रारदार प गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(भास्कर पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**क्रमांक :मुमाआ२०११/४१६३३/तक्रार क्र. १३०२/०१**

**श्री. संजय गोविंदस्वामी दारा,**
**२०६ श्रीकृष्ण अपार्टमेंट,शास्त्रीनगर,**
**कोपर क्रॉस रोड, संतोषी माता मंदिरासमोर,**
**वरूणधाम बिल्डींग जवळ, डोबिवली (प.)**
**जिल्हा. ठाणे ४२१ २०२.** **... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकरी,**
**अनुसूचित जाती जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,**
**दुसरा मजला, आदिवासी विकास भवन,**
**गडकरी चौक, नाशिक- ४२२ ००२** **... गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - २५/०५/२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

सदर प्रकरणात अर्जदार व अपिलार्थी हजर आहेत उत्तरवादी गैरहजर आहेत. या आयोगाने दिनांक २९/०५/२०१० रोजी आदेश दिले होते ते खालीलप्रमाणे, A copy of the information submitted to the commission should be sent to the appellant free of cost within 15 days from the date of receipt of this order. सदर प्रकरणात प्रकरणात उत्त्तरवादी हे गैरहजर आहेत. त्यांनी या आयोगासमोर दाखल केलेल्या माहितीचे कागदपत्र अर्जदार अपिलार्थीना या आयोगासमोर देण्यात आले व तशी पोच घेतली. त्यामुळे अर्जदारांची तक्रार निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई**
**दिनांक : २५-०५-२०११.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :रामाआ२०११/तक्रार क्र. ९९८/०२**

**श्री. सुदेश गायकवाड,**
**ओंकार चाळ, इंदिरा नगर,**
**जुन्या कबरस्तानजवळ,**
**जोगेश्वरी (पू), मुंबई ४०० ०६०.** **... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ**
**म्हाडा तिसरा मजला,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू)**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी**
**मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ**
**म्हाडा तिसरा मजला,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू)**
**मुंबई ४०० ०५१.** **... गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - २५/०५/२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

सदर प्रकरणात अर्जदार व अपिलार्थी हजर आहेत, तक्रारदार यांच्या तर्फे श्री सूर्यवंशी हे हजर आहेत. त्यांनी पुढील तारखेला अर्जदराला द्यावयाची माहिती मूळ अभिलेखासह उपलब्ध करुन देण्याचे कबूल केलेले असल्यामुळे सदर प्रकरणात ३०/०५/२०११ रोजी दुपारी २.०० वाजता सूनावणी ठेवण्यात येते. पुढील सुनावणी ३०/०५/२०११ रोजी घेण्यात येईल.

**(भास्कर पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २५-०५-२०११**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :रामाआ२०११/तक्रार क्र. १३०३/०२**

**श्री. सुभाष सखाराम मांडगावकर,**
**रा.ब.- २०२, भगवा महल, बा. ज. मार्ग,**
**सातरस्ता, मुंबई ४०० ०११.** **... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**जन माहिती अधिकारी तथा**
**शिरस्तेदार उपविभागीय कार्यालय,**
**रत्नागिरी , जिल्हा रत्नागिरी.** **... गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - २५/०५/२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित**

तक्रारदार अपिलकर्ता हजर आहेत. उपविभागीय अधिकारी यांचे शिरस्तेदार श्री. डी.ए. बेर्डे हे हजर आहेत. त्यांनी दाखल केलेला खुलासा व त्या सोबत दाखल केलल्या पत्राची प्रत अर्जदार व अपिलार्थीला देण्यात आलेली आहे. अर्जदारांचे समाधान झाल्यामुळे तक्रार ही निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २५-०५-२०११**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :रामाआ२०११/तक्रार क्र. ८७१/०२**

**श्री. इकबाल अहमद खान,**
**२४/२०२ पार्क व्हयू, सी.एच.एस.लिमिटेड,**
**ओशिवारा म्हाडा,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३. ... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपमुख्य अधिकारी, (मि.का.२),**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू)**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मिळकत व्यवस्थापक(२)**
**उपमुख्य अधिकारी,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू)**
**मुंबई ४०० ०५१. ... गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - २५/०५/२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

अर्जदार अपिलार्थी हजर आहेत जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अधिकारी गृहनिर्माण विभाग बांद्रा मुंबई ४०० ०५१ यांच्या तर्फे त्यांचे प्रतिनिधी श्रीमती माने हजर आहेत. प्रथम अधिकारीयांच्या तर्फे उपमुख्य अधिकारी संदानंद लक्ष्मण पागधरेसदर प्रकरणात जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधींनी दिनांक ०४/०७/२०१० रोजी यांनी आयोगापुढे पत्राची छांयाकित प्रत अर्जदार अपिलार्थीला देण्यात आली. व त्याची एक प्रत सुध्दा दिनांक २५/०७/२०११ रोजी दाखल केलेली आहे. सदर प्रकरणात आयोगाने दिनांक २५/०५/२०१० रोजी असे आदेशित केले होते की, ‘I have

come to the conclusion that prima facie provisions of the RIT Act 2005 have been violated by not funrnishing the desired information in time. The PIO neeeds t explain why enal action should not be taken against him under section 20 of the RIT Act 2005. His reply to reach the commission within 4 weeks failling which it will be presumed that he has nothing to say and will be proceeded as per law' त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधिंनी जन माहिती अधिकारी हे सुट्टीवर असल्यामुळै पुढील तारखेची मागणी केली आहे. व सदर प्रकरणात सुनावणी दिनांक ०३/०६/२०११ रोजी दुपारी २ वाजता ठेवण्यात येत आहे. ‘या तारखेला अर्जदार अपिलकर्ता गैरहजर असले तरी चालेल कारण अर्जदार अपिलार्थीला ामहिती प्राप्त झालेली आहे. पुढील तारीख दिनांक ०३/०६/२०११ रोजी दुपारी २.०० वाजता.

**(भास्कर पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई**
**दिनांक : २५-०५-२०११**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :रामाआ२०११/तक्रार क्र. १३०१/०२**

**सौ. नंदा पां. रेडकर,**
**बी -२७६/१ सरकारी वसाहत,**
**बांद्रा, (पू) मुंबई ४०० ०५१. ... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपमुख्य अभियंता (स्थापत्य),**
**गृहनिर्माण व क्षेत्र विकस मंडळ,**
**बांद्रा विभाग, दुसरा मजला,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू)**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता,**
**गृहनिर्माण व क्षेत्र विकस मंडळ,**
**बांद्रा विभाग, दुसरा मजला,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू)**
**मुंबई ४०० ०५१. ... गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - २५/०५/२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

अर्जदार अपिलार्थीचे म्हणणे ऐकून घेण्यात आलेले आहे. अर्जदाराने या आयोगासमोर दाखल केलेल्या लिखित तक्रारीरवर जन माहिती अधिकारी यांनी मुद्देसूद उत्तर तसेच त्या संबधीची कागदपत्रे असल्यास त्यांच्या प्रती अर्जदाराला आजपासून ८ दिवसाच्या आत देण्याचे कबूल केलेले आहे. व ते लेखी उत्तर कागदपत्रांसह विनाशुल्क पंजीबध्द राखीने अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर पाठविण्याचे कबूल केल्यावरुन सदरची तक्रार निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई**
**दिनांक : २५-०५-२०११**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :रामाआ२०११/तक्रार क्र. १२९७/०२**

**श्री. अविनाश दत्तात्रय ठाकूर,**
**८/२४९, आकांक्षा, म्हाडा,**
**निर्मल नगर बांद्रा, (पू.),**
**मुंबई ४०० ०५१.** **... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालय,**
**सहकारी संस्था, म्हाडा,**
**रुम नं ३६१, २ रा मजला**
**मुंबई गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू)**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहकरी अधिकारी (श्रेणी- १),**
**सहकारी संस्था, म्हाडा,**
**रुम नं ३६१, २ रा मजला,**
**मुंबई गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू)**
**मुंबई ४०० ०५१.** **... गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - २५/०५/२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

सदर प्रकरणात या आयोगाने दिनांक २५/१०/२०१० च्या द्वितीय अपील मागणीवरुन जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला ३० दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश निर्गमित केलेले होते. त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी माहिती देणे अपेक्षित होते. परंतु ती न मिळाल्यामुळे अर्जदार अपिलार्थीला या आयेगासमोर दिनांक २८/०१/२०११ रोजी तक्रार करावी लागली. त्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर प्रकरणात दिनांक ०८/०४/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. दिनांक ०८/०४/२०११ रोजी सुनावणी घेतली व त्यांनंतर दिनांक २७/०४/२०११ रोजी सुनावणी झाली दरम्यान अर्जदार अपिलकर्ता हजर होते. जन माहिती अधिकारी बी. एम. काकड , सहकारी तसेच अपिलीय अधिकारी डॉ. किशोर मांडे उपनिबंधक हजर होत. अर्जदार अपिलार्थीच्या म्हणण्यानुसार या आयोगाने आदेशित केल्यानंतर दिनांक २५/१०/२०१० रोजी च्या आदेशानंतर सुध्दा माहिती दिलेली नाही. व

त्यामुळे संबधीतांवर दंडात्मक कारवाई करावी. या आयोगाने दिलेल्या निर्णयानुसार शेवटचा परिच्छेद खालीलप्रमाणे:

After going throug the case papers and considering the arguments advanced by parties I have come to the conclusion that while it is true that most of the information sought was available at the societ's level' a copy of registration Certificate could have been given. The DDR is the custodian of this document. It is also well known that two societies cannot have the same name. Since the appellent has given society's name, a copy of the registration Certifdicate must be furnished to him. The RTI Act is a citizen friendly Act and everone is expected to have a helping attitude.

त्या नुसार ३० दिवसाच्या आत माहिती देणे अपेक्षित होते.जन माहिती अधिकारी श्री. बी. एम. काकड यांनी त्यांचा खुलासा दाखल केला. त्यात त्यांनी दिनांक ०९/०२/२०१० च्या अर्जानुसार माहिती खालील प्रमाणे मागितलेली होती.

७. संस्थेच्या नोंदणी दाखल्याची प्रत.
८. सदर संस्थेच्या झालेल्या सभा व त्यांचे वृत्तांच्या प्रती.
९. कार्यालयातून पाठविलेल्या नोटीसा.
१०. परत आल्यानंतर केलेली कार्यवाही.
११. सुनावणी वेळी संस्थेच्या तर्फे उपस्थितांची नावे हुद्दे.
१२. तसेच संस्थने मागील ६ महिन्यात घेतलेल्या सभेच्या इतिवृत्तांच्या प्रतीची मागणी केली होती.

या आयागाने दिनांक २५/१०/२०१० रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने ही बाब मान्य केलेली होती की, बरीचशी माहिती ही संस्थेसंदर्भात असल्यामुळे, त्यांच्याकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. 'A copy of registration Certificate could have been given' तसेच . The DDR is the custodian of this document. It is also well known that two societies cannot have the same name. Since the appellent has given society's name, a copy of the registration Certifdicate must be furnished to him. असे आदेशात म्हटले आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७/०४/२०११ रोजी लेखी निवेदन दाखल केले. दिनांक २१/०४/२०११ च्या निवेदनानुसार दिनांक ०८/०४/२०११ रोजी सुनावणी वेळी दिलेल्या आदेशानुसार संस्थेकडून नोदणी दाखल्याची प्रत व नोंदणीक्रम पोस्टाद्वारे उपलब्ध करुन दाखविलेला आहे , असे म्हटले आहे तरी या उत्तरानुसार जवळ जवळ सहा महिन्याचा अवधी माहिती पुरविण्याकरिता लागलेला आहे. ही बाब समाधानकारक नाही. तरी अपिलीय अधिकारी यांनी संबधित जन माहिती अधिकारी यांच्यावर लादलेल्या विलंबावर जबाबदारी निश्चित करावी. या आयोगाने अधिनियमाचे कलम २० (२) प्रमाणे शिफारस केल्याचे गृहित धरुन संबधित जन माहिती अधिकारी यांच्या विरुध्द नियमानुसार योग्य ती कारवाई करावी आणि तसा अहवाल ३० दिवसाच्या आत पुरवावा. सदर तक्रार ही निकाली काढण्यात येते.

**--- आदेश---**

**३. अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालय, सहकारी संस्था,**

म्हाडा, यांना असे आदेश देण्यात येत आहेत की वरील शिफारशीनुसार संबधित जन माहिती अधिकारी यांच्यावर करुन ३ महिन्याच्या  आत तसा अहवाल आयोगापुढे सदर करावा.

४. तसेच जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे अर्जदाराच्या तक्रारीच्या अनुषंगाने जे प्रकरण चालू आहे. त्यात २१/०६/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली आहे , तरी आणखी विलंब न करता सदर प्रकरणात लवकरात लवकर निर्णय देण्यात यावा.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई
दिनांक : २५-०५-२०११

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :रामाआ२०११/तक्रार क्र. १२६६/०२**

**श्री. नरिदंर सिंग चढ्ढा,**
**१२- अे. एव्हरग्रीन बिल्डींग,**
**गुरू गोविंद सिंग मार्ग,**
**खार (प), मुंबई ४०० ०५२.** **... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहा. अभियंता (इ. व का.),**
**गृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालिका आयुक्त,**
**एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय**
**सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा (प.)**
**मुंबई ४०० ०५०.** **... गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - ३०/०५/२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - अनुपस्थित**

अर्जदार अपिलार्थीच्या म्हणण्यानुसार या आयोगाने आदेश पारित करुन जवळपास आठ महिन्याचा कालावधी लोटला तरी सुध्दा कुठल्याही प्रकारची माहिती पुरविण्यात आलेली नाही. उत्तरवादी यांच्या म्हणण्यानुसार सदर प्रकरणात कारवाई करण्यात आलेली आहे, त्याबाबतची लेखी माहिती परवा पर्यंत म्हणजेच दिनांक ०१/०६/२०११ या आयोगासमारे लेखी स्वरुपात दाखल करण्यात येईल. म्हणून शेवटची संधी म्हणून सदर प्रकरणात दिनांक ०१/०६/२०११ ही तारीख ठेवण्यात आलेली आहे.

**(भास्कर पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई**
**दिनांक : ३०-०५-२०११**